


# गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची

ग. प्र. प्रधान

नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा, मज भरतभूमिचा तारा
प्रासाद इथे भव्य परि मज भारी, आईची झोपडी प्यारी

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे!

सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा।
हम बुलबुलें हैं इसकी, यह गुलिस्ताँ हमारा॥

आईवरी विपत्ती आम्ही मुले कशाला?
बंदीत मायभू ही आम्ही खुले कशाला ?
जखडून बांधियेली बघवे तिच्या न हाला

हिंदपुत्रांनो स्वत:ला लेखिता का बापडे, भ्रांत तुम्हां का पडे ?
वाघिणीचे दूध प्याला वाघबच्चे फाकडे, भ्रांत तुम्हां का पडे ?

सोलून अंग केला झेंडा स्वतंत्रतेचा
पाडील कोण सत्ता त्याते बघू चला या

विजयी विश्व तिरंगा प्यारा। झंडा उँचा रहे हमारा॥...
शान न इसकी जाने पाए। चाहे जान भले ही जाये।
विश्वविजय करके दिखलाये। तब होवे प्रण पूर्ण हमारा॥

याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले,
शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले,
शस्त्रहीनां एक लाभे शस्त्र 'वंदे मातरम!'

# गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची



# गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची

ग. प्र. प्रधान

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे.

**प्रथमावृत्ती** : नोव्हेंबर, १९८८

**पुनर्मुद्रण** : २००२

□

**अक्षरजुळणी**

मुद्रा विभाग, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४.

□

**निर्मिती**

श्री. प्रमोद शिरोडकर, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. सुनील कसबेकर, निर्मिती अधिकारी

□

**टाइप**

१३ पॉ. देवनागरी

□

**कागद**

७० ग्रॅम/मॅपलिथो

□

**मुद्रणादेश क्रमांक**

**N/PTG/T.B./459 (0.01)**

□

**मुद्रक**

**CREATIVE PRINT ART**
Sakinaka, Mumbai-72

□

**प्रकाशक**

**श्री. एन. के. राठोड**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ
गोरेगाव, मुंबई - ४०० ०६२.

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

**संपादन**

इतिहास विषय समिति
१. डॉ. अरविंद देशपांडे, अध्यक्ष
२. प्रा. अ. आ. पाटील, सदस्य
३. श्री. आब्बास इनामदार, सदस्य
४. डॉ. भास्कर भोळे, सदस्य
५. प्रा. जी. एम. पाटील, सदस्य
६. श्री. ए. ए. हळबे, सदस्य
७. श्री. आनंद हिवराळे, सदस्य
८. प्रा. राजा दीक्षित, निमंत्रित
९. कु. शकुंतला अहिरे, सदस्य-सचिव

□

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. कमल शेडगे

□

**संयोजन प्रमुख**

शकुंतला अ. अहिरे
विद्यासचिव, भाषेतर विषय,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे - ४११ ००४.

# प्रस्तावना

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे अग्रणी आणि स्वतंत्र भारताचे भाग्यविधाते स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची' हे पुस्तक बालवाचकांच्या हाती देताना मंडळाला विशेष आनंद होत आहे.

परकीयांविरुद्ध स्वातंत्र्यासाठी लढताना आपल्या थोर नेत्यांनी, थोर स्वातंत्र्य-सैनिकांनी स्वतंत्र भारताविषयी अनेक स्वप्ने पाहिली. आपला भारत स्वतंत्र असलाच पाहिजे, त्याचबरोबर भारतीय समाजही सुजाण आणि प्रगत झाला पाहिजे; समता, बंधुत्व, प्रेम, शांती, क्षमा अशांसारखी आपल्या प्राचीन संस्कृतीतून गौरवलेली तत्त्वे स्वतंत्र भारतात साकारली पाहिजेत, हे त्यांचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. अनन्वित हालअपेष्टा सोसल्या. हे सगळे त्यांनी कशासाठी केले? तर भारत हा स्वतंत्र व्हावा, स्वतंत्र भारत सुजलाम् सुफलाम् व्हावा, साऱ्या जगाला आदर्श व्हावा, साऱ्या जगाचा मित्र व्हावा, यासाठी. त्यांच्या या प्रयत्नांत भारतातील साऱ्या जनतेने त्यांना साथ दिली. अशा आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ही गोष्ट आहे. आपला देश स्वतंत्र करण्यासाठी आपल्या थोर नेत्यांना, असंख्य कार्यकर्त्यांना केवढे कष्ट पडले, केवढ्या यातना झाल्या, केवढे दुःख सोसावे लागले, हे या गोष्टीतून तुम्हांला कळेल. या लढ्यात देशातील प्रत्येक शहर आणि प्रत्येक खेडे पुढे होते. स्त्री-पुरुष, मुले-मुली, शेतकरी-कामकरी आदी सारेजण आपली जात, धर्म, भाषा सगळे सगळे विसरून या लढ्यात सामील झाले होते. सर्वांचे ध्येय एक होते - स्वातंत्र्य आणि धर्मही एक होता - मानवधर्म.

हे वाचताना कधी तुमचे बाहू स्फुरतील, तर कधी डोळे पाणावतील.

ही गोष्ट वाचा - तुम्हांला ही गोष्ट सांगताहेत आपले एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि श्रेष्ठ साहित्यिक प्रा. ग. प्र. प्रधान. भारताचा 'स्वातंत्र्यलढा' हा इतिहासातला एक वैशिष्ट्यपूर्ण आणि युगप्रवर्तक असा कालखंड आहे. तो तुम्हांला समजेल, अशा भाषेत सांगत आहेत प्रधानसर. त्याबद्दल आपल्या सर्वांच्या वतीने मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

बालवाचकांसाठी अवांतर वाचनाकरिता हे पुस्तक लिहिण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरवले आणि शिक्षण विभागाच्या वतीने हे काम पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाकडे सोपवण्यात आले. मंडळाने या पुस्तकाची जबाबदारी इतिहास विषय समितीकडे सोपवली व समितीने ती आनंदाने स्वीकारली. लेखन-संपादनाच्या कामातही समितीने उत्स्फूर्त सहकार्य दिले, त्याबद्दल समितीचे मनःपूर्वक आभार.

'टाइम्स ऑफ इंडिया'चा प्रकाशन विभाग, प्रसिद्धी विभाग - महाराष्ट्र शासन, केसरी-मराठा ग्रंथालय, पुणे आणि मणिभवन, मुंबई यांनी या ग्रंथासाठी छायाचित्रे उपलब्ध करून दिली, त्याबद्दल त्यांचेही आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

श्री. मोहन वेल्हाळ यांनी मुद्रणप्रत सिद्ध करून दिली, त्याबद्दल व श्री. कमल शेडगे यांनी मुखपृष्ठ व सजावट केल्याबद्दल, तसेच या पुस्तकाच्या समीक्षकांनी हस्तलिखित तपासून ज्या मौलिक सूचना केल्या, त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार.

'गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची' हा स्वातंत्र्यलढ्याचा घेतलेला धावता आढावा आहे. त्यात सर्व घटना आणि सर्व व्यक्तींच्या कार्याचा परामर्श घेणे अशक्य आहे आणि म्हणूनच ग. प्र. प्रधान यांनी सांगितल्याप्रमाणे बालमित्रांनी स्वातंत्र्यलढ्याचा संपूर्ण इतिहास वाचणे आवश्यक आहे.

बालमित्रांकडून या पुस्तकाचे स्वागत होईल, अशी मला खात्री आहे.

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे व
शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य.

मुंबई
दिनांक : १४ नोव्हेंबर, १९८८

**गोष्ट सांगण्यापूर्वी :**

बालमित्रांनो,


तुम्ही स्वतंत्र भारतात जन्मलात. तुम्ही मोठे भाग्यवान आहात. पारतंत्र्यात होणारी आपल्या मातृभूमीची अवहेलना तुम्ही अनुभवली नाही. पारतंत्र्यात होणारा अपमान तुम्हांला सोसायला लागला नाही. दीडशे वर्षे ब्रिटिशांनी भारतावर राज्य केले त्या काळात भारतीयांनी अपार दुःख सोसले, परंतु त्यामुळे भारताचा स्वाभिमान कधी नष्ट झाला नाही. पारतंत्र्याचे हे जोखड फेकून देऊन आपण स्वतंत्र झाले पाहिजे, ही भावना कधी लोपली नाही. थोर देशाभिमानी नेते आणि असंख्य देशभक्त कार्यकर्ते यांच्या त्यागामुळे, त्यांनी केलेल्या संघर्षामुळे स्वातंत्र्याची ही आकांक्षा अधिकाधिक तीव्र होत गेली. आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढण्यात अपार आनंद असतो. असंख्य देशभक्तांनी तो अनुभवला. ते धुंदपणे लढले. त्यांना ना तुरुंगाची भीती, ना मृत्यूचे भय. स्वातंत्र्य हे स्वप्न न राहता सत्य व्हावे, म्हणून भारतीय जनतेने दीर्घकाळ संग्राम दिला. स्वातंत्र्यसंग्रामाचे संपूर्ण महाभारत तुम्ही वाचले पाहिजे. तुमचा ऊर अभिमानाने भरून येईल. देशप्रेमाच्या उदात्त भावनेने तुमचे रक्त सळसळू लागेल. या स्वातंत्र्यसंग्रामाची ही गोष्ट.

ग. प्र. प्रधान

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | नव्या युगाच्या उंबरठ्यावर | १ |
| २ | राष्ट्र संघटित होऊ लागले | ६ |
| ३ | राष्ट्रव्यापी लढ्याकडे | ११ |
| ४ | सशस्त्र प्रतिकार | १७ |
| ५ | विस्तारलेला लढा | २३ |
| ६ | जनता निर्भय बनली | २७ |
| ७ | क्रांतिपर्व | ३६ |
| ८ | सामान्यांचे शस्त्र : सत्याग्रह | ४२ |
| ९ | नवे संदर्भ | ५५ |
| १० | चले जाव ! | ६० |
| ११ | चलो दिल्ली ! | ७१ |
| १२ | जय हिंद ! | ७६ |

“अनेक वर्षांपूर्वी आपण नियतीशी एक करार केला होता...”



लाल किल्ल्यावरील ध्वजारोहण, १५ ऑगस्ट, १९४७.

# १. नव्या युगाच्या उंबरठ्यावर

राष्ट्रभक्ती ही एक पवित्र भावना आहे. आपल्या राष्ट्रावर परकीयांची हुकमत असू नये, असे प्रत्येक व्यक्तीस तीव्रतेने वाटते आणि म्हणूनच लोक परकीय आक्रमणांचा प्राणपणाने प्रतिकार करतात. पूर्वी भारतावर जेव्हा जेव्हा परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या, तेव्हा तेव्हा येथील राजे आणि सेनापती यांच्या नेतृत्वाखाली अनेकांनी आपले रक्त सांडले. भारतावर स्वाऱ्या करणाऱ्यांनी येथील संपत्ती लुटली, लोकांच्या कत्तली केल्या; पण अशा स्वाऱ्या करणारे परत गेले. काहीजण येथेच राहिले आणि भारतातील लोकांत एकरूप झाले.

ब्रिटिशांच्या आक्रमणाचे स्वरूप यापेक्षा अगदी वेगळे होते.

ब्रिटिश लोक व्यापारासाठी भारतात आले. ब्रिटिशांनी नफा मिळवण्यासाठी विविध मार्गांनी भारतातील संपत्तीची लूट करायला सुरवात केली. भारतातील व्यापारउद्योगांशी कराव्या लागणाऱ्या स्पर्धेमुळे अशी लूट करण्यात अडसर निर्माण होत होता. व्यापारात भारतीय कारागिरांची स्पर्धा राहू नये, यासाठी सर्व उपायांचा वापर करून येथील उद्योगधंदे इंग्रजांनी नष्ट केले.

ईस्ट इंडिया कंपनीने प्रथम बंगालमध्ये राजकीय सत्ता म्हणून पाय रोवले आणि पुढे हळूहळू आक्रमक स्वरूप धारण केले. ब्रिटिश साम्राज्यवादाचे हे स्वरूप येथील ठिकठिकाणच्या राजेरजवाड्यांच्या फार उशिरा लक्षात आल्यामुळे ब्रिटिशांना संघटित प्रतिकार झाला नाही. मराठे किंवा टिपू सुलतान अशा राज्यकर्त्यांनी ब्रिटिशांना विरोध केला; पण तो एकत्रित विरोध नव्हता. वेगवेगळ्या वेळी असा जो विरोध झाला, तो कवायती फौज आणि शस्त्रबळ यांच्या जोरावर ब्रिटिशांनी मोडून काढला.

ब्रिटिशांच्या धोरणाची झळ सामान्य लोकांना लागू लागली, त्यामुळे ब्रिटिशांविरुद्ध

असंतोष निर्माण होऊ लागला. १८५७ पूर्वी महाराष्ट्रात झालेले उमाजी नाईक यांचे बंड, तसेच कोल्हापूर येथील गडकऱ्यांचे बंड ही अशा असंतोषाची उदाहरणे आहेत. बिहारमधील संथाळ आदिवासींनीही ब्रिटिशांच्या विरुद्ध लढा दिला होता. त्याचप्रमाणे वहाबी या मुस्लिम पंथाच्या लोकांनीही असा लढा दिला होता. परंतु या सर्व लढ्यांच्या मागे केवळ इंग्रजांबद्दलचा राग होता आणि या लढ्यांचे स्वरूप स्थानिक, मर्यादित होते. त्यामुळे ब्रिटिशांनी या छोट्या बंडांचा सहज बीमोड केला.

भारतीय जनता पराक्रमात कमी नसूनही ब्रिटिशांनी भारत जिंकला, याचे एकमेव कारण म्हणजे इंग्लंड हे आधुनिक राष्ट्र होते. आधुनिक ज्ञान आणि आधुनिक शस्त्रास्त्रे यांच्या जोरावर ब्रिटिशांनी राजसत्ता बळकावली. ब्रिटिश राजवटीचे हे स्वरूप बंगालमधील एक थोर नेते, राजा राममोहन रॉय यांच्या लक्षात आले आणि त्यांनी भारतीय जनतेला नव्या विचारांचा प्रकाश दिला. ब्रिटिश हे आधुनिक जगाचे प्रतिनिधी आहेत, हे त्यांनी ओळखले. शास्त्रीय विचारांचा आणि ज्ञानाचा उपयोग करून आपल्या समाजात सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे, अशी राममोहन रॉय यांची भूमिका होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर भारतातील समाजाची पुनर्रचना केली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती; म्हणून सतीबंदी, शिक्षण यांसारख्या सुधारणांना राजा राममोहन रॉय यांनी सतत पाठिंबा दिला. भारतीयांना पारंपरिक धार्मिक शिक्षण देण्यापेक्षा आधुनिक पाश्चिमात्य शास्त्रीय शिक्षण द्यावे, असा त्यांचा आग्रह होता. सर्व लोकांमध्ये एकता नांदावी, कोणीही जन्मावरून उच्चनीच ठरू नये, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजाच्या प्रगतीआड येणाऱ्या रूढी आणि परंपरा यांना त्यांनी कसून विरोध केला. त्यांच्या या कार्याला देशातील अनेक विचारवंतांनी हातभार लावला.

समाजसुधारकांच्या या प्रयत्नांना इंग्रजांच्या शिक्षणविषयक धोरणामुळे फार मोठा हातभार लागला. भारतीयांना इंग्रजी किंवा पाश्चात्त्य शिक्षण देण्याचा निर्णय लॉर्ड मेकॉलेच्या मदतीने गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिंकने घेतला. त्याच्या मागे इंग्रजी राज्य चालवण्यासाठी आवश्यक असणारा नोकरवर्ग तयार करणे, हा हेतू होता. परंतु त्याचा परिणाम भारतीयांच्या विचारात फार मोठा फरक पडण्यात झाला. स्वातंत्र्य, समता, लोकशाही यांसारख्या कल्पना त्यांच्या मनात रुजल्या. म्हणूनच पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी पाश्चिमात्य शिक्षणाला 'वाघिणीचे दूध' असे म्हटले. या शिक्षणामुळे नवे शास्त्रीय विचार, स्वतःच्या बुद्धीवरचा वाढता विश्वास आणि देशाविषयीचा अभिमान हे महत्त्वाचे गुण वाढीस लागले. शिवाय इंग्रजी भाषेमुळे देशातील विविध भागांतील लोकांना विचारांची देवाणघेवाण करता येऊ लागली, ते एकत्र येऊ लागले, ते वगेळेच.

महाराष्ट्रात लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या अनेक विचारवंतांनी समाजाला जागे करण्यासाठी प्रयत्न केले. भारतातील स्त्रिया, अस्पृश्य व

शेतकरी यांची जी हलाखीची स्थिती होती, त्याविरुद्ध म. फुल्यांनी लढा पुकारला. माणसाला माणसाच्या बंधनातून व दास्यातून मुक्त करण्यासाठी फुल्यांनी विविध प्रकारे प्रयत्न केले. रानडे यांनी समाजाला विवेकाने वागायला आणि विचार करायला शिकवले. लोकहितवादींनी समाजाच्या उणिवांवर बोट ठेवून त्याविरुद्ध टीकेचा भडिमार केला. हे करत असताना त्यांच्या डोळ्यांसमोर स्वतंत्र भारतातील समाजाचे एक भव्य स्वप्न उभे होते.

समाज सुधारणेबरोबरच देशात राजकीय सुधारणाही झाल्या पाहिजेत, असे या विचारवंतांचे मत होते. राजकीय सुधारणेसाठी लोकांना विचारांचे आणि उच्चारांचे स्वातंत्र्य आवश्यक असते, याची जाणीव भारतीयांना प्रथम राजा राममोहन रॉय यांनी करून दिली. वर्तमानपत्र हे लोकांशी संवाद साधण्याचे शक्तिशाली साधन आहे, असे लोकहितवादींचे मत होते. राममोहन रॉय यांनी लोकजागृतीसाठी 'संवादकौमुदी' नावाचे बंगाली वृत्तपत्र सुरू केले होते. त्याचप्रमाणे बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' नावाचे मराठी वार्तापत्र सुरू केले. पुढे जेव्हा ब्रिटिशांनी देशी वर्तमानपत्रांवर काही निर्बंध घातले, तेव्हा संतापून राममोहन रॉय यांनी 'संवादकौमुदी' बंद केले आणि आपला निषेध नोंदवला.

नव्या शिक्षणामुळे व नव्या विचारांमुळे लोक शहाणे होतील, मग त्यांना स्वतःच्या देशाचा कारभार स्वतःच करावा, असे साहजिकच वाटेल; आपल्या देशात आपले राज्य असावे, असे त्यांना वाटेल. इंग्रजांनी विरोध केला, तरीही लोक त्याला जुमानणार नाहीत; आणि आज नाही, तरी दोन-एकशे वर्षांनी भारत इंग्रजी दास्याच्या जोखडातून सुटेलच, असा विश्वास समाजाला जागे करणाऱ्या या सुधारकांना वाटत होता. मात्र त्यासाठी लोकांनी शहाणे होणे, नव्या विचारांचा वापर करणे आणि जुन्या रुढी आणि खुळ्या समजुती टाकून देणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते.

भारतीय समाजाला अशी जाग येत असतानाच ब्रिटिशांनी देशभर आपली सत्ता असावी, आपले एकछत्री राज्य व्हावे, यासाठी आक्रमक धोरण स्वीकारले. क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, वेलस्ली आदींनी सर्व भल्याबुऱ्या मार्गांनी भारतात असलेल्या राजवटी नष्ट करून आपली सत्ता स्थापन केली. याच आक्रमक धोरणाचा अवलंब करून लॉर्ड डलहौसीने अनेक संस्थाने खालसा केली. १८१८ साली इंग्रजांनी पेशव्यांचा पराभव केल्यानंतर दुसरा बाजीराव पेशवा उत्तरेस ब्रम्हावर्तास निघून गेला. त्याच्या मृत्यूनंतर पेशव्यांना दिला जाणारा तनखा डलहौसीने बंद केला. त्याचप्रमाणे उत्तरेकडील मोठ्या जमीनदारांच्या अनेक जहागिरीही इंग्रजांनी बळकावल्या. झाशी या संस्थानाला वारस नसल्यामुळे ज्या वेळी डलहौसीने ते संस्थान खालसा करण्याचा निर्णय घेतला, त्या वेळी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी प्राणपणाने प्रतिकार करायचे ठरवले आणि 'मेरी झाँसी नहीं दूँगी', असे तेजस्वी उद्गार काढले.

ज्या भारतीय सैनिकांच्या जिवावर ब्रिटिश सरकार येथील विरोध नष्ट करून सत्ताविस्तार करत होते, त्या सैनिकांतही असंतोष धुमसत होता. भारतीयांना कमी लेखण्याची ब्रिटिशांची वृत्ती सैनिकांविषयीही होतीच. त्यांना पगार कमी, भत्ते कमी, कष्टाची कामे जास्त, धोक्याच्या ठिकाणी त्यांची नियुक्ती होत असे. एवढे करूनही भारतीयांना सैन्यात अधिकार कमी आणि बढती जवळ जवळ नाहीच ! अशा असंतुष्ट सैनिकांनी इंग्रजांविरुद्ध एक उठाव केला, तो मद्रास इलाख्यात वेल्लोरजवळ. हा उठाव ब्रिटिश सरकारने मोडून काढला, परंतु उठावाचे कारण दूर झाले नाही.

ब्रिटिश सेनेमध्ये नोकरी करणाऱ्या भारतीय सैनिकांच्या मनातला तीव्र असंतोष तसाच राहिला. आपण परकीयांची नोकरी करतो, ही अंत:करणाला असलेली टोचणी व या नोकरीत ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून होणारा पक्षपात आणि अपमान यांमुळे भारतीय सैनिकांच्या मनांत संताप उसळलेला होता. भारतीय सैनिकांच्या धर्मभावनाही ब्रिटिशांनी दुखावल्या आणि अखेर हातामध्ये शस्त्र असलेल्या या सैनिकांनी बंड करण्याचा निर्णय घेतला. सत्ता हातातून गेलेले भारतातील सत्ताधीश आणि असंतुष्ट सैनिक हे दोन प्रवाह एकत्र होऊन १८५७ चे पहिले स्वातंत्र्यसमर सुरू झाले.

२९ मार्च, १८५७ ला मंगल पांडे या भारतीय सैनिकाने ब्रिटिश अधिकाऱ्यावर पहिली गोळी झाडली. त्याला लष्करी कोर्टाने फाशीची शिक्षा फर्मावली. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील हा पहिला हुतात्मा. १० मे, १८५७ ला भारतीय सैनिकांनी बंडाचे निशाण फडकावले. हे सैनिक दिल्लीस पोहोचले आणि दिल्लीचा बादशहा बहादूरशहा याला त्यांनी या स्वातंत्र्ययुद्धाचे नेतृत्व करण्याची विनंती केली. बहादूरशहाने हे नेतृत्व स्वीकारून हिंदू व मुसलमान यांना ब्रिटिशांच्या विरुद्ध लढण्याचे आवाहन केले. हा उठाव अयोध्या, रोहिलखंड, बुंदेलखंड आणि नर्मदेचा परिसर येथे एकाच वेळी पसरला. बेगम हजरत महल, कुंवरसिंग, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, मौलवी अहमदउल्ला, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी या लढ्याचे नेतृत्व केले. स्वातंत्र्यासाठी केलेल्या या उठावाच्या पूर्वार्धात भारतीय सैनिकांनी आक्रमक पवित्रा घेतला. जनतेचाही या उठावास पाठिंबा मिळाला. परंतु उठावाच्या उत्तरार्धात मात्र ब्रिटिशांनी आधुनिक शस्त्रे, युद्धतंत्र आणि संघटनकुशलता यांच्या जोरावर हा उठाव मोडून काढला. ब्रिटिशांनी हल्ला करून दिल्ली परत जिंकून घेतली. लोकांना दहशत बसावी, यासाठी निर्दयपणे कत्तली केल्या. उठावाचे काही नेते ठार झाले. काहींना फाशी देण्यात आले. काहींना हद्दपार करण्यात आले, तर काही परागंदा झाले. झाशीची राणी लक्ष्मीबाई विजेप्रमाणे चमकून गेली. लढता लढता तिने मरण पत्करले.

१८५७ च्या उठावास ब्रिटिशांनी जरी 'शिपायांचे बंड' असे संबोधले, तरी या उठावात जे बलिदान झाले, त्यामुळे भारतीयांच्या मनात देशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली.

सशस्त्र उठावाचा हा पहिला देशव्यापी प्रयत्न फसला, तरी काहीजणांना मात्र याच मार्गाने ब्रिटिशांशी दोन हात करता येतील, असे वाटत होते. महाराष्ट्रातील वासुदेव बळवंत फडके यांनी हाच मार्ग स्वीकारला. आपल्या देशबांधवांचे दुष्काळातील हाल आणि उपासमार पाहून संतप्त झालेल्या या तरुण देशभक्ताने रामोशी, भिल्ल आदी समाजांतील तरुण गोळा करून ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र बंड करण्याचा प्रयत्न १८७९ साली केला. वासुदेव बळवंत फडके यांच्या साहसाच्या वार्ता देशभर पसरल्या. इतकेच नव्हे, तर इंग्लंडमधील वर्तमानपत्रांनीही त्यांना प्रसिद्धी दिली; परंतु हा प्रयत्न अयशस्वी होऊन फडके पकडले गेले. त्यांना काळ्यापाण्याची शिक्षा होऊन एडनला पाठवण्यात आले आणि त्यांचा तेथेच तुरुंगात अंत झाला.

## २. राष्ट्र संघटित होऊ लागले

ब्रिटिश सत्तेबरोबर शस्त्रांच्या साह्याने लढता येणार नाही, हे ज्यांनी ओळखले, ते निराश झाले नाहीत. आपण ब्रिटिशांप्रमाणे सामाजिक व राजकीय संस्था निर्माण केल्यावरच स्वातंत्र्याच्या दिशेने प्रगती होऊ शकेल, ही जाणीव विचारवंतांमध्ये निर्माण झाली. भारतातील वेगवेगळ्या भागांत नवी राजकीय जाणीव निर्माण होऊ लागली. मुंबई येथील 'बाॅम्बे असोसिएशन', बंगालमधील 'दि इंडियन असोसिएशन', पुण्यातील 'सार्वजनिक सभा', चेन्नईमधील 'महाजन सभा' यांसारख्या संख्या आणि 'बंगाली', 'प्रभाकर', 'हिंदू' यांसारखी वृत्तपत्रे यांच्यामुळे लोकांमध्ये राजकीय जागृती होऊ लागली.

राजकीय जागृतीबरोबरच लोकांना आपल्या दारिद्र्याचीही जाणीव होऊ लागली. इंग्रज सत्ताधीश आपली आर्थिक पिळवणूक करतात, हे लोकांच्या लक्षात येऊ लागले. भरमसाट शेतसारा घेऊन सरकार शेतकऱ्याला नागवत होते. भारतीय उद्योगधंद्याची जाणूनबुजून गळचेपी केली जात होती. गरीब जनता आणखीनच गरीब होत होती. दुष्काळांचे प्रमाण वाढतच होते. त्याचबरोबर सरकारचा बेफिकीरपणाही वाढत होता. ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक शोषण कसे चालवले आहे आणि त्यामुळे येथील दारिद्र्य कसे वाढत आहे, हे दादाभाई नौरोजी यांनी लोकांना समजावून दिले; आणि ब्रिटिशांनी भारताची ही लूट चालू ठेवली, तर लोक त्याविरुद्ध लढा करतील, असा इशाराही त्यांनी राज्यकर्त्यांना दिला.

लोकसेवा करून, लोकांचे शिक्षण करण्यासाठी अनेक नवीन संस्था स्थापन करणे, हे कार्य या कालखंडात महाराष्ट्रात मुख्यतः न्यायमूर्ती रानडे यांनी केले. सतत देशाची

काळजी करणाऱ्या या थोर पुरुषाने थंडगार पडलेल्या आपल्या समाजाला नवचैतन्य दिले. 'सार्वजनिक सभा' ही संस्था स्थापन करून लोकांच्या अनेक गाऱ्हाण्यांना वाचा फोडली. या कामात गणेश वासुदेव जोशी यांनी रानडे यांना उत्तम साथ दिली. जोशी यांनी 'सार्वजनिक सभे'च्या द्वारा केलेल्या लोकसेवेमुळे लोक त्यांना 'सार्वजनिक काका' म्हणून ओळखू लागले. न्या. रानडे यांनी आपल्या देशातील दारिद्र्य नष्ट होण्यासाठी उद्योगधंदे वाढले पाहिजेत आणि लोकांनी स्वदेशी वस्तू वापरल्या पाहिजेत, अशी शिकवण दिली.

समाजात वाहू लागलेल्या या वाऱ्यांचा परिणाम तरुण पिढीवर, विशेषतः कॉलेजमध्ये शिकताना नवे विचार ग्रहण करणाऱ्या विद्यार्थ्यांवर होत होता. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असलेले दोन विद्यार्थी आपल्या देशासाठी आपण काय केले पाहिजे, याची सतत चर्चा करत. हे दोघेही विद्यार्थी त्यांच्या मित्रांमध्ये हुशार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्यांतील एक-बाळ गंगाधर टिळक हा गणिताचा, तर दुसरा - गोपाळ गणेश आगरकर हा तत्वज्ञानाचा विद्यार्थी होता. या दोघाही तरुण विद्यार्थ्यांना आपला देश स्वतंत्र नाही, याची मोठी खंत वाटत असे. पदवीधर झाल्यावर मोठ्या पगाराची नोकरी मिळवावी, असे स्वप्न त्या वेळचे अनेक विद्यार्थी मनाशी रंगवत असत, पण टिळक आणि आगरकर या दोघांच्या मनातील स्वप्न अगदी वेगळे होते. भारत स्वतंत्र व्हावा, देशातील दारिद्र्य नष्ट व्हावे, अज्ञान नाहीसे होऊन ज्ञानाच्या प्रकाशाने समाज उजळून जावा, असे स्वप्न हे दोघेजण आपल्या मनात रंगवत होते. हे स्वप्न खरे व्हायचे असेल, तर आपल्याला स्वतःचा, नोकरीचा, आपल्या कुटुंबीयांचाही विचार करता येणार नाही, याची टिळक आणि आगरकरांना कल्पना होती.

आगरकरांनी आपल्या आईला पत्रात लिहिले होते :

''आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई, तू करीत असशील, पण मी आताच तुला सांगून टाकतो, की विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हाव न धरता मी फक्त पोटापुरत्या पैशांवर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार.''

त्या वेळी टिळक आणि आगरकर यांच्यासमोर दोन मार्ग होते. एक - न्या. महादेव गोविंद रानडे यांचा आणि दुसरा विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा. न्या. रानडे हे सरकारी नोकरीत असतानाही, लोकशिक्षण करत होते आणि देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सार्वजनिक सभेसारख्या संस्था काढत होते. टिळक व आगरकरांना न्या. रानडे यांच्याबद्दल मोठा आदर वाटत असे; परंतु सरकारी नोकरीच्या बंधनात राहून काम करण्याची कल्पना त्यांना रुचत नव्हती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले'तून

देशाभिमानाची तुतारी फुंकली होती. या तुतारीचे पडसाद टिळक आणि आगरकर या दोन तरुणांच्या मनांत उमटत होते. 'राजकीय चळवळ आधी करावी, की सामाजिक चळवळ' या विषयावर अनेक दिवस चर्चा केल्यावर टिळक, आगरकर यांच्या लक्षात आले, की कोणतीही चळवळ करण्यापूर्वी समाजाचे शिक्षण केले पाहिजे. या मार्गाने एकत्र राहून काम करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

संस्कारक्षम वयाच्या विद्यार्थ्यांच्या मनावर देशाभिमानाचे संस्कार शिक्षणाच्या द्वारा करायचे, असे त्यांनी ठरवले. पुण्यामध्ये चिपळूणकर, आगरकर, टिळक आणि नामजोशी यांनी प्रथम न्यू इंग्लिश स्कूलची आणि नंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटीची व फर्गसन कॉलेजची स्थापना केली. सर्वसामान्य लोकांचे शिक्षण करून त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची आकांक्षा जागृत करण्यासाठी त्यांनी 'केसरी' हे मराठीतील आणि 'मराठा' हे इंग्रजीतील साप्ताहिक सुरू केले.

देशाच्या वेगवेगळ्या भागांत समाजाला जागे करून नव्या विचारांची शिकवण विविध संस्थांच्या द्वारा देणाऱ्या, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, फिरोजशहा मेथा आदी नेत्यांना राजकीय कार्य करण्याची आवश्यकता तीव्रतेने वाटू लागली. त्यांनी एकत्र विचारविनिमय करून राष्ट्रीय पातळीवर राजकीय संघटना निर्माण करण्याचा निर्धार केला. ए. ओ. ह्यूम या निवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याने या प्रक्रियेस गती दिली. भारतीय जनतेला राजकीय हक्क मिळवण्यासाठी राष्ट्रीय व्यासपीठ निर्माण करण्याचे ठरले. यासाठी भारतीय राष्ट्रीय सभा (इंडियन नॅशनल काँग्रेस) स्थापन करून या सभेचे पहिले अधिवेशन १८८५ च्या डिसेंबरात पुण्याला घेण्याचे ठरले. पुण्याच्या सार्वजनिक सभेने या अधिवेशनाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली; परंतु दुर्दैवाने पुण्याला कॉलऱ्याची साथ सुरू झाली. तेव्हा हे अधिवेशन मुंबईला घेण्याचे ठरले. अधिवेशनासाठी अखिल भारतातून आलेले ७२ प्रतिनिधी सोमवार दि. २८ डिसेंबर, १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयात जमले. अध्यक्षस्थानी व्योमेशचंद्र बानर्जी होते. भारताच्या मुक्तीसाठी कराव्या लागणाऱ्या संघटित राष्ट्रीय आंदोलनाच्या पहिल्या पर्वास सुरवात झाली.

आपल्या देशाच्या उत्कर्षासाठी परकीय सरकारविरुद्ध झगडा देणे जसे आवश्यक होते, तसेच लोकसेवेचे कार्य करणे आणि लोकांना देशभक्तीचा मार्ग दाखवणे आवश्यक होते. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वीच काही व्यक्तींनी व संस्थांनी हे कार्य हाती घेतले होते.

ब्रिटिशांनी भारत जिंकल्यावर भारतीयांच्या मनातील आत्मविश्वास फार कमी झाला होता. उत्कट राष्ट्राभिमान निर्माण करण्यासाठी भारताच्या देदीप्यमान जीवनाचे दर्शन कोणीतरी घडवणे आवश्यक होते. हे महान कार्य करणाऱ्या देशभक्तांमध्ये स्वामी

विवेकानंदांचे स्थान महत्त्वाचे आहे. अमेरिकेत जाऊन शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेत विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीचे उदात्त स्वरूप जगापुढे ठेवले. त्यांनी भारतात आल्यावर स्थापन केलेल्या 'रामकृष्ण मिशन' या संस्थेने लोकसेवा हाच धर्म मानून सामाजिक कार्याला हरप्रकारे गती दिली.

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेमुळे भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाला संघटनात्मक स्वरूप प्राप्त झाले. कोलकत्याला १८८६ च्या डिसेंबरमध्ये राष्ट्रीय सभेचे दुसरे अधिवेशन भरले. अध्यक्षस्थानी दादाभाई नौरोजी होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात भारताच्या दारिद्र्याची भीषणता स्पष्ट करून ब्रिटिश राजवटीचे दुष्ट स्वरूप जगापुढे मांडले. राष्ट्रीय सभेच्या पहिल्या दशकात तिचे कार्य धीमेपणाने पण सातत्याने सुरू होते.

राष्ट्रीय आंदोलनाच्या पहिल्या पर्वात राष्ट्रीय सभेच्या कामावर शहरी मध्यमवर्गीय सुशिक्षित नेतृत्वाचा प्रभाव होता. कायद्याच्या चौकटीत राहून अर्ज-विनंत्यांचे नेमस्त राजकारण करण्यावर राष्ट्रीय सभेचा भर होता. दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, सुरेंद्रनाथ बानर्जी, फिरोजशहा मेथा, दिनशा वाच्छा, बद्रुद्दीन तय्यबजी, गोपाळ कृष्ण गोखले आदी नेत्यांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. ब्रिटिशांकडे निवेदने सादर करून, शिष्टमंडळे नेऊन राजकीय हक्कांची मागणी नेमस्तपणे करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. भारताच्या राज्यकारभारात हिंदी प्रतिनिधींना वाटा मिळावा, येथील नोकरशाहीत हिंदी लोकांना प्रवेश असावा, सनदी नोकरीच्या परीक्षा इंग्लंड व भारत या दोन्ही देशांत एकाच वेळी घेतल्या जाव्यात, अशा काही मागण्या मांडायला राष्ट्रीय सभेने सुरुवात केली.

भारतीय जनतेच्या हाती टप्प्याटप्प्याने राज्यकारभार यावा, या रोखाने राष्ट्रीय सभेची वाटचाल चालू होती. मात्र अशा राजकारणाला ब्रिटिश सरकारकडून मिळणारा प्रतिसाद अगदीच संथ आणि अपुरा होता. सुरुवातीला राष्ट्रीय सभेच्या कार्याचे स्वागत करण्याची ब्रिटिश सरकारची भूमिका होती; पण राष्ट्रीय सभेला समाजाकडून मिळणाऱ्या वाढत्या पाठिंब्यामुळे सरकार सावध झाले. आता सरकारचे धोरण राष्ट्रीय सभेची अडवणूक करण्याचे होते. सरकारच्या या भूमिकेमुळे राष्ट्रीय सभेचे कार्य अधिक जहाल बनू लागले.

ब्रिटिशांकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून परदेशी मालाऐवजी स्वदेशी मालाचा वापर करण्याची आवश्यकता काही नेत्यांना वाटू लागली. संपूर्ण स्वातंत्र्य हे तेव्हा राष्ट्रीय सभेचे ध्येय नव्हते, पण देशाच्या राज्यकारभारात भारतीयांना मर्यादित सत्ता तरी मिळावी, असे नेमस्त नेत्यांना वाटत होते. विविध राजकीय मागण्या राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर मांडल्या जाऊ लागल्या.

राष्ट्रीय सभेचे एक थोर नेते म्हणजे गोपाळ कृष्ण गोखले. उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा त्यांच्या मनावर मोठा प्रभाव होता. भारताला राजकीय हक्क मिळाले पाहिजेत, भारताची बाजू अभ्यासपूर्ण रीतीने आणि प्रभावीपणे ब्रिटिश राज्यकर्त्यांसमोर मांडल्यास हे हक्क हप्त्याहप्त्याने प्राप्त होतील, असा गोखले यांना विश्वास वाटत असे. गोखले यांचे इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व होते. अर्थशास्त्राचाही त्यांचा मोठा अभ्यास होता. केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य म्हणून गोखले यांनी फार मोठी कामगिरी केली. भारताच्या आर्थिक प्रश्नांवरील त्यांची भाषणे अत्यंत मार्मिक असत. त्यांनी मांडलेले शिक्षणविषयक विधेयकही फार महत्त्वाचे होते. सरकारसमोर तर्कसंगत रीतीने भारताची बाजू मांडणे, वेगवेगळ्या समित्यांना अभ्यासपूर्ण निवेदने सादर करून लोकांना अधिकाधिक राजकीय हक्क मिळाले पाहिजेत, असे प्रतिपादन करणे, हे कार्य ना. गोखले यांनी अत्यंत कुशलतेने व प्रभावीपणे केले. त्यांची उज्ज्वल देशभक्ती, निष्कलंक चारित्र्य आणि व्यासंगी वृत्तीने विविध प्रश्नांबाबत भारताच्या आकांक्षा व्यक्त करण्याचे त्यांचे सामर्थ्य, यामुळे गोखले यांना अखिल भारतीय राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

१९०५ साली 'भारत सेवक समाजा'ची स्थापना करून गोखले यांनी निःस्वार्थी वृत्तीने देशसेवा करणारे कार्यकर्ते तयार करून त्यांना विधायक कार्य करण्याची शिकवण दिली.

# ३. राष्ट्रव्यापी लढ्याकडे

लोकमान्य टिळक आणि गोखले हे एकाच ध्येयाने प्रेरित झाले होते; परंतु दोघांची काम करण्याची पद्धत निराळी होती. दोघांचे दृष्टिकोनही वेगळे होते. स्वातंत्र्यचळवळीच्या सुरुवातीस नेमस्त वृत्तीनेच काम केले पाहिजे, असे गोखल्यांना वाटत असे. गोखले यांच्या कार्याचे मोठेपण लो. टिळकांना मान्य होते, तरी गोखल्यांची भूमिका मवाळ आहे, असे त्यांना वाटत असे. राजकीय हक्क मिळवण्यासाठी केवळ अर्ज, विनंत्या करून चालणार नाही, राजकीय मागण्यांच्या मागे जनतेचे सामर्थ्य उभे केले, तरच ब्रिटिश राज्यकर्ते या मागण्या मान्य करतील, ही टिळकांची भूमिका होती. मूठभर बुद्धिमंतांचे राजकारण मान्यता पावले, तरी ते यशस्वी होणार नाही, त्यासाठी चळवळीच केल्या पाहिजेत, असे टिळकांचे मत होते. अशी चळवळ उभी करण्यापूर्वी लोकांचा स्वाभिमान जागृत केला पाहिजे आणि ब्रिटिशांचे अंधानुकरण करण्याची वृत्ती घालवली पाहिजे, ही खूणगाठ मनाशी बांधून टिळकांनी कार्याला सुरुवात केली.

इतिहासापासून जनतेला स्फूर्ती मिळेल, असा विश्वास टिळकांना वाटत होता. त्यातूनच टिळकांनी शिवाजी-उत्सव सुरू केला. टिळकांना लोकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला. लोक उत्सवप्रिय असतात, हे टिळकांनी बरोबर ओळखले आणि या उत्सवांचे स्वरूप पालटून लोकजागृतीसाठी त्यांचा उपयोग करून घ्यायचा, असे त्यांनी ठरवले.

गणपतीचा उत्सव घरोघर होत असे. त्याचे स्वरूप सार्वजनिक करून त्या निमित्ताने व्याख्याने, पोवाडे, मेळे आदी साधनांनी राजकीय जागृती करण्याच्या कार्यक्रमासही लोकांनी प्रचंड प्रमाणावर साथ दिली.

याचबरोबर टिळकांनी सार्वजनिक सभेच्या द्वारा लोकांच्या न्याय्य मागण्यांसाठी कायद्याच्या चौकटीत राहून खंबीरपणे लढा द्यायचे ठरवले.

१८९६ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला, त्या वेळी टिळकांनी शेतकऱ्यांत जागृती घडवून आणून असा लढा उभारला. सरकार त्यामुळे चिडून गेले. कायद्याच्या चौकटीत राहून जनआंदोलन करण्याचे टिळकांचे तंत्र अभिनव होते.

कसोटीचे क्षण एकामागोमाग आले.

महाराष्ट्रातील दुष्काळानंतर १८९७ साली पुण्यात प्लेगच्या साथीने कहर केला. या साथीत अनेक लोक मरण पावले. या वेळी टिळकांनी पुढाकार घेऊन लोकांना मदत करण्याचे व धीर देण्याचे कार्य केले. सरकारनेही प्लेगविरोधी उपाययोजना केली आणि हे काम रँड या अधिकाऱ्याकडे सोपवले. ब्रिटिश सैनिकांनी केलेल्या अतिरेकी वर्तनामुळे पुण्यातील नागरिक आणि विशेषतः तरुण अतिशय संतप्त झाले. यांमध्ये पुण्याजवळ चिंचवड या गावी राहणारे दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव हे चापेकर बंधू होते. पुण्यातील प्लेगच्या साथीतील अत्याचारांचा बदला म्हणून या क्रांतिकारकांनी रँडच्या खुनाचा बेत आखला. २२ जून, १८९७ ला व्हिक्टोरिया राणीच्या राज्याभिषेकाच्या हीरक महोत्सवानिमित्त एक मेजवानी झाली. ही मेजवानी आटोपून रँड हा घोडागाडीतून परत जात असताना दामोदर चापेकर यांनी वाटेत गोळ्या घालून त्याला ठार मारले.

या घटनेमुळे सरकार हादरले आणि संतप्तही झाले. सर्व तऱ्हेचा धाकदपटशा व जुलूम सुरू झाला. अनेक निरपराध लोकांचा छळ करण्यात आला. चापेकर बंधूंवर खुनाचा आरोप सिद्ध होऊन त्या तिघांही भावांना फाशी देण्यात आले.

चापेकर बंधूंच्या धैर्यामुळे व त्यागामुळे लोकांची अंतःकरणे हेलावून गेली.

टिळकांनी 'केसरी'त अग्रलेख लिहून खुनाचा धिक्कार केला; परंतु त्याचबरोबर सरकारने लोकांचा अकारण छळ करू नये, असा इशारा देणारा 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' हा खरमरीत अग्रलेखही लिहिला. टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. टिळकांचा रँडच्या खुनाच्या कटाशी संबंध दाखवणारा कोणताही पुरावा सरकारला मिळाला नाही. राजद्रोहाच्या खटल्यात मात्र टिळकांना न्या. स्ट्रॅची यांनी दीड वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. 'सर्व राष्ट्र आज अश्रू ढाळत आहे', अशा हृदयस्पर्शी शब्दांत सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी राष्ट्रावर झालेल्या या वज्राघाताचे वर्णन केले.

अखंड ज्ञानोपासना करणाऱ्या टिळकांची सुटका करावी, अशी विनंती करणारे निवेदन जर्मन पंडित मॅक्समुलर यांनी भारतमंत्र्यांना दिले.

अखेर ११ महिने तुरुंगवास भोगल्यावर लोकमान्य टिळकांची कारावासातून सुटका झाली. सुटून आल्यानंतर टिळकांनी सतत जहाल राष्ट्रवादी भूमिका मांडली आणि त्यांचे नेमस्त पुढाऱ्यांबरोबर मतभेद होऊ लागले.

राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर भारताच्या सर्व भागांतील कार्यकर्ते धर्म, जात, भाषा आदी भेद विसरून एकत्र येऊ लागले आणि त्यामुळे 'सर्व भारतीय एक आहेत, ही भावना जनतेत रुजू लागली. ब्रिटिशांना नेमके हेच नको होते. विशेषत: हिंदू व मुसलमान यांचे ऐक्य झाले, तर ब्रिटिश साम्राज्य धोक्यात येईल, हे ते जाणत होते. म्हणून हिंदू व मुसलमान यांच्यामध्ये दुहीचे बीज पेरण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले.

१८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी प्रथम काही वर्षे हिंदूंमधील श्रीमंत सावकारांना जवळ केले. नंतर मुस्लिम समाजातील नेत्यांना हिंदू पुढाऱ्यांपासून दूर करण्याचे कारस्थान सुरू केले. 'मुस्लिम समाजाने आधुनिक शिक्षण घ्यावे', असा आग्रह धरून त्यासाठी प्रयत्न करणारे सर सय्यद अहमद हे पुरोगामी विचारांचे होते. हिंदू-मुसलमानांनी एकीने राहिले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती; परंतु त्यांच्या अलिगड येथील कॉलेजला खास मदत देऊन काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी 'हिंदूंपासून वेगळे राहण्यातच मुसलमानांचे हित आहे', असे त्यांच्या मनावर बिंबवले. दुर्दैवाने सर सय्यद अहमद यांनी ही भूमिका स्वीकारून पुढे राष्ट्रीय सभेस कडवा विरोध केला.

'फोडा आणि झोडा' या कुटिल धोरणाचा अवलंब करून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी हिंदू व मुसलमान यांच्यात कलह निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

कर्झन हा कडवा साम्राज्यवादी व्हाइसरॉय होता. बंगाल प्रांताची फाळणी करून तेथील हिंदू व मुसलमान समाजांमध्ये कायमचे भांडण पेटवण्याचा त्याने निश्चय केला. बंगालमधील राजकीय जागृती आणि देशभर राष्ट्रीय सभेस मिळणारा पाठिंबा कर्झनला सहन होत नव्हता. राष्ट्रीय सभा नष्ट करावी आणि देशात दुही माजवून ब्रिटिश सत्ता जबरदस्त बळकट करावी, असे त्याला वाटत असे. या दुष्ट उद्देशानेच त्याने १९०५ साली बंगालची फाळणी केली; परंतु घडले, ते नेमके उलटेच. फाळणीमुळे सर्व बंगाली जनतेत ऐक्याची भावना निर्माण झाली. बंगालच्या फाळणीमुळे सर्व लोक खवळून उठले आणि त्यांनी फाळणीला तीव्र विरोध केला.

लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल या तीन जहाल नेत्यांनी कर्झनचा कावेबाज हेतू ओळखला. 'बंगालची फाळणी हा केवळ बंगालवर झालेला अन्याय नसून भारतावर झालेला आघात आहे', ही जाणीव त्यांनी देशातील जनतेला दिली.

जनतेच्या या क्षुब्ध झालेल्या भावना दंगाधोप्याच्या मार्गाने व्यक्त न होता सनदशीर रीतीने पण तीव्रतेने व्यक्त व्हाव्यात, यासाठी लाल-बाल-पाल यांनी प्रयत्न केले. 'स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य' असा चतु:सूत्री कार्यक्रम काँग्रेसने लोकांसमोर ठेवला आणि सर्वसामान्य माणसाला चळवळीत सहभागी करून घेतले.



निदर्शन-बंदीचा निषेध, पुणे



लाल - बाल - पाल

'स्वदेशी' या कार्यक्रमातून जहाल नेत्यांना लोकांमध्ये स्वावलंबनाची भावना व आत्मविश्वास जागृत करायचा होता. बंगालमध्ये अल्प काळातच स्वदेशी ही घोषणा न राहता ती मूर्त स्वरूपात आली. कापडाच्या गिरण्या, साबण व आगपेट्यांचे कारखाने सुरू करण्यासाठी भांडवल गोळा करण्यात आले. आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांनी 'बेंगाल केमिकल स्वदेशी स्टोअर्स' उघडून भारतीय रसायन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली.

'बहिष्कार' या कार्यक्रमाची सुरुवात देशभर तरुणांनी परदेशी कापडाची होळी करून केली. या कार्यक्रमास उत्स्फूर्त व प्रचंड प्रतिसाद मिळाला. मँचेस्टरला तयार झालेले कापड हे ब्रिटिश सत्तेचे प्रतीक आहे. ते कापड जाळल्याने, ब्रिटिशविरोधी चळवळीस तोंड फुटेल, हे लोकांनी ओळखले. मोठ्या उत्साहाने त्यांनी तो कार्यक्रम स्वीकारला आणि परदेशी मालावर बहिष्कार टाळला.

'राष्ट्रीय शिक्षण' या कार्यक्रमाद्वारे पाश्चिमात्य विज्ञानाबरोबरच भारतीयत्वाचे व राष्ट्रनिष्ठेचे संस्कार करणाऱ्या शाळा गावोगाव काढण्याचे धडक प्रयत्न सुरू झाले.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे पितामह दादाभाई नौरोजी यांनी १९०६ साली कोलकता येथील अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून काँग्रेसच्या व्यासपीठावरून 'स्वराज्य' हा शब्द प्रथम उच्चारला. लोकांना स्वराज्य मिळवण्याचे त्यांनी आवाहन केले. वंगभंगानंतर स्वराज्याच्या कल्पनेने भारतीय जनतेला प्रेरित केले. भारतात भारतीयांचे राज्य असावे, या मागणीमुळे देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला एक नवे परिमाण प्राप्त झाले.

अखेर ब्रिटिश सरकारला बंगालची फाळणी रद्द करावी लागली. वंगभंगाच्या वेळी शांततापूर्ण मार्गाने राष्ट्रव्यापी चळवळ उभी करून लाल-बाल-पाल यांनी स्वातंत्र्यचळवळीस गती दिली.

चळवळीत आलेल्या तरुणांना अरविंद घोष यांनी क्रांतिकारक मार्गानेच स्वातंत्र्य मिळेल, अशी शिकवण दिली. लोकमान्य टिळकांचा क्रांतीच्या तयारीस पाठिंबा होता; परंतु कोणत्याही अविवेकी व आततायी कृत्यास विरोध होता. लो. टिळक तरुणांना योग्य सल्ला देत आणि त्याचबरोबर त्यांना एकटे पडू द्यायचे नाही, हेही धोरण सांभाळीत. गोखले, फिरोजशहा मेथा यांचा तरुणांच्या जहाल भूमिकेस विरोध होता आणि टिळकांवरही त्यांचा रोष होता. हे मतभेद विकोपाला गेल्यामुळेच १९०७ मध्ये सुरत येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यांत फूट पडून काँग्रेस दुभंगली.

या अधिवेशनानंतर काही दिवसांनीच बिहारमधील मुझफ्फरपूर येथे खुदीराम बोस याने इंग्रजांविरुद्ध पहिला बाँब टाकला. खुदीराम बोस यास फाशीची शिक्षा झाली. ब्रिटिश

सरकारने जबरदस्त जुलूमशाही करून क्रांतिकारकांची चळवळ दडपून टाकली. त्याचप्रमाणे बाँब स्फोटाच्या संदर्भात 'केसरी'त आलेल्या लेखाच्या आधारे लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला. या खटल्यात टिळकांना सहा वर्षांची शिक्षा होऊन त्यांना मंडाले येथे तुरुंगात पाठवण्यात आले.

टिळकांनी कारावासात असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला.

टिळकांच्या असामान्य धैर्यामुळे आणि त्यागामुळे लोकांच्या अंत:करणात त्यांना अढळ स्थान प्राप्त झाले. टिळकांच्या अपूर्व देशभक्तीमुळे ते खरे 'लोकमान्य' झाले.

# ४. सशस्त्र प्रतिकार

भारतात स्वातंत्र्याची चळवळ वाढत असतानाच परदेशात आणि विशेषतः इंग्लंडमध्येही भारतीय स्वातंत्र्यसंग्रामासाठी प्रयत्न करणारे काही देशभक्त होते. त्यांच्यामध्ये श्यामजी कृष्ण वर्मा हे एक क्रांतिकारी मनोवृत्तीचे कार्यकर्ते होते. ते बॅरिस्टर होते आणि भारतात काही वर्षे सौराष्ट्रातील संस्थानांमध्ये दिवाण म्हणून काम केल्यावर ते इंग्लंडला गेले होते. तेथे त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचा प्रचार करण्यासाठी 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' नावाचे नियतकालिक सुरू केले. भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे आणि ते सशस्त्र मार्गाने मिळवण्याचाही भारतीयांना हक्क आहे, या मताचा प्रचार ते त्यामधून करू लागले. देशभक्त हिंदी तरुणांचा वर्ग निर्माण करण्यासाठी इंग्लंडमध्ये येणाऱ्या भारतीय तरुणांना शिष्यवृत्त्या देण्याची योजना श्यामजी कृष्ण वर्मा यांनी स्वतःच्या पैशांतून तयार केली. भारतीय विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्यासाठी त्यांनी लंडनमध्ये 'इंडिया हाऊस' सुरू केले. इंग्लंडमधील भारतीयांच्या क्रांतिकारी चळवळीचे उगमस्थान 'इंडिया हाऊस' हेच होते.

श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या सहकाऱ्यांमध्ये मॅडम कामा या तेजस्वी व तडफदार कार्यकर्त्या होत्या. त्यांनी अमेरिकेत दौरा करून भारतातील राजकीय परिस्थितीवर अनेक भाषणे केली आणि भारतीय स्वातंत्र्याचे जोरदार समर्थन केले. १९०७ साली जर्मनीमध्ये स्टुटगार्ट येथे भरलेल्या युरोपीय समाजवादी परिषदेत त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यचळवळीबद्दल अतिशय तळमळीने भाषण केले.

भाषणाच्या शेवटी मॅडम कामा यांनी स्वतः तयार केलेला भारताचा ध्वज परिषदेत फडकावला आणि त्यामुळे सर्व परिषद हेलावून गेली.

हा झेंडा फडकावताना मॅडम कामा म्हणाल्या,

''हा भारतीय स्वातंत्र्याचा झेंडा आहे. भारतीय हुतात्म्यांच्या रक्तामुळे या झेंड्याला पावित्र्य प्राप्त झाले आहे.''

श्यामजी कृष्ण वर्मा यांचे लेख आणि भारतीय क्रांतिकारकांच्या हालचाली यांमुळे इंग्लंडमधील कडव्या साम्राज्यवाद्यांचा त्यांच्यावर रोष झाला. त्यामुळे १९०७ च्या जून महिन्यात श्यामजी कृष्ण वर्मा व मॅडम कामा यांनी आपले केंद्र इंग्लंडमधून हालवून फ्रान्समध्ये पॅरिस येथे नेले.

इंग्लंडमध्ये उच्चशिक्षणासाठी आलेल्या तरुणांमध्ये बापट हे एक हुशार तरुण होते. त्यांनी पॅरिसला जाऊन बाँब करण्याचे शिक्षण घ्यावे, असा निर्णय श्यामजी कृष्ण वर्मा आणि त्यांचे सहकारी यांनी घेतला. त्याप्रमाणे पॅरिसमध्ये बापट, हेमचंद्र दास आणि मिर्झा अब्बास बेग या तरुणांनी एका रशियन क्रांतिकारकाकडून बाँब तयार करण्याची विद्या शिकून घेतली. ही सर्व माहिती देणारी इंग्रजी पुस्तिका बापट यांनी ॲना क्लॉज या तरुणीच्या मदतीने तयार करून घेतली. बापट व दास यांनी भारतात येऊन या पुस्तिकेच्या तीन प्रती बंगालमधील क्रांतिकारकांच्या संघटनेस दिल्या. हे बापट पुढे 'सेनापती बापट' या नावाने ओळखले जाऊ लागले.

इंग्लंडमधील भारतीय क्रांतिकारकांपैकी बॅ. विनायक दामोदर सावरकर यांच्याजवळ नेतृत्वाचे असामान्य गुण होते. भारतात असताना विद्यार्थिदशेतच उत्कट देशभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी क्रांतिकारकांची संघटना करण्याचे ठरवले. ते आणि त्यांचे थोरले बंधू गणेश ऊर्फ बाबा यांनी 'अभिनव भारत' ही संघटना स्थापन केली.

बी. ए. झाल्यावर श्यामजी कृष्ण वर्मा यांनी दिलेली शिष्यवृत्ती घेऊन सावरकर बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला गेले. सावरकरांची अमोघ वक्तृत्वशैली, त्यांचे अभ्यासपूर्ण विवेचन आणि त्यांची जळजळीत देशभक्ती यांमुळे इंग्लंडमधील अनेक भारतीय विद्यार्थी प्रभावित झाले आणि 'अभिनव भारत' संघटनेत सामील झाले.

१० मे, १९०७ ला सावरकरांनी १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्यसमराचा सुवर्ण महोत्सव 'इंडिया हाऊस' मध्ये साजरा केला आणि हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. त्या वेळी सावरकरांनी 'हे हुतात्म्यांनो ...' हे पत्रक वाटले. त्या पत्रकात शेवटी लिहिले होते :

'हे हुतात्म्यांनो, तुमच्या रक्ताचा बदला घेण्यात येईल'.

सावरकरांचा सहकारी मदनलाल धिंग्रा बदला घेण्याच्या या भावनेने पेटून उठला होता. लंडनमधील भारतीय क्रांतिकारकांवर नजर ठेवणाऱ्या कर्झन वायली या अधिकाऱ्यास मदनलाल धिंग्रा याने १ जुलै, १९०९ ला गोळ्या घालून ठार केले.

मदनलाल धिंग्रा याने कोर्टापुढे दिलेल्या निवेदनात म्हटले,

'भारतातील काही देशभक्त तरुणांना फाशी देण्यात आले आणि काही देशभक्तांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. याचा अल्पसा सूड घेण्याकरिता मी एका इंग्रजी माणसाचे रक्त सांडले.''

सावरकरांनी याच वेळी भारतातील क्रांतिकारकांना काही पिस्तुले गुप्तपणे पाठवली. त्यांपैकी एक पिस्तूल नाशिक येथील क्रांतिकारकांच्या एका गटाला मिळाले होते. या क्रांतिकारकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना दहशत बसवण्यासाठी, नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांचा खून करण्याचे ठरवले.

२१ डिसेंबर, १९०९ ला अनंत कान्हेरे या तरुणाने जॅक्सन नाटक पाहण्यासाठी नाट्यगृहात प्रवेश करत असताना त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांना ठार केले.

सावरकरांचे थोरले बंधू बाबा सावरकर यांना यापूर्वीच जन्मठेपेची शिक्षा झाली होती. जॅक्सन यांच्या खुनानंतर सरकारने सावरकर कुटुंबीयांचा अतोनात छळ सुरू केला.

या सर्व घटनांचा सावरकरांवर फार परिणाम झाला. ते त्या वेळी पॅरिसमध्ये होते. भारतात ज्या क्रांतिकारकांवर खटले चालू होते, त्यांना न्याय मिळावा, यासाठी खटपट करण्याकरता सावरकर लंडनला गेले आणि तेथे जाताच त्यांना अटक करण्यात आली. सावरकरांना भारतात नेऊन तेथे त्यांच्यावर खटला चालवावा, असे ब्रिटिश सरकारने ठरवले आणि बोटीतून कडक बंदोबस्तात त्यांची रवानगी केली.

बोट फ्रान्समधील मार्सेय बंदराजवळ असताना सावरकर आगबोटीच्या स्वच्छता-गृहातून उडी टाकून, जवळच असलेल्या किनाऱ्याकडे झपाट्याने पोहत गेले. धक्क्यावर चढून ते पळू लागले. ब्रिटिशांनी आंतरराष्ट्रीय कायदा धाब्यावर बसवून सावरकरांना अटक केली व भारतात आणले. खास न्यायालयापुढे त्यांच्यावर दोन खटले चालवण्यात आले. त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

सावरकरांना अंदमानला नेण्यात आले. तेथील तुरुंगाचा अधिकारी, त्यांचे शिक्षेचे कागद पाहिल्यावर खवचटपणे म्हणाला,

''तू पन्नास वर्षे तुरुंगवास भोगायला जगशील, असं तुला वाटतं का?''

सावरकरांनी तत्काळ उलट प्रश्न केला,

''ब्रिटिशांचं जुलमी राज्य हिंदुस्थानात पन्नास वर्षं टिकेल, असं तुला वाटतं का?''

बॅ. सावरकरांची उज्ज्वल देशभक्ती, त्यांचे असामान्य धैर्य, अद्वितीय साहस आणि जन्मठेपेच्या शिक्षेचा त्यांनी सुहास्य मुद्रेने केलेला स्वीकार यांमुळे त्यांच्याबद्दल लोकांच्या

मनात नितांत आदराची भावना निर्माण झाली आणि लोक त्यांना 'स्वातंत्र्यवीर सावरकर' म्हणू लागले.

बाबू अरविंद घोष हे क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान होते. त्यांनी स्वातंत्र्याची उदात्त कल्पना आपल्या देशबांधवांसमोर मांडली. अरविंदबाबूंच्या लेखनामुळे आणि त्यांचे बंधू बारींद्रकुमार घोष यांच्या संघटन-कौशल्यामुळे बंगालमधील तरुणांमध्ये एक आगळेच चैतन्य निर्माण झाले.

या तरुण क्रांतिकारकांनी एक गुप्त संघटना उभारली. कोलकत्यातील माणिकताळा बागेमध्ये तरुणांना बाँब तयार करण्याचे, तसेच पिस्तुले वापरण्याचे शिक्षण दिले जाई. या क्रांतिकार्यामध्ये बारींद्रकुमार घोष यांचे निकटचे सहकारी भूपेंद्रकुमार दत्त हे होते. बाँब तयार झाले आणि ते टाकण्यासाठी क्रांतिकारक तरुण अधीर बनले. ब्रिटिश अधिकाऱ्यांपैकी अतिशय जुलमी म्हणून प्रसिद्ध असलेल्या किंग्जफोर्डवर बाँब टाकून ब्रिटिश नोकरशहांना दहशत बसवण्याचा निर्धार क्रांतिकारकांनी केला. खुदीराम बोस व प्रफुल्लकुमार चक्रवर्ती यांच्याकडे हे काम सोपवण्यात आले. एव्हाना किंग्जफोर्ड याची बदली मुझफ्फरपूर येथे झाली होती.

खुदीराम बोस व चक्रवर्ती किंग्जफोर्डच्या वाटेवर दबा धरून बसले. त्याच्या गाडीसारखी गाडी दिसताच खुदीरामने बाँब टाकला. त्या गाडीत दोन ब्रिटिश स्त्रिया होत्या. त्या मारल्या गेल्या. खुदीरामला अटक झाली. चक्रवर्तीने मात्र स्वत:वर गोळी उडवून आत्मबलिदान केले.

''किंग्जफोर्डला मारण्याकरिता मी बाँब टाकला होता'', असा निर्भय जबाब खुदीरामने दिला आणि दोन स्त्रिया मारल्या गेल्याबद्दल खेद व्यक्त केला.

त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली.

खुदीराम बोस सुहास्य मुद्रेने वधस्तंभाकडे गेला आणि मृत्यूला मिठी मारताना त्याने 'वंदेमातरम्'चा घोष केला.

बाँबचा हा स्फोट होताच ब्रिटिश सरकार हादरून गेले. क्रांतिकारकांचा नि:पात करण्यासाठी सरकारी चाके वेगाने फिरू लागली.

माणिकताळा बागेच्या झडतीत बाँब, काडतुसे व अन्य शस्त्रे मिळाली. यानंतर अरविंद घोष, बारींद्रकुमार घोष व त्यांचे निकटचे सहकारी यांना अटक झाली. हा खटला 'अलिपूर कटाचा खटला' म्हणून देशभर गाजला.

अरविंदबाबूंचे वकील विख्यात कायदेपंडित चित्तरंजन दास न्यायालयात म्हणाले,

''मायभूमी स्वतंत्र करण्यासाठी तरुणांना प्रेरणा देणे, या उद्देशानेच अरविंद घोष लेखन

करत होते. हा जर गुन्हा असेल, तर अरविंदबाबूही तो मान्य करतील.''

अलिपूर कटाच्या खटल्यात अरविंद घोष यांना निर्दोषी ठरवण्यात आले व त्यांची मुक्तता करण्यात आली. मात्र बारींद्रकुमार घोष आणि उल्हासकुमार दत्त या क्रांतिकारकांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आणि इतर आरोपींना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

अरविंदबाबू हीच क्रांतिकारकांची प्रेरक शक्ती आहे, हे सरकार जाणत होते, म्हणून त्यांना हद्दपार करण्याचा निर्णय सरकारने घेतला; परंतु तरुण क्रांतिकारक मित्रांच्या साहाय्याने अरविंदबाबू पोलिसांना चुकवून फ्रेंचांच्या अमलाखाली असलेल्या पाँडिचरी येथे गेले. त्यानंतर ते सक्रिय राजकारणापासून अलिप्त राहिले.

बाबू अरविंद व टिळक हे जहालांचे नेते होते. यांपैकी अरविंदबाबू पाँडिचरीच्या आश्रमात योगसाधना करू लागले, तर १९०८ ते १९१४ या काळात टिळक मंडालेला तुरुंगवास भोगत होते. या कालखंडात सरकारची दडपशाही वाढू लागली.

१९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी भारतातील व भारताबाहेर असलेल्या काही क्रांतिकारकांना, इंग्लंड अडचणीत आहे, या संधीचा फायदा घेऊन सशस्त्र उठावाचा प्रयत्न करावा, असे वाटू लागले. या दिशेने विचार करणाऱ्यांमध्ये अमेरिकेतील 'गदर पार्टी'चे कार्यकर्ते अग्रभागी होते. या क्रांतिकारकांचे नेते लाला हरदयाळ हे होते. हरदयाळ यांनी 'गदर' हे साप्ताहिक सुरू केले. 'गदर' याचा अर्थ बंड. या साप्ताहिकाच्या पहिल्या अंकात हरदयाळ यांनी लिहिले :

''आमचे नाव काय आहे ? - बंड !

आमचे काम काय आहे ? - बंड !

हे बंड केव्हा आणि कोठे होईल ? - भारतात !

काही दिवसांतच अशी वेळ येईल, की लेखण्या व शाई यांच्या जागा बंदुका व रक्त ही घेतील.''

पुढे 'गदर' पक्षाची स्थापना झाल्यावर त्या पक्षाने पुढील जाहिरात दिली.

''पाहिजेत : भारतात बंडाचा वणवा पेटवण्यासाठी शूर सैनिक पाहिजेत.

पगार : मृत्यू.

किंमत : हौतात्म्य.

निवृत्ती वेतन : स्वातंत्र्य.

लढण्याची भूमी : भारत.''

अमेरिकेतील भारतीयांनी भारतात जाऊन ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न

करावा, असे गदर पार्टीच्या नेत्यांनी ठरवले. ही जबाबदारी मुख्यतः रासबिहारी बोस आणि विष्णु गणेश पिंगळे यांनी घेतली. ते भारतात आले. सैन्यात उठाव करण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु तो फसला. रासबिहारी बोस शिताफीने निसटले, परंतु पिंगळे यांना लाहोर येथे अटक झाली आणि त्यांना फाशी देण्यात आले.

गदर पक्षाची चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने प्रयत्न करणारी धर्मातील चळवळ होती.

बंगालमधील प्रमुख कार्यकर्ते पकडले गेले आणि त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या, तेव्हा तेथील क्रांतिकारकांची चळवळ काही दिवस थंडावली. परंतु जतीन मुखर्जी यांनी पुन्हा तरुणांना क्रांतीसाठी संघटित केले. जतीन मुखर्जी आणि जदू गोपाळ मुखर्जी यांनी सशस्त्र बंड करण्याची एक योजना तयार केली. त्या दोघांचे जर्मनीतील तसेच मलाया, सिंगापूर भागांतील भारतीय क्रांतिकारकांशी संबंध होते. त्यांच्या मदतीने शस्त्रे आणण्याचा बेत त्यांनी आखला. नरेंद्रनाथ भट्टाचार्य या बुद्धिमान आणि साहसी तरुणावर ही जबाबदारी टाकण्यात आली. बालासोर आणि सुंदरबनातील रायमंगल या ठिकाणी बोटीने शस्त्रे आणून उतरवायची, अशी जतीन मुखर्जीची योजना होती.

दुर्दैवाने पोलिसांनी जतीन मुखर्जींच्या बालासोर येथील केंद्रास वेढा घातला. मुखर्जी व त्यांचे सहकारी वाघासारखे लढले; परंतु या लढाईत चित्तप्रिय रॉयचौधरी व जतीन मुखर्जी मारले गेले.

परदेशात जाऊन प्रयत्न करणाऱ्यांमध्ये राजा महेंद्र प्रताप, प्रो. बरकतुल्ला, वीरेंद्र चट्टोपाध्याय हे प्रमुख होते. महेंद्र प्रताप हे उत्तर प्रदेशातील जमीनदार होते. आपण बाहेरून सैन्य आणले, तर येथील संस्थानिक आपल्याला पाठिंबा देतील, असे त्यांना वाटत होते. राजा महेंद्र प्रताप हे १९१५ च्या ऑक्टोबर महिन्यात काबूलला गेले आणि तेथे त्यांनी भारताचे हंगामी सरकार स्थापन झाल्याची द्वाही फिरवली, परंतु अफगाणिस्तान व रशिया यांचा फारसा पाठिंबा न मिळाल्यामुळे राजा महेंद्र प्रताप यांचे प्रयत्न सफल झाले नाहीत.

लोकमान्य टिळक हे ब्रिटिश साम्राज्याचे कडवे विरोधक होते; परंतु पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर त्यांनी ब्रिटिशविरोधी भूमिका घेतली नाही. कारण जर्मनीच्या कैसरचे धोरण त्यांना मान्य नव्हते. या काळात लोकमान्य टिळकांनी 'केसरी'मध्ये लिहिलेल्या अग्रलेखांतून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ब्रिटिशांना युद्धात भारताच्या मदतीची गरज आहे, हे लक्षात घेऊन आपण दबावाचे राजकारण केले पाहिजे, लष्करात शिरून आत्मविश्वास संपादन केला पाहिजे, अशी लोकमान्यांची भूमिका होती. त्यामुळे सशस्त्र उठाव करू पाहणाऱ्या क्रांतिकारकांना त्यांनी, 'ही वेळ सशस्त्र बंडाची नाही', असे स्पष्टपणे सांगितले.

# ५. विस्तारलेला लढा

१९१४ साली मंडाले तुरुंगातून सुटून आल्यावर लोकमान्य टिळकांची लोकप्रियता शिखरास पोहोचली. नेमस्तांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस निष्प्रभ झाली होती. स्वराज्याची चळवळ पुढे नेण्यासाठी दुसरी संघटना उभी करण्याचा निर्णय लोकमान्यांनी घेतला. ॲनी बेझंट यांच्यासमवेत त्यांनी 'होमरूल लीग'ची स्थापना केली. टिळकांनी देशभर झंझावाती दौरा काढून 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच', ही भावना भारतीय जनतेच्या मनात दृढमूल केली. ॲनी बेझंट म्हणाल्या,

''भारत होमरूलची मागणी करतो, याची दोन कारणे आहेत. पहिले अतिशय महत्वाचे कारण, म्हणजे स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. दुसरे कारण, म्हणजे भारतीयांची कसलीही संमती न घेता ब्रिटिश साम्राज्याच्या हितासाठी भारताच्या हिताचा बळी देण्यात येतो ... ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षणासाठी भारताचा जो पैसा सैन्यावर प्रचंड प्रमाणात खर्च केला जातो, त्याच्या तुलनेने येथील प्राथमिक शिक्षणावर खर्च केला जाणारा पैसा नाममात्र आहे ... केवळ काही सवलती मिळाव्यात, म्हणून भारत यापुढे गुडघे टेकणार नाही. आपले हक्क मिळावे, म्हणून भारत खंबीरपणे स्वत:च्या पायावर उभा राहील.''

सुरत काँग्रेसच्या वेळी पडलेली फूट १९१६ मध्ये सांधण्यात आली. डिसेंबर, १९१६ मध्ये लखनऊ येथे भरलेल्या अधिवेशनात सर्वजण एकत्र आले. काँग्रेसचे अध्यक्ष अंबिकाचरण मुजुमदार म्हणाले,

''परस्परांबद्दलचे गैरसमज आणि वादविवाद यांमुळे जवळजवळ दहा वर्षे एकमेकांपासून दूर असलेले काँग्रेसमधील गट आज पुनश्च एकत्र येत आहेत. एकमेकांपासून अलग झाल्यामुळे पराभव होतो आणि एकत्र आल्यावर आपण खंबीरपणे उभे राहू शकतो.

बाळ गंगाधर टिळक, मोतीलाल घोष आणि अन्य झुंजार सहकारी आज आम्हांला परत लाभले आहेत. त्या सर्वांचे मी हार्दिक स्वागत करतो.

हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी झालेला करार ही लखनऊ काँग्रेसमध्ये झालेली सर्वांत महत्त्वाची घटना होय.

१९०९ साली इंग्रजांनी भारतासाठी एक सुधारणा कायदा मंजूर केला होता. यालाच 'मोर्ले-मिंटो सुधारणा' म्हणतात. यानुसार भारतामध्ये अत्यंत मर्यादित स्वरूपात लोकप्रतिनिधी निवडण्याचे ब्रिटिशांनी मान्य केले. परंतु हे करताना आपले 'फोडा आणि झोडा' हे तत्त्व ते विसरले नाहीत. निवडणुकीसाठी त्यांनी मुसलमानांचे वेगळे मतदारसंघ केले. देशात या कल्पनेला विरोध झाला; परंतु हिंदू-मुस्लिम ऐक्याला तडा जाऊ नये, म्हणून काँग्रेस नेत्यांनी लखनऊ करारात विभक्त मतदारसंघांना मान्यता दिली. त्याचप्रमाणे मुसलमानांना लोकसंख्येच्या मानाने जास्त प्रतिनिधित्वही देण्यात आले. काँग्रेसच्या स्वराज्याच्या मागणीला पाठिंबा देण्याचे मुस्लिम लीगने मान्य केले. या करारावर बोलताना बॅरिस्टर जीना म्हणाले,

''टिळकांनी हिंदू-मुस्लिम ऐक्य घडवून आणण्यात फार महत्त्वाची कामगिरी बजावली आणि या देशाची फार मोठी सेवा केली आहे. याचे फळ म्हणजे १९१६ मध्ये लखनऊ काँग्रेसमध्ये झालेला ऐक्याचा करार हे होय.''

लोकमान्य टिळक आपल्या भाषणात म्हणाले,

''स्वराज्याची चळवळ पुढे जावी, यासाठी आम्ही खांद्याला खांदा लावून काम करू आणि एकमुखाने बोलू. या अधिवेशनात केवळ पूर्वीचे मतभेद संपले, एवढेच घडले नसून हिंदू व मुसलमान यांच्यातील मतभेदही आपण संपवले आहेत.''

लोकमान्य टिळकांनी १९१५ नंतर देशभर दौरे काढून प्रचंड लोकजागृती केली. त्यांचे शब्द लोकांच्या अंत:करणाला जाऊन भिडत, याचे कारण 'आधी केले, मग सांगितले', या मार्गाने त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले होते. ब्रिटिश राजवटीबद्दल भारतात निर्माण झालेल्या असंतोषाचे जनक टिळकच होते. जनसामान्यांशी एकरूप होऊन त्यांनी लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्याची प्रेरणा दिली. हेच सूत्र हाती धरून पुढील काळात म. गांधींनी भारतात राष्ट्रव्यापी जनआंदोलन करण्याची अद्‌भुत किमया करून दाखवली.

गांधींजींचा भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या एका अभूतपूर्व पर्वाला सुरुवात झाली.

१८९३ मध्ये गांधी दक्षिण आफ्रिकेत गेले होते. तिथे बॅरिस्टर म्हणून काम करताना त्यांना गौरवर्णीय राज्यकर्त्यांकडून भारतीयांना मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीची जाणीव

झाली. गांधीजींनी याविरुद्ध लढा देण्याचे ठरवले. गांधीजींच्या नेतृत्वाखाली हजारो भारतीयांनी कायदेभंग करून सत्याग्रही म्हणून निर्भयपणे तुरुंगवास स्वीकारला. सत्याग्रह म्हणजे न्यायाचा आग्रह धरणे आणि हे करत असताना हिंसाचार न करता कायदेभंग करणे.

दक्षिण आफ्रिकेतील सरकारने प्रथम ही चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. तरीही शांततेने आणि शिस्तबद्ध रीतीने सत्याग्रह चालूच राहिला आणि दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला गांधीजींनी केलेल्या अनेक मागण्या मान्य कराव्या लागल्या. गांधीजी म्हणाले,

''या यशाचे खरे मानकरी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय मजूर आहेत.''

१९१५ साली गांधीजी भारतात परत आले.

लखनऊ अधिवेशनात राजकुमार शुक्ला यांनी गांधीजींची भेट घेऊन बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यात निळीच्या मळ्यात काम करणाऱ्या भारतीय मजुरांच्या हालाची कहाणी त्यांना सांगितली.

या मजुरांना गोऱ्या मळेवाल्यांच्या जमिनीवर सक्तीने काम करावे लागे. त्यांना मारहाणही होत असे. शिवाय मजुरी अत्यंत कमी. शेतकऱ्यांना सक्तीने नीळ पिकवावी लागे. जमिनीच्या वीस भागांतील तीन भाग नीळ पिकवलीच पाहिजे, असा दंडक होता. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होई.

गांधीजी चंपारण्यात गेले आणि भारतीय शेतमजुरांना आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सत्याग्रह सुरू केला. गांधीजींना अटक झाली, तेव्हा त्यांनी जामिनावर सुटण्याचे नाकारले. चंपारण्यातील शेतकरी निर्भयपणे सत्याग्रहासाठी पुढे आले.

अखेर निळीच्या मळ्यांचे इंग्रज मालक नमले. सरकारलाही तडजोड करणे भाग पडले आणि चंपारण्यातील शेतकरी व शेतमजूर यांची लूट थांबून त्यांच्या अनेक मागण्या मान्य झाल्या.

१९१८ साली गुजरातमधील खेडा जिल्ह्यात दुष्काळामुळे पिके बुडाली, तरीही सरकारने जमीन महसूल वसूल करण्याचा आग्रह धरला. त्या वेळी गांधीजींनी शेतकऱ्यांची चळवळ उभारली. साराबंदी करण्याचा त्यांचा सल्ला शेतकऱ्यांनी मानला. जमीन जप्त झाली, तरी चालेल, पण साराबंदी करायचीच, असा निर्धार शेतकऱ्यांनी केला.

काही शेतकरी सत्याग्रहींना सरकारने तुरुंगात टाकले, तेव्हा लोकांनी तुरुंगापर्यंत मिरवणूक काढली. तुरुंगाची भीती कमी होऊ लागली.

अखेर सरकारला शेतकऱ्यांशी तडजोड करावी लागली.

याच रीतीने गांधीजींनी अहमदाबादमधील कापडाच्या गिरण्यांतील कामगारांना न्यायासाठी संप करण्यास सांगितले. गिरणी कामगारांना मजुरीचे दर वाढवून पाहिजे होते.

त्यांचा अहिंसक लढा गांधीजींनी सुरू केला, पण कामगारांच्या संपाचा गिरणी मालकांवर फारसा परिणाम झाला नाही. मजुरांची उपासमार होत आहे, हे पाहून गांधीजींनी स्वतःच उपोषणास सुरुवात केली.

अखेर गिरणी मालक नमले. सत्याग्रहामुळे कामगारांचा विजय झाला आणि आत्मविश्वासही वाढला.

ग्रामीण भागातील व शहरातील गरिबांचे हितकर्ते नेते म्हणून गांधीजी ओळखले जाऊ लागले.

गांधीजी सामान्य लोकांच्या जीवनाशी एकरूप झाले होते. त्यांनी लोकांना प्रामाणिकपणे व निर्भयपणे जगण्याची व अन्यायाचा प्रतिकार करण्याची शिकवण दिली.

# ६. जनता निर्भय बनली

भारतीय जनतेला राजकीय हक्क देण्याचे आमिष दाखवणे आणि त्याच वेळी नागरी हक्कांची गळचेपी करणे, हा डावपेच ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी सतत केला. दर दहा वर्षांनी राजकीय सुधारणांचा कायदा जाहीर करायचा; पण प्रत्यक्षात मात्र भारतीय जनतेच्या हातात फारसे काही न देता दडपशाहीच चालू ठेवायची, असे दुटप्पी धोरण ब्रिटिशांनी चालवले.

पहिले महायुद्ध १९१८ साली संपले. त्यानंतर इंग्लंडच्या मंत्रिमंडळातील भारतमंत्री माँटग्यू यांनी सुधारणा कायद्याचा मसुदा जाहीर केला. त्याच वेळी भारताची वाढती राजकीय आकांक्षा चिरडून टाकली पाहिजे, असे ब्रिटिश नोकरशहांना वाटू लागले. यासाठी रौलट आयोग नेमण्यात आला. या आयोगाच्या शिफारशींप्रमाणे येथील राजकीय चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारला बेसुमार अधिकार देणारा कायदा १९१९ साली पास करण्यात आला. या कायद्यालाच 'रौलट कायदा' असे म्हणतात.

या जुलमी कायद्याला सत्याग्रहाच्या मार्गाने विरोध करण्याचे आवाहन गांधीजींनी केले. रौलट कायद्याचा निषेध करण्यासाठी पंजाबमधील सर्व शहरांतून हरताळ पाळण्यात आला. डॉ. सत्यपाल व डॉ. किचलू या दोघां मान्यवर नेत्यांना सरकारने हद्दपार केले. याविरुद्ध निदर्शने करणाऱ्या लोकांवर बेछूट गोळीबार करण्यात आला. जनरल डायर या ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्याला पंजाबात धाडण्यात आले. त्याने अनेकांची धरपकड केली व सर्व सभांवर बंदी घातली.

१३ एप्रिल, १९१९ रोजी जालियनवाला बागेत सभा घेण्याचे अगोदरच ठरले होते. लोकांना सभाबंदीचा हुकूम नीटसा समजलाही नव्हता. म्हणून ठरल्याप्रमाणे लोक जलियनवाला बागेत सभेसाठी आले. त्या वेळी डायर हा तेथे सैन्य व लष्करी गाड्या घेऊन

आला आणि त्याने पूर्वसूचना न देता एकदम सैन्याला गोळीबाराचा हुकूम दिला. सभेसाठी आलेल्या दहा हजार नि:शस्त्र नागरिकांवर डायरने गोळीबार चालू ठेवला. चारी बाजूंना भिंती होत्या व मैदानातून बाहेर पडण्याचा एकच चिंचोळा मार्ग होता. अशा वेळी डायरच्या सैनिकांनी १६५० फैरी झाडल्या आणि त्यांत ४०० लोक मरण पावले. ३००० लोक जबर जखमी झाले.

जालियनवाला बागेच्या कत्तलीनंतर १५ एप्रिलला पंजाबात लष्करी कायदा पुकारण्यात आला. लोकांना झाडांना टांगून फटके मारण्यात आले. अनेकांना भयंकर मारहाण करण्यात आली. किती जणांना तुरुंगात डांबले, याची तर गणतीच नव्हती. अशा पाशवी अत्याचारांमुळे भारतीयांच्या अंत:करणातील देशभक्तीची ज्योत मालवली जाईल, असे हा जुलूम करणाऱ्या इंग्रज सत्ताधीशांना वाटत होते; पण घडले उलटेच.

साम्राज्यशाहीच्या या पाशवी वागण्यामुळे भारतीयांच्या मनात संतापाचा डोंब उसळला. गांधीजींनी व्हाइसरॉयला पत्र लिहून जालियनवाला बागेतील अत्याचाराचा तीव्र निषेध केला आणि पत्रात लिहिले :

'पाश्चात्त्य देशांत अशा अमानुष कत्तलीची प्रतिक्रिया रक्तरंजित क्रांतीमध्ये झाली असती.'

पत्राच्या शेवटी गांधीजींनी सरकारबरोबर असहकार करण्याचा निश्चय जाहीर केला.

जालियनवाला बागेतील हिंस्र कत्तलीच्या विरुद्ध भारतीयांचा सात्त्विक संताप अत्यंत तीव्रतेने व उत्कटतेने व्यक्त केला, तो गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी. पंजाबमधील कत्तलीचा निषेध म्हणून टागोरांनी त्यांना मिळालेल्या 'सर' या पदवीचा त्याग केला आणि ते करताना पत्रात लिहिले :

'माझ्या देशबांधवांना माणूस म्हणून वागवले जात नसताना आणि त्यांना पायदळी तुडवले जात असताना, सर्व पदांचा आणि भूषणांचा त्याग करून मी त्यांच्या समवेत राहू इच्छितो.'

गांधीजींनी सरकारबरोबर असहकार पुकारताना जी चळवळ सुरू केली, तिला दोन पैलू होते. एक विधायक कार्याचा आणि एक सरकारशी संघर्षाचा. विधायक कार्यक्रमामध्ये स्वदेशीचा आणि विशेषत: खादीचा समावेश करून गांधीजींनी खादी उत्पादनासाठी अनेक ठिकाणी चरखे सुरू केले. दारूबंदीचा प्रचार, अस्पृश्यता निर्मूलन आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य हे दुसरे कार्यक्रमही त्यांनी आग्रहाने सांगितले.

याच वेळी गांधीजींनी राष्ट्रासमोर 'स्वयंपूर्ण खेड्याची' कल्पना मांडून, सर्व लोकांनी नेमाने शारीरिक कष्ट केले पाहिजेत, असे सांगितले.

अनेक शिकलेल्या लोकांना या विधायक कामांचे राजकीय महत्त्व सुरवातीस उमगले नाही. हा कार्यक्रम लोकांना समजावून सांगताना गांधीजी म्हणाले,

''ज्या भारतात कोणी उच्च नसेल आणि कोणी नीच नसेल, जो भारत गरिबांना आपला देश वाटेल आणि आपण हा देश घडवत आहोत, असा अनुभव त्यांना येईल, ज्या भारतात सर्व जातिधर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहतील, असा भारत निर्माण करण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करू इच्छितो. अशा भारतात अस्पृश्यतेचा शाप नष्ट होईल आणि स्त्रियांना पुरुषांइतकेच अधिकार राहतील. माझे भावी भारताबद्दलचे हे स्वप्न आहे.''

गांधीजींच्या त्या शब्दांमुळे असंख्य लोक भारले गेले आणि विधायक कार्यक्रमात सामील झाले.

असहकाराच्या चळवळीच्या संघर्षाच्या कार्यक्रमामध्ये विधिमंडळे, सरकारी शाळा-कॉलेजे आणि न्यायालये यांच्यावरील बहिष्काराला प्रमुख स्थान होते. या कार्यक्रमास प्रथम काही नेत्यांनी विरोध केला. परंतु १९२० च्या डिसेंबर महिन्यात नागपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात हा कार्यक्रम मंजूर करून, असहकाराची चळवळ करण्याच्या निर्णयावर काँग्रेसने शिक्कामोर्तब केले. खिलाफत चळवळ याच चळवळीचा एक भाग बनली. त्यामुळे भारतीय मुसलमान असहकाराच्या चळवळीत मोठ्या प्रमाणावर सामील झाले.

गांधीजींनी सत्याग्रहाचे आवाहन केल्यावर देशात हजारो लोकांनी सत्याग्रही म्हणून प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या.

पंडित नेहरूंनी लिहिले आहे :

'गांधीजींचा आवाज मृदू आणि सौम्य होता; परंतु त्यात पोलादाचे सामर्थ्य होते. त्यांचे राजकारण कृतिशील होते, त्यात बोलघेवडेपणा नव्हता.'

असहकाराच्या कार्यक्रमामुळे कार्यकर्त्यांच्या मनाची जी भारलेली अवस्था झाली, तिचे वर्णन पंडित नेहरूंनी पुढील शब्दांत केले आहे :

'असहकाराच्या चळवळीत काम करताना आमच्या उत्साहाला उधाण आले होते. एका बेहोश, ध्येयधुंद अवस्थेत आम्ही जगत होतो. आम्हांला आमचा मार्ग स्पष्ट दिसत होता आणि उत्साहाने आम्ही आगेकूच करत होतो. तुरुंगाची भीती आता संपली. कारण अशा कारावासाने आमचे ध्येय जवळ येणार होते.'

भारतातील लोक ज्या भाविकतेने तीर्थयात्रेला जातात, त्याच भाविकतेने स्वातंत्र्ययात्रेत सामील होऊन तुरुंगाकडे निघाले होते.

व्ही. व्ही. गिरी यांनी लिहिले आहे :

'१९१६ साली इंग्लंडहून मी मायदेशी परत आलो, त्या वेळी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सशस्त्र मार्गानेच ब्रिटिश राजवट उलथून पाडावी लागेल, अशीच माझी

भूमिका होती. परंतु वकिलीचा व्यवसाय सोडून चळवळीत सामील होणाऱ्यांमध्ये मी अग्रभागी होतो.'

सावरकरांचे एक निकटचे सहकारी व्ही. व्ही. एस. अय्यर यांनीही सशस्त्र क्रांतीचा मार्ग सोडून सत्याग्रहाच्या चळवळीत भाग घेतला.

कोणत्याही चळवळीमध्ये झेंड्याला फार महत्त्व असते. असहकाराच्या चळवळीत लोकांना राष्ट्रध्वजाची आवश्यकता वाटू लागली. गांधीजींनी सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून तिरंगी झेंडा तयार केला आणि असंख्य देशभक्तांच्या त्यागामुळे राष्ट्रध्वज म्हणून तो मान्यता पावला.

चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने सर्व तऱ्हेचा जुलूम केला; परंतु त्यामुळे देशभक्तीची लाट काही ओसरली नाही. उलट लोक अधिक निर्भय बनून चळवळीत भाग घेण्यासाठी पुढे सरसावले.

पंडित नेहरू यासंबंधी लिहितात :

'असहकाराच्या चळवळीचा लोकांवर झालेला परिणाम अद्‌भुत होता. आजवर ज्या भीतीखाली लोक चिरडले जात होते, ती भीती बाजूला पडून ते ताठ मानेने उभे राहिले. त्यांच्या मनावरील ओझे जणू दूर झाले. भारताच्या कोनाकोपऱ्यांतील खेड्यांतूनही लोक बाजाराच्या जागी काँग्रेस आणि स्वराज्य यांवर उघडपणे बोलू लागले.'

इतके दिवस पोलिसांना व ब्रिटिश अधिकाऱ्यांना भिणारे लोक जेव्हा उघडपणे सरकारच्या सत्तेला विरोध करू लागले, तेव्हा व्हाइसरॉय आणि अनेक बड्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना फार मोठा धक्का बसला. गांधीजींचे व्यक्तिमत्त्व आणि सत्याग्रहाचे अस्त्र यांचा हा परिणाम होता.

पहिल्या महायुद्धात भारतातील मुसलमानांचा पाठिंबा मिळावा, यासाठी इंग्रजांनी असे आश्वासन दिले होते, की तुर्कस्तान येथील खलिफाचे पद व अधिकार चालू राहतील; परंतु त्यांनी ते आश्वासन पाळले नाही. ब्रिटिशांनी केलेल्या या वचनभंगाचा निषेध करून गांधीजींनी असहकाराच्या चळवळीच्या जोडीने खिलाफत चळवळ सुरू केली.

अनेक नेत्यांना, विशेषतः पंडित जवाहरलाल नेहरूंना, गांधीजींची ही भूमिका मान्य नव्हती. धर्म आणि राजकारण यांची सांगड घालण्यास त्यांचा विरोध होता. असे असूनही सर्व लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेण्याचे गांधीजींचे सामर्थ्य असामान्य आहे, याची जाणीव असल्यामुळे पंडितजींनी एका मर्यादेपलीकडे गांधीजींना विरोध केला नाही.

गांधीजी दिल्ली येथील अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अध्यक्ष होते. लोकमान्य टिळकांनीही खिलाफत चळवळीला पाठिंबा दिलेला होता. अलीबंधूसारख्या नेत्यांनी खिलाफत चळवळीत पुढाकार घेतला होता. या चळवळीमुळे भारतीय मुसलमान मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले. या चळवळीत मुसलमानांबरोबर हिंदूंनीही भाग घेतला.

१९२१ च्या डिसेंबर महिन्यात अहमदाबाद येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात असहकाराची सामुदायिक चळवळ करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावानुसार गांधीजींनी १ फेब्रुवारी, १९२२ ला व्हाइसरॉयना एक पत्र लिहिले आणि गुजरातमध्ये बार्डोली येथे सामुदायिक सत्याग्रह करण्याचा निर्णय त्यांना कळवला. गांधीजी स्वतः या लढ्याचे नेतृत्व करणार होते. परंतु हा सत्याग्रह सुरू होण्यापूर्वीच उत्तर प्रदेशातील चौरीचौरा येथे झालेल्या हिंसक घटनेनंतर गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेण्याचा निर्णय घेतला.

चौरीचौरा येथे शांततापूर्ण मिरवणूक काढणाऱ्या लोकांशी पोलिसांची चकमक उडाली. पोलिसांनी गोळीबार केला. दारूगोळा संपल्यावर त्यांनी पोलीस-ठाण्यात आश्रय घेतला; परंतु संतप्त जमावाने जाळपोळ केली आणि त्यात २२ पोलीस ठार झाले.

या घटनेने गांधीजींना मोठा धक्का बसला. चळवळ संपूर्ण अहिंसक मार्गाने झाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. म्हणून चौरीचौरा घटनेनंतर त्यांनी असहकाराची चळवळ स्थगित केली. या वेळी मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय आदी पुढारी तुरुंगात होते. त्यांनी तुरुंगातून गांधीजींना त्यांच्या या निर्णयाविरुद्ध संताप व्यक्त करणारी पत्रे लिहिली. जवाहरलाल नेहरू यांनाही चळवळ थांबवण्याचा हा निर्णय मुळीच पसंत पडला नाही; परंतु या सर्व सहकाऱ्यांच्या निषेधाकडे लक्ष न देता गांधीजी स्वतःच्या निर्णयास खंबीरपणे चिकटून राहिले.

असहकाराच्या चळवळीस गती येत असताना चळवळ अचानक थांबली, त्यामुळे देशभर तीव्र निराशेचे वातावरण निर्माण झाले.

बदललेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारने १० मार्च, १९२२ ला राजद्रोहाच्या आरोपाखाली गांधीजींना अटक केली. गांधीजींनी खटला लढवण्याचे नाकारले आणि न्यायाधीशांसमोर आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले,

'भारतातील ब्रिटिश राजवटीमुळे जनतेची उपासमार होत असून, असहायतेने ती खोल गर्तेत जात आहे. अशा वेळी ब्रिटिश सत्तेच्या विरोधी होण्याची शिकवण लोकांना देणे हे माझे कर्तव्य आहे.'

गांधीजींनी हे स्पष्ट केले, की जाणीवपूर्वक कायदा मोडण्याचा निर्णय त्यांनी सत्याग्रहाच्या भूमिकेतून घेतला होता आणि त्याबद्दल जास्तीत जास्त शिक्षा भोगण्यास ते तयार होते.

न्यायमूर्तींनी गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा देताना लोकमान्य टिळकांवरील खटल्याचा उल्लेख केला.

यावर गांधीजी म्हणाले,

''लोकमान्य टिळकांशी तुलना करून आपण माझा फार मोठा गौरव केला आहे.''

अशा रीतीने भारतातील हे पहिले जनआंदोलन स्थगित झाले.

वरवर पाहिले, तर ते अयशस्वी झाले, असे वाटेल; परंतु या चळवळीमुळे लोक निर्भय बनू लागले, हे या चळवळीचे फार मोठे यश होते.

गांधीजींनी चळवळ मागे घेतली, तरी या काळात झालेल्या जागृतीमुळे राष्ट्रीय भावनेचा लोट जसजसा साऱ्या देशभर पसरू लागला, तसतसा राष्ट्रीय आंदोलनाविषयीच्या कल्पनांतही बदल घडून येऊ लागला. राष्ट्रीय सभेचे स्वरूप व तिचे कार्यक्रमही बदलू लागले. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाचे प्रश्न आता काँग्रेसला महत्त्वाचे वाटू लागले. महाराष्ट्रात झालेला मुळशी सत्याग्रह हे याचे उत्तम उदाहरण आहे. १९२१ ते १९२४ असा तीन वर्षे हा सत्याग्रह चालला. धरणग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न या सत्याग्रहाने धसाला लावले. परंतु खरे तर प्रश्न केवळ सत्याग्रह करण्याचा नव्हता, तर शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेण्याचा होता. त्यांना दिलासा देण्याचा होता. गांधीजींनी यासाठी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना खेड्यांत जाण्याचा आदेश दिला. कित्येक कार्यकर्त्यांनी कुडाच्या झोपडीत अर्धपोटी राहणारा उघडा-नागडा शेतकरी प्रथमच पाहिला. शेतकरी पाहिल्याशिवाय तुम्हांला खरा भारत दिसणार नाही, या गांधीजींच्या संदेशाचा अर्थ काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना कळू लागला. काँग्रेसचे स्वरूप बदलू लागले. या शेतकऱ्याला राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले.

या प्रयत्नांपैकी ज्याला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले, तो प्रयत्न म्हणजे गांधीजींचा चरखा. चरखा हे केवळ गरीब शेतकऱ्याला उत्पन्नाचे पूरक साधन नव्हते, तर शहरी भांडवलशाहीला शह देणारी ती राष्ट्रीय शक्ती होती. 'चरखा चला चला के, लेंगे स्वराज लेंगे', ही घोषणा म्हणजे एका अर्थाने भांडवलशाही साम्राज्यवादाला दिलेले आव्हान होते. चरखा हे चिन्ह राष्ट्रीय सभेच्या तिरंगी निशाणाच्या मध्यभागी लावून काँग्रेसने हेच जाहीर केले, की ती आता गोरगरिबांची कैवारी झाली आहे.

गांधीजींनी चळवळ मागे घेतल्यानंतर राजकीय परिस्थितीत जो बदल झाला, तो लक्षात घेऊन चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांनी दुसरा एक विचार देशासमोर ठेवला. कौन्सिलच्या निवडणुका लढवून, प्रांतिक तसेच मध्यवर्ती कौन्सिलच्या व्यासपीठावर सरकारची अडवणूक करून स्वराज्याचा लढा चालवायचा, असा हा पर्याय होता. त्याची कार्यवाही करण्याकरिता काँग्रेसअंतर्गतच असलेला स्वराज्य पक्ष चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांनी स्थापन केला.

मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली मध्यवर्ती कायदेमंडळात स्वराज्य पक्ष हा लढाऊ


व परिणामकारक विरोधी पक्ष बनला. स्वराज्य पक्षाने देशात चैतन्य निर्माण केले. असहकाराचे लोण कायदेमंडळापर्यंत पोहोचवले. स्वराज्य पक्षाच्या अनेक नेत्यांच्या कौन्सिलमधील कामामुळे आणि अनेक वेळा त्यांनी सरकारच्या केलेल्या पराभवामुळे लोकांमध्ये पुन्हा आत्मविश्वास निर्माण होऊ लागला.

गांधीजींना या सांसदीय कार्यक्रमाच्या मर्यादेची जाणीव होती. त्यांचा या पद्धतीवर विश्वास नव्हता, तरीही त्यांनी चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांना त्यांच्या पद्धतीने काम करण्यास परवानगी दिली. त्याचबरोबर आपल्या निष्ठावंत अनुयायांना गांधीजींनी विधायक कामांत सर्वस्व ओतून कार्य करायला लावले. गांधीजींच्या या आदेशानुसार अनेक कार्यकर्ते खेड्यापाड्यांत जाऊन काम करू लागले.

स्वराज्य पक्ष घडवत असलेल्या लोकजागृतीमुळे त्या पक्षावर सरकारचा रोष झाला. स्वराज्य पक्षाचे एक नेते सुभाषचंद्र बोस यांना मंडाले येथे स्थानबद्ध करण्यात आले. स्वराज्य पक्षाच्या कचेरीवर धाडी टाकण्यात येऊन तेथील कागदपत्रे जप्त करण्यात आली. गांधीजींनी या गोष्टींचा तीव्र निषेध केला. स्वराज्य पक्षाचा सर्व कार्यक्रम गांधीजींना मान्य नसला, तरी त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या देशभक्तीबद्दल गांधीजींच्या मनात आदरच होता. स्वराज्य पक्ष हा काँग्रेसचा एक भाग म्हणून काम करत होता, याचे गांधीजींना कधी विस्मरण झाले नाही. स्वातंत्र्यसंग्रामात वेगवेगळी मते असणारे आणि वेगळा कार्यक्रम राबवणारे नेते आणि कार्यकर्ते काही काळ एकमेकांपासून बाजूला झाल्यासारखे दिसले, तरी कसोटीच्या क्षणी ते एकत्र येत. सांसदीय काम करणारे स्वराज्य पक्षाचे नेते आणि गांधीजींना सहकार्य करणारे विधायक कार्यकर्ते हे काही काळ एकमेकांपासून दूर असले, तरी गांधीजींमुळे ते पुन्हा एकत्र आले.

असहकाराची चळवळ मागे घेतल्यानंतर देशात काही काळ आलेली निराशा नाहीशी होऊन पुन्हा एकदा देशव्यापी संग्राम सुरू केला पाहिजे, अशी जाणीव कार्यकर्त्यांमध्ये वाढू लागली.

महायुद्धाच्या काळात आर्थिक क्षेत्रात झपाट्याने बदल होत होते. युद्धासाठी आवश्यक ते साहित्य निर्माण करणे आणि त्याचबरोबर व्यापारी स्पर्धा चालू ठेवणे इंग्लंडला शक्य नव्हते. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांतील काही जबाबदारी भारतावर टाकणे इंग्लंडला आता जरुरीचे वाटत होते. त्यासाठी भारतीय उद्योगपती व कामगार यांची इंग्लंडला मदत हवी होती. भारतीय उद्योगांना थोडेतरी प्रोत्साहन देणे आवश्यक होते. परिणामी इंग्लंडची इच्छा नसली, तरीही भारतीय उद्योगधंद्यांची वाढ होऊ लागली. ही वाढ फार मोठी नव्हती, हे खरे; पण पूर्वीपेक्षा जास्त मोठे उद्योगधंदे भारतात सुरू झाले, हेही मान्य करावे लागेल. याचा परिणाम असा झाला, की उद्योगांबरोबर कामगारांचीही संख्या वाढली. शहरांची वाढ



परदेशी मालाची होळी




'सायमन, परत जा.'

झाली. त्याबरोबरच सामान्य माणसांच्या राजकीय जाणिवाही वाढल्या. शहरांत येऊन काम करणारे बहुतेक कामगार हे खेड्यांतूनच आलेले असत. ते सुटीत परत खेड्यांत गेले, की त्यांच्यामुळे या जाणिवाही खेड्यांपर्यंत पोहोचत. राष्ट्रीय जाणीव ही अशीच एक जाणीव. उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे तिचाही प्रसार खेडोपाडी होऊ लागला.

शेतकऱ्यांप्रमाणेच कामगारांच्या प्रश्नांकडेही आता राष्ट्राची नजर वळू लागली. एक तर त्यांची संख्या वाढली आणि दुसरे म्हणजे त्यांना संघटित करणे फार कठीण नव्हते. तसे पाहिले, तर कामगार हा शहरवासी वर्गच होता. त्यामुळे शहरांतील बुद्धिवंतांची नजर त्याच्याकडे वळणे अटळ होते. शिवाय कामगारांचे संघटन केल्यास ती एक फार मोठी शक्ती बनू शकते, हे राष्ट्रीय नेत्यांच्या लक्षात आले होते.

१९०८ साली मुंबईच्या कामगारांनी लोकमान्य टिळकांच्या शिक्षेच्या निषेधात सहा दिवस संप केला होता. त्या दिवशी मुंबईच्या औद्योगिक नाड्या आवळल्या गेल्या होत्या. या शक्तीला राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात आणणे आवश्यक होते. त्यासाठी कामगार संघटना उभ्या केल्या पाहिजेत, याची जाणीव होऊ लागली. याआधी कामगारांच्या प्रश्नाला महात्मा फुल्यांसारख्या महर्षींने हात घातला होता हे खरे, पण त्यामागचा हेतू हा मानवतावादी होता. आता कामगार चळवळीचे स्वरूप अगदी वेगळे होते. एका बाजूला स्वतःच्या हक्कांसाठी लढा देणारा कामगार स्वातंत्र्यचळवळीचा लढाऊ घटक बनू लागला.

१९२७ नंतर भारतातील राजकीय चळवळीला गती येऊ लागली.

भारतात नवीन राजकीय सुधारणा करण्यापूर्वी आधीच्या सुधारणांचा आढावा घेतला पाहिजे आणि नव्या सुधारणांचा मसुदा तयार केला पाहिजे, या उद्देशाने ब्रिटिश सरकारने सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले.

या कमिशनमध्ये भारतीयांचा एकही प्रतिनिधी नसल्यामुळे काँग्रेसने सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरवले. या निर्णयाला देशातून उत्साहाने प्रतिसाद मिळाला.

सायमन कमिशन ज्या ज्या ठिकाणी गेले, तेथे तेथे लोकांनी निदर्शने केली. काळी निशाणे दाखवली आणि 'सायमन, गो बॅक', 'सायमन, परत जा' अशा घोषणा दिल्या.

३० ऑक्टोबर, १९२८ ला सायमन कमिशन लाहोरमध्ये आले असताना त्याच्याविरोधी प्रचंड निदर्शन करण्यात आले. निदर्शकांनी शांतपणे मिरवणूक काढली होती आणि मिरवणुकीच्या अग्रभागी राहून लाला लजपतराय हे वयोवृद्ध देशभक्त निदर्शनाचे नेतृत्व करत होते. त्या वेळी पोलीस अधिकाऱ्यांनी लालाजींवर दंडुक्याचे प्रहार केले. लोक अतिशय संतापले. लालाजींनी त्यांना आवरले. पोलिसांनी बेछूट लाठीमार केला; परंतु निदर्शक निर्भयपणे उभे राहिले. मारहाणीमुळे धड बोलवत नसतानाही लाला लजपतराय त्या दिवशी संध्याकाळी जाहीर सभेस आले आणि भाषणात म्हणाले,

''मला मारलेला प्रत्येक फटका हा ब्रिटिश साम्राज्याच्या शवपेटिकेस ठोकलेला एक-एक खिळा ठरणार आहे !''

# ७. क्रांतिपर्व

स्वातंत्र्याची ऊर्मी तरुणांच्या मनात नेहमीच उसळून येत असते. चळवळीची हाक आली, की ते ताबडतोब बेहोशीत चळवळीकडे ओढले जातात.

१९२० साली गांधीजींनी ज्या वेळी असहकाराच्या चळवळीचे रणशिंग फुंकले, त्या वेळी देशाच्या कोनाकोपऱ्यांतून तरुणांनी त्यांना प्रतिसाद दिला आणि उत्साहाने चळवळीत भाग घेतला. अशा तरुणांपैकीच एक ध्येयवादी तरुण चंद्रशेखर बनारस येथे संस्कृत पाठशाळेत शिकत होता. त्याला चळवळीत अटक झाली आणि मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात आले. त्याला मॅजिस्ट्रेटने नाव विचारले. तेव्हा चंद्रशेखरने उत्तर दिले,

''मेरा नाम है आझाद !''

मॅजिस्ट्रेटने त्याचे राहण्याचे ठिकाण कोणते, असा प्रश्न केला. तेव्हा चंद्रशेखरने उत्तर दिले,

''जेल.''

या उत्तरामुळे मॅजिस्ट्रेट संतापला आणि त्याने चंद्रशेखरला १५ फटक्यांची शिक्षा सुनावली.

वेताच्या फटक्यांमुळे चंद्रशेखरच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडत असतानाही तो 'वंदेमातरम्', 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देत होता.

फटक्यांची शिक्षा भोगून जेव्हा तो सुटला, त्या वेळी तुरुंगाच्या दाराशी प्रचंड जमाव जमला आणि लोकांनी या तरुण वीराचा सत्कार केला. यापुढे तो 'चंद्रशेखर आझाद' म्हणूनच ओळखला जाऊ लागला.

गांधीजीप्रणीत सत्याग्रहाच्या मार्गावर व गांधीजींच्या नेतृत्वावर चंद्रशेखर यांचा विश्वास होता. पण गांधीजींनी असहकाराची चळवळ बेमुदत स्थगित केली आणि या विश्वासाला

तडा गेला. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्गच जवळ करावा लागेल, अशी त्यांची खात्री झाली. त्यांची भेट जोगेश चतर्जी नामक समविचारी कार्यकर्त्याशी झाली. त्यांनी क्रांतिकारकांची संघटना करायचे ठरवले. अल्पावधीतच उत्तर भारतातील वेगवेगळ्या ठिकाणचे तरुण या क्रांतिकारी संघटनेकडे ओढले गेले. त्यांच्यामध्ये सचींद्र संन्याल हा बंगाली क्रांतिकारक आणि भगतसिंग हा लाहोरचा तरुण क्रांतिकारक होता. भगतसिंगांचे चुलते अजितसिंग हेही क्रांतिकारकच होते. त्यांना ब्रिटिश सरकारने हद्दपार केले होते आणि त्यांच्या ध्येयवादी जीवनाचा भगतसिंगांवर मोठा परिणाम झाला होता.

भगतसिंग हे लाहोरच्या कॉलेजमध्ये शिकत असताना खूप वाचन करत असत. त्यांनी मॅझिनी या इटालियन देशभक्ताचे ग्रंथ वाचले, तसेच फ्रेंच क्रांती आणि रशियन राज्यक्रांती यांच्यावरही अनेक पुस्तके वाचली. भगतसिंग आणि त्यांचे सहकारी भगवतीचरण या दोघांनी लाहोरमध्ये ''नौजवान भारत सभा'' स्थापन केली. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, सचींद्र संन्याल आदी तरुण एकत्र येऊन त्यांनी क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली. या क्रांतिकारकांना शस्त्रे गोळा करायची होती आणि त्यासाठी पैसे अपुरे पडत होते. तेव्हा त्यांच्यातील रामप्रसाद बिस्मिल यांनी सरकारी खजिना पळवण्याची एक योजना आखली. त्यांनी ९ ऑगस्ट, १९२५ ला लखनऊकडे जाणारी आगगाडी काकोरी या स्टेशनाजवळ थांबवली व तीमधील सरकारी तिजोरी पळवली. दुर्दैवाने पोलिसांना काही क्रांतिकारक सापडले. सरकारने त्यांच्यावर कटाचा आरोप ठेवून खटला भरला. या काकोरी कटाच्या खटल्यात रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्र लाहिरी, अश्फाक उल्ला आणि ठाकूर रोशनसिंग यांना फाशीची शिक्षा झाली. योगेश चटर्जी व सचींद्र संन्याल यांना जन्मठेपेची सजा ठोठावण्यात आली. चंद्रशेखर मात्र पोलिसांच्या हाती सापडले नाहीत.

या घटनेनंतर चंद्रशेखर व भगतसिंग यांनी निर्धाराने क्रांतिकारकांची देशव्यापी संघटना उभारण्याचे ठरवले आणि ठिकठिकाणच्या तरुण क्रांतिकारकांना एकत्र आणले. ९ सप्टेंबर, १९२८ ला दिल्ली येथे लाल किल्ल्याच्या एका कोपऱ्यात या क्रांतिकारकांची गुप्त बैठक भरली आणि 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेच्या एका विभागाकडे शस्त्रे गोळा करणे आणि ठरलेला कार्यक्रम निर्भयपणे पार पाडणे, हे काम सोपवण्यात आले. या विभागाचे नाव होते, 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी' आणि तिचे प्रमुख होते, चंद्रशेखर आझाद.

१९१७ साली रशियात साम्यवादी क्रांती झाली होती. त्या मार्गानेच भारतात क्रांती करावी लागेल, असे भगतसिंगांना वाटत होते. सुरवातीचे उद्दिष्ट भारताला साम्राज्यशाहीच्या जोखडातून मुक्त करणे, हे ठेवून पुढे समाजवादी प्रजासत्ताक भारत निर्माण करायचा, असे भगतसिंगांचे स्वप्न होते.

१९२८ मध्ये सायमन कमिशन भारतात आले, तेव्हा या कमिशनचे स्वागत निदर्शनांनी झाले. लाहोर येथे निदर्शनावर झालेल्या लाठीहल्ल्यात लाला लजपतराय यांच्यावरही

पोलिसांनी प्रहार केले होते. या मारहाणीचा लालाजींच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊन १७ नोव्हेंबरला त्यांचे निधन झाले. निदर्शनात लाहोरमधील भगतसिंग, भगवतीचरण, सुखदेव आदी तरुण होतेच. लालाजींच्या मृत्यूनंतर या तरुणांनी या अमानुष कृत्याचा बदला घेण्याचे ठरवले. १७ डिसेंबरला भगतसिंग, चंद्रशेखर आणि राजगुरू हे आखलेल्या बेताप्रमाणे लालाजींवर प्रहार करणाऱ्या स्कॉट या अधिकाऱ्याच्या ऑफिसकडे गेले. त्या ऑफिसमधून सॉंडर्स हा पोलीस अधिकारी बाहेर आला. तेव्हा त्याला स्कॉट समजून राजगुरू व भगतसिंग यांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. सॉंडर्स तत्काळ गतप्राण झाला. यानंतर पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त केला. तरीदेखील भगतसिंग, राजगुरू व चंद्रशेखर आझाद गुप्तपणे लाहोरमधून बाहेर पडले.

हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लीकन असोसिएशनचा विस्तार वाढतच होता. बंगालमधील जतींद्रनाथ दास त्यांच्या सहकाऱ्यांसह असोसिएशनमध्ये सामील झाले. शिवराम राजगुरू यांच्याबरोबरच वैशंपायन, सावरगावकर आदी महाराष्ट्रातील क्रांतिकारकही या संघटनेस येऊन मिळाले. संघटनेने सहारणपूर येथे बॉंब तयार करण्याचे केंद्र सुरू केले आणि त्याची जबाबदारी डॉ. गया प्रसाद यांच्यावर टाकली.

रशियन राज्यक्रांतीनंतर मानवेंद्रनाथ रॉय यांनी साम्यवादी वाङ्मय गुप्तपणे भारतात पाठवण्यास सुरुवात केली. त्या दिशेने विचार करणाऱ्या डांगे, निमकर, जोगळेकर आदी तरुणांना हे साहित्य मिळाले. त्यांनी कामगार संघटना उभारण्यास सुरुवात केली. मुजफ्फर अहमद यांनीही असेच कार्य सुरू केले. सरकारने या चळवळीचा निःपात करायचे ठरवले आणि डांगे, जोगळेकर, सोली बाटलीवाला आदींना २० मार्च, १९२९ ला अटक करून त्यांच्यावर सरकार उलथून पाडण्याचा आरोप ठेवून खटला भरला. हा खटला 'मीरत कटाचा खटला' या नावाने देशभर फार गाजला.

या खटल्यामुळे देशभर प्रचंड जागृती झाली. कामगार संघटना ही स्वातंत्र्यलढ्यातील आघाडीची फळी होईल, असा विश्वास देशात निर्माण होऊ लागला. रशियात झालेल्या क्रांतीमुळे जगभर नव्या विचारांचे वारे वाहू लागले होते. ते भारतातही येऊन पोहोचले.

या घडामोडींमुळे ब्रिटिश साम्राज्यवादी हबकून गेले आणि त्यांनी दडपशाहीचा मार्ग स्वीकारण्याचे ठरवले. याचाच परिणाम म्हणजे क्रांतिकारकांच्या चळवळीचे निर्मूलन करण्यासाठी ब्रिटिश सरकारने केंद्रीय कायदेमंडळात दोन विधेयके मांडली. या विधेयकांमुळे नागरी स्वातंत्र्याचे सर्व हक्क नष्ट करण्याचा आणि कामगारांचे लढे चिरडून टाकण्याचा अधिकार सरकारला मिळणार होता. पंडित मोतीलाल नेहरू, बॅ. जयकर या केंद्रीय कायदे-मंडळातील लोकप्रतिनिधींनी या विधेयकांना कायदेशीर हरकत घेतली. त्या वेळी विठ्ठलभाई पटेल हे मध्यवर्ती कायदेमंडळाचे अध्यक्ष होते. त्यांनी बॅ. जयकर व मोतीलाल नेहरू यांच्या मुद्द्यांवर आपण ९ एप्रिल, १९२९ ला निर्णय देऊ, असे जाहीर केले.

याच वेळी आपल्या संघटनेत 'या जुलमी काळ्या कायद्याच्या निषेधार्थ आपण

जगाचे लक्ष वेधून घेईल, असे निदर्शन करावे', असा निर्णय भगतसिंगांनी मान्य करून घेतला. ९ एप्रिल, १९२९ ला भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त मध्यवर्ती कायदेमंडळाच्या प्रेक्षागृहात जाऊन बसले. असेंब्लीचे अध्यक्ष उभे राहताच भगतसिंगांनी बाँब टाकला आणि सर्वांच्या कानठळ्या बसवणारा आवाज झाला. इतक्यात बटुकेश्वर दत्त यांनी दुसरा बाँब टाकला. त्याचाही स्फोट झाला. भगतसिंगांनी लाल रंगातील पत्रके सर्वत्र फेकली. भगतसिंग व दत्त शांतपणे उभे राहिले आणि पोलिसांनी त्यांना अटक केली.

७ मे, १९२९ ला भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांच्यावर खटला सुरू झाला. तेव्हा त्यांनी न्यायाधीशांसमोर निर्भयपणे निवेदन केले. या निवेदनातील काही भाग पुढीलप्रमाणे :

'वटहुकूम आणि सेफ्टी बिल यांमुळे भारतातील स्वातंत्र्याची ज्योत विझणार नाही, हे आम्हांला साम्राज्यवाद्यांना बजावायचे होते. स्वातंत्र्य हा सर्वांचा अविनाशी जन्मसिद्ध हक्क आहे. या उदात्त ध्येयासाठी आम्हांला जी शिक्षा होईल, तिचे आम्ही स्वागतच करतो'.

भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली.

भगतसिंगांचा सॉंडर्स खुनाशी संबंध असावा, असा पोलिसांना संशय होता. त्यांच्याकडून कबुलीजबाब मिळवण्याकरता पोलिसांनी त्यांचा भयंकर छळ केला. परंतु भगतसिंगांनी तोंडातून अक्षरही काढले नाही. पोलीस अनेक ठिकाणी झडत्या घेत असताना त्यांना अचानक लाहोर येथील बाँब फॅक्टरीचा सुगावा लागला. त्यानंतर हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या अनेक क्रांतिकारकांना अटक करण्यात आली आणि भगतसिंगांसह सर्वांवर लाहोर कटाचा खटला सुरू करण्यात आला.

हा खटला चालू असताना, राजकीय कैद्यांना गुन्हेगार म्हणून वागवू नये, या मागणीसाठी भगतसिंग व त्यांचे सहकारी यांनी उपोषण केले. जतींद्रनाथ दास यांनी सहासष्ट दिवस उपोषण केले व त्यातच त्यांचे निधन झाले.

न्याबालयाने भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. सात आरोपींना जन्मठेप व उरलेल्या आरोपींना दीर्घ मुदतीच्या सक्तमजुरीच्या शिक्षा देण्यात आल्या.

चंद्रशेखर आझाद हे अद्यापही सरकारच्या हाती सापडले नव्हते. तुरुंगावर हल्ला करून भगतसिंग आदींची सुटका करावी, असा त्यांचा बेत होता. त्यासाठी अलाहाबाद येथे २६ फेब्रुवारी, १९३१ ला चंद्रशेखर आझाद यांनी आपल्या सहकाऱ्यांची गुप्त बैठक घेतली. पुढील बेत निश्चित करण्यासाठी दुसऱ्या दिवशी आल्फ्रेड पार्कमध्ये त्यांनी आपल्या दोन सहकाऱ्यांना बोलावून घेतले. दुर्दैवाने एका पोलिसाने त्यांना ओळखले आणि तत्काळ अधिकाऱ्यांना खबर दिली. पोलिसांनी अल्पावधीतच त्यांना घेरले. चंद्रशेखर यांनी निर्भयपणाने पोलिसांच्या गोळीबाराला प्रत्युत्तर दिले. एका झाडाआड उभे राहून त्यांनी पोलिसांशी झुंज दिली. अखेर गोळी लागून चंद्रशेखर आझाद गतप्राण होऊन पडले.

''मी आझाद आहे. स्वतंत्र आहे. तुमच्या हातात जिवंत सापडणार नाही !''

ही आपली प्रतिज्ञा चंद्रशेखर आझाद यांनी पुरी केली.

चंद्रशेखर आझाद यांच्या वीरमरणाची बातमी ज्या वेळी लाहोर तुरुंगात असलेल्या भगतसिंग, राजगुरू आदी क्रांतिकारकांना समजली, त्या वेळी त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला. 'इन्किलाब झिंदाबाद' अशी घोषणा करीत त्यांनी आपल्या दिवंगत सेनापतीला श्रद्धांजली वाहिली.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा झाल्यानंतर त्यांनी पंजाबच्या गव्हर्नरला एक पत्र लिहिले :

'आम्ही ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध युद्ध पुकारले होते, म्हणून आम्हांला युद्धकैद्यांसारखे वागवले पाहिजे. खुन्यांप्रमाणे फाशी न देता युद्धकैद्यांप्रमाणे गोळ्या घालून आम्हांला मृत्युदंड दिला पाहिजे.'

अखेरच्या क्षणापर्यंत भगतसिंग, राजगुरू व सुखदेव जोशात होते.

२३ मार्च, १९३१ ला 'इन्किलाब झिंदाबाद', 'क्रांती अमर रहे', अशा घोषणा देत ते फासावर गेले.

त्यांच्या या वीरमरणामुळे असंख्य तरुणांची मने पारतंत्र्याविरुद्ध पेटून उठली.

याच कालखंडातील चितगाव शस्त्रागारावरील धाड विशेष प्रसिद्ध आहे. सूर्यसेन, गणेश घोष, अनंत सिंग अशा क्रांतिकारकांच्या नेतृत्वाखाली दोनशेहून अधिक तरुण संघटित झाले. त्यांनी शस्त्रागारावरील धाडीची योजना आखली. या कामासाठी त्यांनी आपले चार गट पाडले त्यांपैकी एका गटाने शस्त्रागारावरील सुरक्षा-सैनिकांना ठार करून शस्त्रे लुटली. घाईगडबडीत काडतुसे मात्र त्यांच्या हाती लागली नाहीत. मालगाडी उलथून दळणवळण बंद पाडणे किंवा टेलिफोन एक्स्चेंज उद्ध्वस्त करून त्याला आग लावणे ही कामे उरलेल्या गटांनी केली.

शस्त्रागाराच्या लुटीनंतर क्रांतिकारक जलालाबाद या जवळच्या डोंगरावर गेले; पण ब्रिटिश सैनिकांना याचा सुगावा लागला. त्यामुळे क्रांतिकारकांशी त्यांची चांगलीच चकमक घडून आली. १२ क्रांतिकारक, तर काही ब्रिटिश सैनिक मारले गेले. क्रांतिकारकांची पांगापांग झाली. त्यांच्यापैकी १६२ जणांना मोठ्या प्रयासाने पकडण्यात आले.

चितगाव खटल्यात सूर्यसेन, तारकेश्वर दस्तिदार, अंबिका चक्रवर्ती अशा १२ जणांना फाशीची, तर कल्पना दत्त आदींना जन्मठेपेची शिक्षा झाली. युरोपीय अधिकाऱ्यांच्या क्लबवर हल्ला करणाऱ्या प्रीतिलता वड्डेदार या युवतीने आत्माहुती दिली.

चितगाव कट हा अत्यंत संघटितपणे व धडाडीने आखलेला कट होता. या कटामुळे भारून जाऊन अनेक तरुण सशस्त्र मार्गाकडे वळू लागले. चितगाव कटातला युवतींचा सहभाग उल्लेखनीय होता.

१९३१ च्या डिसेंबरमध्ये अवघ्या १५ वर्षांच्या दोन शाळकरी मुलींनी कोमिल्ला येथे जिल्हाधिकाऱ्याला पिस्तुलाने ठार केले. या मुलींची नावे होती शांती घोष आणि सुनीती चौधरी.

या घटनेपाठोपाठ दोन महिन्यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळेला बंगालच्या गव्हर्नरवर गोळ्या झाडण्यात आल्या. ही कामगिरी बीना दास या युवतीने पार पाडली.

महाराष्ट्रात फर्गसन कॉलेजमधील वासुदेव बळवंत गोगटे या क्रांतिकारक तरुणाने गव्हर्नर हॉटसनवर गोळी झाडली. गोगटे यांना दीर्घ मुदतीच्या कारावासाची शिक्षा झाली.

या कालखंडात अनेक भारतीयांनी अग्निदिव्य केले. अनेक वर्षे कारागृहात खितपत पडले असतानादेखील हे क्रांतिकारक गर्जत होते,

"मृत्युंजय आम्ही, आम्हांला कसले कारागार."

या क्रांतिकारकांपैकी जे फाशी गेले, ते अखेरच्या क्षणीही म्हणत होते :

"सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते<br>
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते..."

# ८. सामान्यांचे शस्त्र : सत्याग्रह

१९२२ मध्ये असहकाराची चळवळ मागे घेतल्यानंतर पंडित मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास आदी नेत्यांनी सांसदीय राजकारणाचा मार्ग स्वीकारला. त्याच वेळी क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी आत्मार्पण केले. गांधीजी व त्यांचे सहकारी आत्मार्पण करायला तयार होते; परंतु केवळ मूठभर व्यक्तींच्या बलिदानामुळे स्वातंत्र्यचळवळ बलशाली होऊ शकणार नाही, असे गांधीजींना मनोमन वाटत होते. स्वातंत्र्यासाठी सर्व जनतेने थोडा तरी त्याग केला पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती. मूठभर असामान्य व्यक्तींनी सर्वस्वाचा त्याग करायचा आणि इतरांनी केवळ त्यांच्या त्यागाचे पोवाडे गायचे, ही कल्पना गांधीजींना मान्य नव्हती. 'प्रत्येक भारतीयाने स्वातंत्र्यलढ्यात स्वतःचा वाटा उचलला पाहिजे', असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

'यंग इंडिया' या वृत्तपत्राच्या २१ मे, १९२५ च्या अंकात त्यांनी लिहिले आहे:

'स्वराज्याच्या यात्रेची वाटचाल खडतर आहे... त्यासाठी देशातील आम जनतेचे शिक्षण करावे लागेल. त्यातूनच राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करता येईल. एखादा जादूगार जसे क्षणात आंब्याचे झाड उभे करतो, तसे हे कार्य झटपटपणे करता येणार नाही. वटवृक्ष कसा व केव्हा वाढतो, ते कोणाला दिसत नाही, कळत नाही. त्याचप्रमाणे आपण निष्ठेने लोकांत काम केले, तर समोर फारसे काही न दिसता राष्ट्राभिमानाचा हा वृक्ष सावकाश वाढत जाईल.'

जनतेचे शिक्षण म्हणजे जनतेमध्ये श्रमाची प्रतिष्ठा, स्वावलंबन व स्वाभिमान या भावना जागृत करणे, यासाठी कार्यकर्त्यांना पुढाकार घेऊन प्रत्यक्ष काम करणे आवश्यक होते. या कामात शाळा चालवणे, अस्पृश्यता दूर करणे, खादी व चरखा यांचा प्रसार करणे, कुटीरोद्योग चालवणे, सफाईकाम करणे इत्यादी विधायक कामांचा समावेश होतो.

विधायक कामातून लोकांच्या मनांत स्वातंत्र्यभावना रुजवण्याची गांधीजींची कल्पना उदात्त आणि व्यवहार्य होती. या कामात गांधीजींना अनेक निष्ठावान अनुयायी मिळाले.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपला वकिलीचा व्यवसाय सोडून बिहारमधील शेकडो खेड्यांमधून विधायक कामाची केंद्रे सुरू केली.

उडीसामध्ये नबकृष्ण चौधरी आणि त्यांच्या पत्नी यांनीही दारिद्र्याने पिचलेल्या शेतकऱ्यांमध्ये विधायक काम सुरू केले.

१९२० च्या चळवळीत गांधीजींच्या हाकेला 'ओ' देऊन कॉलेज सोडणाऱ्यांमध्ये अप्पासाहेब पटवर्धन हे होते. त्यांना सहजासहजी प्राध्यापक होता आले असते; परंतु गांधीजींनी त्यांना महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यात काम करण्यास सांगितले. खादीचा संदेश खेड्यांतील जनतेपर्यंत नेत असतानाच अप्पांनी ग्रामसफाईचे काम हाती घेतले आणि लोकांना स्वच्छतेचे शिक्षण दिले. ते सफाईकामही करत आणि गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे सर्वांत उपेक्षित आणि तळागाळातल्या माणसाशी आपले आणि स्वराज्याच्या चळवळीचे नाते जोडत.

अशा तऱ्हेने देशाच्या सर्व भागांतून गांधीजींचे अनुयायी कसलीही अपेक्षा न करता कमालीच्या साधेपणाने राहून विधायक काम करू लागले. हळूहळू त्यांच्याबद्दल लोकांमध्ये प्रेम आणि आदर निर्माण होऊ लागला आणि लोक त्यांना गांधीजींची माणसे म्हणून ओळखू लागले.

स्वातंत्र्याबद्दल केवळ भाषणे करून लोकांना जागृत करता येणार नाही, हे गांधीजींनी बरोबर ओळखले होते. भारतीय जनतेची भीषण गरिबी प्रथम दूर झाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. गांधीजी लोकांना सांगत,

"मी दरिद्रीनारायणाचा भक्त आहे."

जोपर्यंत या देशातील कोट्यवधी लोक अर्धनग्न आहेत, तोपर्यंत एक पंचा नेसूनच राहायचे, असा गांधीजींनी निर्धार केला. हा विधायक कामाचा संदेश देशभर पसरवत गांधीजींनी १९२५ नंतर एक देशव्यापी दौरा काढला. या दौऱ्यामुळे लोकांमध्ये फार मोठी राजकीय जागृती झाली.

काँग्रेसने 'परदेशी कापडावर बहिष्कार' हा कार्यक्रम आखला. गांधीजींनी १९ जानेवारी, १९२९ च्या 'यंग इंडिया'च्या अंकामधून या कार्यक्रमाबाबत पुढील सूचना केली:

'परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार घालावा. लोकांमध्ये खादीचा प्रसार करावा. परदेशी कापड वा कपडे यांची जाहीररीत्या होळी करावी; आणि जेथे शक्य असेल, तेथे परदेशी कापडाच्या दुकानांवर निरोधन करावे.'

डिसेंबर, १९२९ मध्ये लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. अधिवेशनाच्या अध्यक्षपदी पंडित जवाहरलाल नेहरू होते. ३१ डिसेंबर, १९२९ ला रावी नदीच्या तीरावर भरलेल्या काँग्रेसच्या या अधिवेशनात भारताला संपूर्ण स्वातंत्र्य हवे, अशी स्पष्ट मागणी करणारा ठराव एकमताने मंजूर झाला. या वेळी अध्यक्षीय भाषणात पंडित नेहरू म्हणाले,

''भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, ही आमची खंबीर भूमिका आहे. आम्ही पार्लमेंटला व जगाच्या सद्सद्विवेकबुद्धीला हे सांगू इच्छितो, की भारत यापुढे परकीय सत्तेपुढे नमणार नाही.''

दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून देशभर पाळावा, असा निर्णय घेण्यात आला आणि २६ जानेवारी, १९३० रोजी देशभर जनतेने जाहीरपणे स्वातंत्र्याची प्रतिज्ञा केली.

अशा रीतीने स्वातंत्र्यदिन साजरा करणे ही स्वातंत्र्याची पहाटच होती. आता स्वातंत्र्यलढ्याचे नवे पर्व लवकरच सुरू होईल, याची देशातील जनतेला कल्पना आली. परंतु त्याचे स्वरूप कसे असेल, याचा मात्र कुणालाही अंदाज आला नव्हता.

गांधीजी या वेळी साबरमती आश्रमात राहत होते. दीर्घकाळ चिंतन केल्यानंतर मिठावर कर लादणाऱ्या कायद्याचा भंग करणे, हे कायदेभंगाच्या चळवळीचे स्वरूप गांधीजींनी निश्चित केले. गांधीजींनी हा निर्णय जाहीर केल्यावर सुरवातीस त्यांचे काही सहकारीही चक्रावून गेले. भारतातील अनेक कार्यकर्त्यांना चळवळीचे हे स्वरूप पटले नाही. म्हणून त्यांनी प्रथम मिठाच्या संकल्पित सत्याग्रहाची अवहेलना केली. मीठ हा माणसाच्या दैनंदिन जीवनात लागणारा एक अत्यावश्यक घटक आहे. ती निसर्गाची एक देणगी आहे. ब्रिटिश सरकारने मिठावर कर लादून जनतेवर अन्याय केलेला होता. गांधीजींनी भारतीय जनतेची नाडी नेमकी ओळखली होती. त्यांनी ठरवलेल्या कायदेभंगाच्या मार्गांनी लोकांच्या मनाची एकदम पकड घेतली. पंडित नेहरूंनी याबद्दल आत्मचरित्रात लिहिले आहे.

'प्रथम आम्ही काहीसे स्तंभित झालो. मिठासारख्या साध्या वस्तूचा राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याशी संबंध जोडणे आम्हांला सोपे वाटत नव्हते. परंतु मीठ या शब्दाला अचानक एक वेगळे सामर्थ्य प्राप्त झाले.'

कवी ग. दि. माडगूळकर यांनी म्हटले आहे –

''उचललेस तू मीठ मूठभर
साम्राज्याचा खचला पाया.''

गांधीजींनी कायदेभंगाची योजना जाहीर केली. १२ मार्च, १९३० ला साबरमती आश्रमातून अठ्याहत्तर सहकाऱ्यांसमवेत निघून दांडी येथील समुद्रकिनाऱ्यापर्यंत जवळजवळ ३८५ किलोमीटर चालत जायचे आणि तेथे कायदा मोडून मीठ तयार करायचे, अशी ही योजना होती. गांधीजींनी आपल्या कायदेभंगाच्या चळवळीबद्दल व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांना पूर्वसूचना दिली होती; परंतु आयर्विन यांना चिमूटभर मिठाच्या साह्याने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढा देण्याची गांधीजींची कल्पना हास्यास्पद वाटली. मूठभर मिठामुळे ब्रिटिश साम्राज्याचा पायाच हादरेल, ही कल्पना त्यांना स्वप्नातही शिवली नाही.

दांडीयात्रेला निरोप देण्यासाठी जवळजवळ पाऊण लाख लोक साबरमती आश्रमात जमले. जगातील वेगवेगळ्या देशांचे वार्ताहर मोठ्या संख्येने दांडीयात्रा पाहण्यासाठी भारतात येऊन दाखल झाले. गांधीजी आणि त्यांचे ७८ सहकारी यांचा हा जथा पदयात्रा करत दांडीच्या दिशेने कूच करू लागला. वाटेत प्रत्येक खेड्यामध्ये लोकांनी या सत्याग्रही यात्रेचे अपूर्व उत्साहाने स्वागत केले. गांधीजी लोकांसमोर छोटेसे भाषण करीत. या भाषणांतून गांधीजी लोकांना 'निर्भय बनून कायदेभंगाच्या चळवळीत सामील व्हा', असे सांगत. त्यांच्या मार्गावरील अनेक गावांतील सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या नोकरीचे राजीनामे दिले.

दांडीयात्रेमुळे जे नवचैतन्य निर्माण झाले, त्यामुळे गांधीजींचे टीकाकार चकित झाले.


ठरल्याप्रमाणे ही सत्याग्रही यात्रा ५ एप्रिलला दांडीला पोहोचली आणि ६ एप्रिल रोजी त्यांनी तेथील समुद्रकिनाऱ्यावर सत्याग्रह केला. गांधीजींच्या आवाहनास लोकांनीही अभूतपूर्व प्रतिसाद दिला. मिठाचा कायदा मोडणे ही एक 'प्रतीकात्मक कृती' होती. ब्रिटिश सरकारचे कायदे भारतीय जनता मानणार नाही, असे या कायदेभंगाच्या द्वारे जाहीर करण्यात आले.

ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तित्वालाच आव्हान देणाऱ्या या चळवळीचा नि:पात करण्याचा ब्रिटिश सरकारने चंग बांधला. अनेक नेत्यांना पकडण्यात आले. गांधीजींनी स्वतः सुरत जिल्ह्यात धारासना येथे कायदेभंग करायचे ठरवले होते, पण त्यांनाही ताबडतोब अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेनंतर सरोजिनी नायडू यांनी धारासनाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

या सत्याग्रहाचे वर्णन अमेरिकन वार्ताहर वेब मिलर यांनी केले आहे :

'मोर्चा सुरू होण्यापूर्वी सर्व स्वयंसेवकांनी प्रार्थना म्हटली. सरोजिनी नायडू त्यांना म्हणाल्या, की भारताची सर्व प्रतिष्ठा तुमच्या हाती आहे. कोणत्याही परिस्थितीत तुम्ही हिंसा करता कामा नये.

'गांधीजींचे अनुयायी एकत्र आले. त्यांनी 'इन्किलाब झिंदाबाद' ही घोषणा केली. नंतर मिठागराच्या तारेच्या कुंपणापर्यंत सत्याग्रही आले. पोलीस अधिकाऱ्याचा हुकूम न मानता सत्याग्रहींचा जथा पुढे पुढे चालत राहिला. पोलीस त्यांच्यावर तुटून पडले. पोलादी सांबा



चरखा : एक शक्ती



मिठाचा सत्याग्रह, वडाळा

लावलेल्या लाठ्यांचे तडाखे ते सत्याग्रहींच्या डोक्यांत हाणू लागले. जबर फटक्यांमुळे सत्याग्रही खाली कोसळले. अनेकांची डोकी फुटली. अनेकांचे खांदे मोडले. सर्वजण रक्तबंबाळ झाले. पहिलीच्या पाठोपाठ सत्याग्रहींची दुसरी तुकडीही निर्धाराने पुढे आली. पोलिसांनी त्यांना तशीच निर्दयपणे मारहाण केली. निर्भयपणे आघात सोशीत ते सत्याग्रही खाली कोसळले. जखमी सत्याग्रहींना उचलून स्वयंसेवक जवळच्या झोपडीतल्या तात्पुरत्या दवाखान्यात आणत होते.'

मृत्यूला भीक न घालता हजारो सत्याग्रहींनी झुंजार मनाने कायदेभंग केला.

निर्भयता, तसेच यातना सहन करण्याचे अफाट सामर्थ्य भारतीय सत्याग्रहींनी देशभर दाखवले.

मुंबईत वडाळा येथे पंधरा हजार सत्याग्रहींनी मिठाचा कायदा तोडला. पोलिसांनी भीषण लाठीमार केला. पोलिसांच्या घोड्यांच्या टापांखाली अनेकजण तुडवले गेले; परंतु सत्याग्रही कोठेही जागेवरून हालले नाहीत.

मिठाचा सत्याग्रह प्रतीकात्मक होता. सरकारच्या जुलमी कायद्यांना विरोध करणे हा त्याचा खरा अर्थ होता. जेथे मिठागरे नव्हती, तेथे लोकांनी जंगल कायदे मोडण्यास सुरवात केली. ठिकठिकाणी सत्याग्रही सरकारच्या राखीव जंगलात शिरत, तेथील गवत कापून त्याचे भारे करत. 'जंगल का कायदा तोड दिया', अशा घोषणा देत जंगलाबाहेर येत. ब्रिटिश पोलिसांची तुकडी त्यांच्या स्वागताला हजरच असे. सगळ्या सत्याग्रहींना पकडण्यात येई आणि तुरुंगात डांबले जाई.

असे सत्याग्रह देशभर झाले.

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील बिळाशीचा जंगल सत्याग्रह अशाचपैकी एक. बिळाशी गाव सागवानासाठी प्रसिद्ध होते. गावाच्या शेजारीच सरकारचे राखीव सागवानी रान होते. या रानातील एक झाड तोडून त्याचा ध्वजस्तंभ करण्याचे गावकऱ्यांनी ठरवले. महादेवाच्या देवळाच्या आवारात एक सागवानी ध्वजस्तंभ सत्याग्रही स्वयंसेवकांनी उभा केला आणि त्यावर तिरंगी झेंडा फडकावला. पोलिसांनी झेंडा पाडण्याचा प्रयत्न करताच आसपासच्या गावांतील हजारो गावकरी झेंड्याच्या रक्षणासाठी धावून आले. १८ जुलैपासून ५ सप्टेंबरपर्यंत बिळाशीवर तिरंगी झेंडा फडकत होता. ५ सप्टेंबरला पोलिसांची भली मोठी तुकडी बिळाशीला आली. त्यांनी स्वयंसेवकांवर आणि गावकऱ्यांवर तुफानी लाठीहल्ला चढवला. त्यात दोन सत्याग्रही मरण पावले. अनेक जण घायाळ झाले. पोलिसांनी सागवानी ध्वजस्तंभ आणि तिरंगा ताब्यात घेतला.

या सत्याग्रहात सगळी पंचक्रोशी एकत्र आली होती. विशेष म्हणजे स्त्रियांनी यात

प्रत्यक्ष आणि फार मोठ्या प्रमाणावर भाग घेतला होता. शहरी स्त्रियांप्रमाणे ग्रामीण स्त्रियाही जागृत झाल्या होत्या.

गांधीजींचा हा कायदेभंग सत्याग्रह भारताच्या कोनाकोपऱ्यांत पोचला होता. रानावनात राहणारे आदिवासीही या सत्याग्रहाने जागे झाले. गांधीजींचा आदेश शिरसावंद्य मानून ते या सत्याग्रहात उतरले.

महाराष्ट्रात बागलाण येथील सत्याग्रहात प्रचंड संख्येने आदिवासी सामील झाले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केलेल्या गोळीबारात अनेक सत्याग्रही मरण पावले.

वायव्य सरहद्द प्रांत हा पठाणांचा प्रांत. पठाण हे केवळ शस्त्राची भाषा समजू शकतो, असे सर्वांना वाटत होते; परंतु खान अब्दुल गफारखान हे गांधीजींच्या शिकवणुकीमुळे प्रभावित झाले. स्वातंत्र्यचळवळीसाठी आत्मार्पण करण्याची तयारी केली पाहिजे, ही गांधीजींची शिकवण त्यांनी पठाणांना दिली. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्यासाठी लढण्याकरिता खान अब्दुल गफारखान यांनी पठाणांची जी संघटना उभारली, तिचे नाव होते 'खुदा-इ-खिदमदगार'. लाल डगले घातलेले ते उंचेपुरे धिप्पाड पठाण सर्वांचे लक्ष वेधून घेत. गरीब शेतकऱ्यांचा त्यांना पाठिंबा होता.

खान अब्दुल गफारखान यांच्या नेतृत्वाखाली खुदा-इ-खिदमदगारांनी वायव्य सरहद्द प्रांतात अनेक ठिकाणी कायदेभंग केला. पेशावरला कायदेभंगाच्या चळवळीची सुरवात झाली. मिरवणुकीतील नेत्यांना सरकारने अटक केली. खुदा-इ-खिदमदगार व अनेक लोक शांततापूर्ण निदर्शने करत होते. ब्रिटिशांनी तेथे चिलखती गाड्या आणल्या आणि या शांततापूर्ण निदर्शनांवर गोळीबार करण्याचा गढवाल पलटणीस हुकूम दिला; परंतु गढवाल पलटणीने नि:शस्त्र आणि शांततापूर्ण सत्याग्रहींवर गोळीबार करण्याचे नाकारले. या आज्ञाभंगाबद्दल गढवाल पलटणीतील सैनिकांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या.

ठिकठिकाणच्या स्थानिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी अखिल भारतात कायदेभंगाची चळवळ अतिशय नेटाने चालवली.

महाराष्ट्रात सोलापूर येथे ६ मे या दिवशी हरताळ पाळण्यात आला. गिरणी कामगारांनी संप केला. दहा हजार स्वयंसेवकांनी मिरवणुका काढून गावातील दारूच्या दुकानांवर निरोधने केली. ८ मे या दिवशी ताडीची झाडे तोडण्यासाठी निघालेल्या लोकांची पोलिसांशी चकमक झाली. पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. १३ जण ठार झाले. शेकडोजण जखमी झाले. संतापलेल्या लोकांनी पोलीस चौकी आणि सेशन कोर्टाची इमारत यांवर हल्ले केले. अशा तंग वातावरणात सरकारने 'मार्शल लॉ' पुकारला; पण मार्शल लॉ मोडणे हासुद्धा कायदेभंगाच्या चळवळीचा भाग बनला. सोलापूरच्या चळवळीत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून स्वयंसेवकांच्या तुकड्या तेथे गेल्या.

मार्शल लॉचा अंमल ४९ दिवस होता; पण या काळात शहरावर खरा कब्जा जनतेचाच होता.

सोलापूरसारखा उठाव इतरत्र होऊ नये, यासाठी सरकारने उठावात भाग घेणाऱ्यांना कडक शिक्षा केल्या. मलाप्पा धनशेट्टी, श्रीकृष्ण सारडा, कुर्बान हुसेन व जगन्नाथ शिंदे या चौघांना फाशी देण्यात आले. या दडपशाहीचा निषेध करणारी निदर्शने साऱ्या देशभर झाली.


परदेशी क:पडावरील बहिष्कार हा मुंबई येथील चळवळीचा एक प्रमुख कार्यक्रम होता. विदेशी कापडांनी भरलेल्या ट्रकना दुकानापर्यंत जाऊच द्यायचे नाही, असा स्वयंसेवकांनी निर्धार केला. १२ डिसेंबर, १९३० ला परदेशी कापड नेणारा एक ट्रक बाबू गेनू या तरुण कामगाराने अडवला. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील म्हाळुंगे पडवळ या गावातून नोकरीसाठी मुंबईत आलेल्या या कामगाराचे मन देशभक्तीने भारलेले होते. परदेशी कापडाचा ट्रक समोर दिसताच बाबू गेनू पुढे धावला आणि 'मी हा ट्रक पुढे जाऊ देणार नाही', असे म्हणत ट्रकसमोर आडवा पडून राहिला. पोलिसांनी धमकी दिली, तरी बाबू गेनू जागचा हालला नाही. अधिकाऱ्याच्या हुकमावरून ड्रायव्हरने ट्रक सुरू केला. तरीही बाबू गेनू डगमगला नाही. क्षणार्धात ट्रक पुढे निघाला आणि बाबू गेनू ट्रकखाली चिरडला जाऊन गतप्राण झाला. खेड्यातून आलेला हा तरुण अहिंसक लढ्यात हुतात्मा झाला. ब्रिटिशांनी केलेल्या बाबू गेनूच्या हत्येच्या निषेधार्थ मुंबईतील गिरणी कामगारांनी हरताळ पाळला.

सरकारला वाटले, एका बाबू गेनूला चिरडून सर्वच चळवळ चिरडता येईल, पण प्रत्यक्षात घडले, ते उलटेच. लोक चिडले आणि ब्रिटिश साम्राज्य नष्ट करण्याचा त्यांचा निर्धार अधिकच दृढ झाला.

१९३० च्या स्वातंत्र्य आंदोलनात भारतीय महिलांनी अलौकिक कामगिरी केली. परंपरेने जखडलेल्या समाजात स्त्रियांवर फार कडक बंधने होती. भारतातील थोर समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी स्त्रियांना शिक्षण मिळावे आणि स्वातंत्र्य मिळावे, यासाठी चळवळी केल्या. महाराष्ट्रात महात्मा फुले, आगरकर, पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे आदींनी स्त्री-शिक्षणासाठी खूप प्रयत्न केले; परंतु ती चळवळ शहरापुरती व मुख्यत: मध्यम वर्गापुरतीच मर्यादित राहिली.

गांधीजींनी स्त्रियांना स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होण्यास सांगितले आणि देशाच्या वेगवेगळ्या भागांतून स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला.

या महिला 'नहीं रखनी, नहीं रखनी, ये जालिम सरकार नहीं रखनी', असे म्हणून इंग्रज सत्तेला आव्हान देत. स्त्रियांनी दारूच्या दुकानांवर निरोधने करण्यात पुढाकार घेतला. सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसाबेन मेहता, अवंतिकाबाई गोखले,



स्त्रियांचा सहभाग



स्त्री-सत्याग्रही

ऊर्मिलादेवी, कमला नेहरू आदी अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्यलढ्यात अतुल धैर्य दाखवले. भारतातील स्त्रियांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले. मुंबईमध्ये बोरीबंदरजवळच्या मैदानात स्त्रियांच्या मिरवणुकीवर पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला; परंतु स्त्री-सत्याग्रहींनी तिरंगा ध्वज हातातून सोडला नाही.

भारतीय स्त्रियांमधील स्वातंत्र्याची आकांक्षा अशा निर्भय रीतीने प्रकट झालेली पाहून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे मस्तक भडकून उठले. त्यांनी अनेक स्त्री-सत्याग्रहींना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा दिल्या. तुरुंगातही स्त्री-सत्याग्रहींचा पदोपदी छळ करण्यात आला; परंतु या निर्भय स्वातंत्र्यसैनिकांची मने कधी खचली नाहीत.

कायदेभंगाच्या सत्याग्रहाने भारताला निर्भय बनवले. वर्षानुवर्षे घराच्या उंबरठ्याबाहेर न पडणाऱ्या स्त्रिया निर्भय बनून जुलमी परकी सरकारशी सामना द्यायला रणांगणात उतरल्या. घरादाराचा, आपल्या कुटुंबाचा आडोसा सोडून त्या देशासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास पुढे आल्या. पुढारल्या म्हणवल्या जाणाऱ्या पाश्चिमात्य स्त्रियांना जे जमले नाही, ते भारतातल्या अशिक्षित म्हटल्या जाणाऱ्या स्त्रियांनी करून दाखवले.

त्याचप्रमाणे ज्यांना लोक विसरत होते, ते आदिवासीसुद्धा आपल्या मायभूमीच्या रक्षणासाठी पुढे सरसावले. इतके विलक्षण सामर्थ्य गांधीजींच्या सत्याग्रहाच्या मंत्रामध्ये होते. सामान्य माणसाला शूर बनवण्याची ताकद त्यामध्ये होती. कोणा सत्याग्रहींनी कोर्टात आपला बचाव केला नाही, की वकील दिला नाही. 'होय, आम्ही कायदा मोडला', असे ते न्यायाधीशांना निर्भयपणे सांगत. दिल्या जातील, त्या शिक्षा आनंदाने भोगत.

सरकारने जबरदस्त दडपशाही व जुलूम केला. ७५ हजारांहून अधिक लोकांनी सत्याग्रह केला. त्यांना तुरुंगवासाच्या शिक्षा देण्यात आल्या. देशभरचे तुरुंग सत्याग्रहींनी भरून गेले. तुरुंगात सत्याग्रहींचे अतोनात हाल झाले.

सत्याग्रहींना अतिशय निकृष्ट अन्न दिले जाई. रोज सकाळी मीठ घातलेली ज्वारीची कांजी, संध्याकाळच्या जेवणात सर्व तऱ्हेचा पाला असलेली भाजी आणि करपलेल्या भाकरी त्यांना मिळत असत. त्यांना चक्की पिसावी लागे. मारझोड होत असे. जेलमध्ये पुरेशी औषधे नसत. असे असूनही सत्याग्रही जोशात असत. आपण स्वातंत्र्यासाठी लढणारे शिपाई आहोत, या जाणिवेने या हालअपेष्टांची पर्वा सत्याग्रहींना वाटत नसे. तुरुंगात सत्याग्रहींचे अभ्यासवर्गही चालत. भारतातील अनेक विद्वान लोक सत्याग्रहात सामील झाले होते. ते तरुण सत्याग्रहींना वाचन करायला लावत आणि वेगवेगळ्या विषयांवर त्यांच्यासमोर भाषणेही करत. अशा रीतीने तुरुंग हे एक विद्यापीठच बनले. धुळ्याच्या तुरुंगात सानेगुरुजी आपल्या बालपणच्या विद्यार्थिदशेतल्या आठवणी रोज रात्री सत्याग्रही मित्रांना सांगत आणि त्यातूनच

E0 0824
MVS, IUCAA LIBRARY

'श्यामची आई' हे अमर पुस्तक निर्माण झाले. सत्याग्रहींना भगवद्गीता समजावून सांगण्यासाठी आचार्य विनोबा भावे यांनी धुळे तुरुंगात प्रवचने दिली. सानेगुरुजींनी ती लिहून घेतली. तीच ती गीता प्रवचने. तुरुंगामध्ये एकत्रित हाल सोसताना कणखर मनाचा, सुस्पष्ट विचार असलेला कार्यकर्त्यांचा एक भक्कम संच निर्माण झाला. तुरुंगामुळे सत्याग्रहींना दहशत बसेल, असे सरकारला वाटत होते; परंतु प्रत्यक्षात सत्याग्रहींच्या ध्येयवादी वृत्तीला नवी धार प्राप्त झाली. तुरुंगाच्या अंधारकोठडीत सत्याग्रहींच्या मनाच्या गाभाऱ्यातील स्वातंत्र्याच्या ज्योतीस अधिक तेज प्राप्त झाले.

भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत वृत्तपत्रांनी फार मोठी कामगिरी बजावली. १९३० च्या चळवळीत सरकारने केलेल्या अत्याचारांच्या वार्ता वृत्तपत्रांनी लोकांपर्यंत पोहोचवल्या आणि त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड जागृती निर्माण झाली. ब्रिटिश सरकारने वृत्तपत्रांवर अनेक बंधने लादली. प्रमुख वृत्तपत्रांकडून जामीन म्हणून प्रचंड रकमांची मागणी केली. परंतु सरकारच्या या दडपशाहीपुढे भारतीय वृत्तपत्रे नमली नाहीत. अनेक संपादकांना अटक करण्यात आली, पण त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे कार्य निर्भयपणे पुढे चालवले. भारतीय वृत्तपत्रांच्या या कर्तव्यदक्ष कामगिरीमुळे स्वातंत्र्यलढ्याला नवे लखलखीत तेज प्राप्त झाले. महात्मा गांधींनी संपादित केलेल्या 'यंग इंडिया' सारख्या वृत्तपत्रांनी लोकजागृतीचे मोठे मोहोळच उठवले.

२५ जानेवारी, १९३१ ला व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी गांधीजी आणि काँग्रेसचे अन्य नेते यांची सुटका होईल, असे जाहीर केले. गांधीजींची सुटका झाली. बॅ. तेजबहाद्दुर सप्रू व बॅ. जयकर या पुढाऱ्यांच्या मध्यस्थीमुळे ५ मार्च, १९३१ ला गांधी-आयर्विन करार झाला. राष्ट्रीय सभेने कायदेभंगाची चळवळ स्थगित करावी व लंडनच्या गोलमेज परिषदेत भाग घ्यावा, असे या करारात ठरवण्यात आले. त्याचप्रमाणे इंग्रज सरकारने आंदोलनाच्या काळातील दडपशाही करणारे अध्यादेश मागे घ्यावेत आणि सर्व सत्याग्रहींची सुटका करावी, असेही ठरवण्यात आले.

भारतातील राजकीय जागृतीची ब्रिटिश सरकारला आता पूर्ण जाणीव झाली होती. जगाला लोकशाहीचे धडे देण्याचा आपला अधिकार नाहीसा होतो आहे, हेही त्यांना कळू लागले होते. एकीकडे दडपशाही करत असतानाच सरकारने सामोपचाराची बोलणीही चालू ठेवली. भारतातील परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी भारतातल्या सर्व पक्षांच्या प्रतिनिधींची एक बैठक लंडन येथे भरवण्याचा इंग्रज सरकारने निर्णय घेतला. या बैठकीलाच 'गोलमेज परिषद' असे म्हणतात. गोलमेज परिषदेचे पहिले अधिवेशन १९३० मध्ये भरवण्यात आले. त्या वेळेस कायदेभंग सत्याग्रहाची चळवळ ऐन भरात होती. काँग्रेसने या परिषदेत भाग घेण्यास नकार दिला. तरीही सरकारने परिषदेचे अधिवेशन बोलावलेच. भारतातील राजकीय पेच काँग्रेसशिवाय सोडवण्याचा ब्रिटिश सरकारचा हा केविलवाणा प्रयत्न अर्थातच फसला.

१९३१ मध्ये दुसरी गोलमेज परिषद भरली. 'भारताचे एकमेव प्रतिनिधी' म्हणून राष्ट्रीय सभेने या परिषदेसाठी महात्मा गांधींची निवड केली होती. गांधीजी परिषदेला उपस्थित राहिले. पण या परिषदेत भारतीयांत फूट पाडण्याचे फार मोठे प्रयत्न ब्रिटिश सरकारने केले आणि दलित वर्गीयांसाठी विभक्त मतदारसंघ असावे, या सूचनेला पाठिंबा दिला. गांधीजींनी ही सूचना फेटाळून लावली. गोलमेज परिषदेच्या अखेरीस गांधीजी म्हणाले,

''काँग्रेस अनेक वर्षे वनवासात राहील. परंतु स्वातंत्र्याचा वृक्ष वाढू नये, यासाठी तयार केलेली कोणतीही योजना आम्ही स्वीकारणार नाही.''

भारतीयांत फूट पाडण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणामुळे दुसरी गोलमेज परिषदसुद्धा अयशस्वी ठरली. गांधीजींनी या परिषदेत केलेली संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी मान्य झाली नाही. लष्कर, तिजोरी, परराष्ट्रीय संबंध यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टी आपल्याकडे ठेवून दुय्यम गोष्टींमध्ये भारतीयांना सत्ता देण्याची तयारी सरकारने दाखवली. गांधीजी म्हणाले,

''मी मागायला आलो भाकरी आणि माझ्या पदरात टाकण्यात आले दगड !''

गांधीजी भारतात परत आले. त्यांना तत्काळ अटक करण्यात आली. गांधी-आयर्विन करारामुळे काही काळ खंडित झालेली सत्याग्रहाची चळवळ पुन्हा जोमाने सुरू झाली. व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांनी वटहुकूम काढून देशभर जुलमी राजवट सुरू केली. तीन महिन्यांत चाळीस हजार लोकांना पकडण्यात आले. लोकांचे नीतिधैर्य खच्ची करण्याकरिता 'जे माफी मागतील, त्यांना तत्काळ सोडले जाईल', असे सरकारने जाहीर केले. परंतु कोणीही माफी मागून सुटले नाही. सरकारने काही गावांवर जबरदस्त सामूहिक दंड बसवला; परंतु लोकांच्या मनातील देशभक्तीची ज्योत मात्र अखंडपणे तेवतच राहिली.

२४ डिसेंबर, १९३२ ला काँग्रेसचे अधिवेशन दिल्लीमध्ये भरले. सरकारने काँग्रेस ही संस्था बेकायदेशीर ठरवली. तरीही काँग्रेस प्रतिनिधींनी पोलिसांना चकवून चांदणी चौकातील मोकळ्या मैदानात अधिवेशन भरवले. थोड्याच वेळात पोलिसांनी वेढा घालून त्यांना पकडले.

याच सुमारास इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनी लंडनहून एक घोषणा केली. त्यानुसार हिंदू समाजातील दलित जाति-जमातींसाठी विभक्त मतदारसंघ देण्यात येतील, असे जाहीर करण्यात आले. यालाच 'जातीय निवाडा' असे म्हणतात.

गांधीजी त्या वेळी येरवडा तुरुंगात बंदिवान होते. त्यांनी या घोषणेला विरोध म्हणून आमरण उपोषण करण्याचे जाहीर केले. हिंदू समाजाने आजवर ज्यांना अस्पृश्य म्हणून वागवले, त्या दलित जमातींना विभक्त मतदारसंघ मिळावे, अशी मागणी डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत केली होती. गांधीजींना दलित समाजावरील अन्याय दूर व्हावा आणि अस्पृश्यतेचा हिंदू धर्मावरील कलंक नष्ट व्हावा, असे वाटत होते; परंतु या दृष्टीने झालेले प्रयत्न अपुरे होते. या परिस्थितीचा फायदा घेऊन ब्रिटिशांनी 'फोडा व झोडा' हे तंत्र अवलंबले आणि विभक्त मतदारसंघ जाहीर केले. गांधीजींचे उपोषण हे ब्रिटिशांच्या या कुटिल डावपेचाविरुद्ध होते.

डॉ. आंबेडकर यांनी येरवडा तुरुंगात गांधीजींची भेट घेतली आणि त्यांच्यासमोर आपला दृष्टिकोन निर्भीडपणे मांडला. दीर्घकाळ चर्चा झाल्यावर गांधीजींचे प्राण वाचवण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी उदार मनाने स्वतःच्या भूमिकेस मुरड घातली आणि तडजोडीस मान्यता दिली. त्यानुसार येरवडा तुरुंगात 'पुणे करारा'वर गांधी व डॉ. आंबेडकर यांनी सह्या केल्या. या करारास सरकारनेही मान्यता दिली. गांधीजींनी आपले उपोषण सोडले.

पंडित मदनमोहन मालवीय हे काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते होते. त्यांचा स्वभाव कमालीचा संयमी होता. काँग्रेसचे अधिकृत प्रवक्ते म्हणून त्यांनी पुढील पत्रक काढले :

'गेल्या पंधरा महिन्यांत देशात सुमारे १ लाख, ३० हजार लोकांना स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतल्याबद्दल पकडण्यात आले आहे. अटक झालेल्यांमध्ये हजारो महिलाही आहेत. हे स्वातंत्र्य आंदोलन सहा आठवड्यांच्या आत चिरडून टाकता येईल, असे सरकारला वाटत होते. परंतु पंधरा महिने लोटले, तरीही हे आंदोलन चालू आहेच. याच्या दुप्पट काळ उलटला, तरी सरकारला स्वातंत्र्याची चळवळ नष्ट करता येणार नाही.'

## ९. नवे संदर्भ

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामावर जगातील घडामोडींचा परिणाम होणे अपरिहार्यच होते. १९२० सालापासून समाजवादी विचार सांगणारे वाङ्मय भारतात येऊ लागले. त्याच्या प्रभावामुळे 'ट्रेड युनियन' चळवळ वाढू लागली. क्रांतिकारकांनीही आपल्या संघटनेस 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' असे नाव दिले.

पंडित जवाहरलाल नेहरू १९२६ मध्ये रशियाला जाऊन आल्यावर समाजवादी विचारसरणीने प्रभावित झाले आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करतानाच 'मी समाजवादी आहे', असे उघडपणे सांगू लागले. पंडित नेहरूंची ही भूमिका राष्ट्रीय सभेतील सर्व नेत्यांना मान्य नव्हती. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर सर्वांनी एकत्र यावे, असे काही नेते म्हणत होते. स्वातंत्र्य हे सर्व भारतीयांचे एकमेव ध्येय होते, हे खरे असले, तरी शेतकरी आणि जमीनदार, कामगार आणि मालक यांचे हितसंबंध एक नव्हते. जमीनदार शेतकऱ्यांचे शोषण करत होते आणि भांडवलदार कामगारांची पिळवणूक करत होते. अशा वेळी 'स्वातंत्र्य कोणासाठी ?' हा प्रश्न अनेकांच्या मनांत निर्माण झाला. स्वातंत्र्य हे शेतकरी व कामगार यांच्यासाठीच असले पाहिजे, ही पंडित नेहरूंची भूमिका होती आणि त्यांच्याच प्रभावामुळे १९३१ मध्ये कराची येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात राष्ट्रीय सभेने गरिबांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करणारा पुरोगामी आर्थिक कार्यक्रम स्वीकारला.

आचार्य नरेंद्र देव हे काशी विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांची विद्वत्ता, निष्कलंक चारित्र्य आणि उज्ज्वल देशभक्ती यांमुळे त्यांचा विद्यार्थ्यांवर मोठा प्रभाव होता. आचार्य नरेंद्र देव यांना मार्क्सवादी विचार पटला आणि राष्ट्रीय सभेने स्वातंत्र्यलढ्यातही समाजवादी

भूमिका घ्यावी, असे त्यांना वाटू लागले.

१९३२ च्या लढ्यात भाग घेतलेल्या अनेकांना सरकारने नाशिक तुरुंगात ठेवले होते. त्यांच्यामध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया आदी नेते आणि अनेक तडफदार तरुण कार्यकर्ते होते. या सर्वांनी तुरुंगात जे वाचन केले आणि ज्या चर्चा केल्या, त्यांमधून स्वातंत्र्यसंग्रामात समाजवादी विचारांची प्रखर आघाडी असली पाहिजे, हा निर्धार त्यांच्या मनांत दृढ झाला. समाजवादी चळवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मुख्य प्रवाहापासून वेगळी होऊ द्यायची नाही, अशी स्पष्ट भूमिका घेऊन आचार्य नरेंद्र देव आणि त्यांचे सहकारी यांनी 'काँग्रेस सोशालिस्ट पार्टी' ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला.

१९३४ साली देशाच्या वेगवेगळ्या भागांतील तरुण कार्यकर्ते एकत्र आले आणि काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. पंडित जवाहरलाल नेहरू जरी या पक्षात सामील झाले नाहीत, तरी समाजवादाचा पुरस्कार ते राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून सतत करत होते.

१९३६ साली महाराष्ट्रात फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले, तेव्हा अध्यक्षीय भाषणातही पंडित नेहरूंनी समाजवादी भूमिका स्पष्ट शब्दांत मांडली. काँग्रेसच्या जुन्या नेत्यांशी पंडित नेहरूंचे खटकेही उडाले; परंतु त्यांच्या समाजाभिमुख तत्वज्ञानामुळे त्यांना अफाट लोकप्रियता प्राप्त झालेली होती. पं. नेहरूंना डावलून राष्ट्रीय चळवळ पुढे जाऊच शकत नव्हती. त्यांचा सामाजिक आणि आर्थिक समतेचा कार्यक्रम काँग्रेसला स्वीकारावा लागला. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीला एक विशिष्ट दिशा मिळाली आणि स्वतंत्र भारताच्या आर्थिक धोरणाचा पाया घातला गेला.

भारतीय समाजातल्या सर्व शक्ती एकवटून ब्रिटिशांशी लढा द्यायला अशा सिद्ध होत असतानाच, या शक्तीला खिंडारे पाडणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीही उफाळून वर येत होत्या. जातीयता ही त्यांपैकी सर्वांत मोठी प्रवृत्ती होती. भारतामध्ये अनेक शतकांपासून विविध जातिजमातींचे लोक एकत्र राहत होते. येथे येणाऱ्या नव्या लोकांना, नव्या धर्मकल्पनांना सामावून घेण्याची शक्ती इथल्या मातीत होती. परंतु मूठभर इंग्रजांना जर कोट्यवधी भारतीयांवर राज्य करायचे असेल, तर इथला समाज एकसंध होणे त्यांना परवडणारे नव्हते. जशी भारतीय राष्ट्रीय चळवळ जोम धरू लागली, तशी ब्रिटिशांची ही भीती वाढू लागली. कर्झनने बंगालची फाळणी करून फुटीरवादी शक्तींना खतपाणी घातले. त्या आधीच अलिगढ येथे मुस्लिम जमीनदारांना हाताशी धरून इंग्रजांनी भारतीय समाज फोडण्यास सुरवात केली होती. १९०६ मध्ये राष्ट्रीय सभेला शह देण्यासाठी इंग्रजांनी 'मुस्लिम लीग' ही केवळ मुस्लिमांची संघटना स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. १९०९ च्या कायद्यात मुस्लिमांना वेगळे मतदारसंघ दिले. मुसलमानांचे हितसंबंध इतरांपेक्षा वेगळे आहेत, असा प्रचार केला. हे हितसंबंध फक्त इंग्रजच जपू शकतात, अशी हाकाटीही केली. दुर्दैवाने काही हितसंबंधी मुस्लिम मंडळी या प्रलोभनाला बळी पडली. जी विवेकी होती, ती राष्ट्रीय सभेच्या मुख्य प्रवाहात राहिली.

बहुजन मुस्लिम समाज हा त्यांच्या इतर भारतीय बांधवांप्रमाणेच उदासीन होता. त्यांना धर्माच्या नावाने भडकावण्याचा प्रयत्न आपमतलबी पुढारी आणि त्यांचे इंग्रज दोस्त करू लागले. १९१६ च्या लखनऊ करारासारखे प्रयत्न विचारी लोकांनी केले; परंतु जातीयवादाची लागलेली कीड नाहीशी करणे अखेरपर्यंत शक्य झाले नाही. याची प्रतिक्रिया हिंदूंमधील जातीयवादी प्रवृत्ती बळावण्यात झाली, आणि हिंदू राष्ट्र हे ध्येय मानणाऱ्या संघटनाही निर्माण झाल्या. देशात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रतिगामी शक्तींशी सामना देण्यात राष्ट्रीय चळवळीची फार मोठी शक्ती कामी आली. हे घडले नसते, तर भारताचे स्वातंत्र्य जास्त लवकर आले असते आणि त्याचे तेजही जास्त प्रखर झाले असते.

भारताच्या राजकारणात हे नवे प्रवाह येत असतानाच ब्रिटिश सरकारने १९३५ च्या सुधारणा कायद्यानुसार निवडणुका घ्यायचे ठरवले. या निवडणुकांचा उपयोग जनतेच्या राजकीय शिक्षणासाठी करायचा आणि राष्ट्रीय सभा हीच भारताचे खरे प्रतिनिधित्व करते, हे सिद्ध करायचे, ही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून निवडणुका लढवण्याचा निर्णय राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी घेतला. राष्ट्रीय सभेला मत याचा अर्थ स्वातंत्र्यसंग्रामाला मत, हा संदेश पंडित नेहरूंनी देशभर झंझावाती दौरा करून लोकांपर्यंत पोहोचवला. या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय सभेने संपूर्ण देशात असलेल्या ८३६ जागांपैकी ७१५ जागा जिंकल्या आणि ११ प्रांतांपैकी ८ प्रांतांमध्ये बहुमत मिळवले. निवडणुकीत असा नेत्रदीपक विजय मिळवून राष्ट्रीय सभा हीच भारतीय लोकमताचे प्रतिनिधित्व करते, हे जनतेने निर्विवादपणे सिद्ध केले. या निवडणुकीमध्ये हिंदुमहासभा आणि मुस्लिम लीग या जातीय भूमिका घेणाऱ्या पक्षांचा पुरा पराभव झाला. ज्या प्रांतांमध्ये मुसलमान बहुसंख्य होते, अशा वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, पंजाब, बंगाल यांसारख्या प्रांतांतही मुस्लिम लीगचा पराभव झाला. हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांतांत हिंदुमहासभेसारख्या पक्षांचा पराभव झाला.

व्हाइसरॉयनी २७ जून, १९३७ ला 'लोकनियुक्त पक्षांच्या मंत्रिमंडळाशी गव्हर्नर संघर्ष करणार नाही', असे आश्वासन दिल्यावर काँग्रेसने अधिकार-ग्रहण केले. काँग्रेस मंत्रिमंडळांनी प्रथम सर्व राजबंद्यांची मुक्तता केली. दीर्घकाळ अंदमानात खितपत पडलेले क्रांतिकारक सन्मानाने भारतात परत आले. काँग्रेस मंत्रिमंडळांनी ज्या तीन प्रमुख सामाजिक सुधारणा केल्या, त्या अतिशय स्तुत्य होत्या. प्राथमिक शिक्षणात कार्यावर आधारलेली मूलोद्योग शिक्षण पद्धती सुरू केली. दलित समाजाची सुधारणा व्हावी, यासाठी उपाय केले आणि लोक व्यसनमुक्त व्हावेत, यासाठी दारूबंदी करण्यात आली.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. हिटलरच्या आक्रमक पवित्र्यामुळे युद्धास तोंड लागले. हिटलरने मांडलेली फॅसिझमची विचारसरणी आक्रमक आणि जगाला विनाशाकडे खेचणारी आहे, ही भूमिका पंडित नेहरूंनी स्पष्टपणे मांडली. त्याचबरोबर हिटलरचा विरोध

करताना ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढाई पुढे चालवायची आहे, ही भूमिका राष्ट्रीय सभेने घेतली. पंडित नेहरूंनी भारतीय राष्ट्रवाद साम्राज्यवादाला सतत विरोध करील, ही भूमिका काँग्रेसमध्ये व देशात मान्य करून घेतली.

त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी एकतर्फी निर्णय घेऊन, भारत इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाला, असे जाहीर केले. भारताचा हिटलरला विरोध असला, तरी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या वतीने लढण्यास भारतीय नेते तयार नव्हते. स्वतंत्र भारतच फॅसिझमच्या विरुद्ध लढू शकेल, अशी भूमिका महात्मा गांधींनी व काँग्रेसने घेतली, आणि इंग्लंडच्या युद्धप्रयत्नांस भारत कसलाही पाठिंबा देणार नाही, असे जाहीर केले. १५ नोव्हेंबर, १९३९ पूर्वी आठ प्रांतांतील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले आणि भारताचा स्वाभिमान तेजस्वीपणे व्यक्त केला.

१९४० च्या मार्च महिन्यात रामगढ येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनात 'संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय भारतीय जनतेचे कशानेही समाधान होणार नाही', अशी भूमिका आग्रहाने मांडण्यात आली.

गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू करण्याची घोषणा दिली. पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. १४ महिन्यांच्या कालावधीत सुमारे २५ हजार काँग्रेस कार्यकर्त्यांनी वैयक्तिक सत्याग्रह करून तुरुंगवास पत्करला. या सत्याग्रहाच्या द्वारा गांधीजींनी भारतात ब्रिटिश साम्राज्यविरोधी भूमिका लोकांच्या मनात रुजवली आणि अखिल भारतीय पातळीवर चळवळ सुरू करण्यासाठी वातावरण तापवण्यास सुरवात केली.

गांधीजी 'हरिजन' हे साप्ताहिक चालवत असत आणि त्याच्याद्वारा ते आपले विचार प्रकट करत. गांधीजींची शैली साधी, सरळ आणि अंत:करणाला भिडणारी होती. 'नैतिक अधोगतीच्या गर्तेतून भारताला बाहेर काढण्याचा माझा नम्र प्रयत्न आहे', असे गांधीजी सतत सांगत. लोकांनी स्वातंत्र्य मिळवण्याकरिता प्राणांचे मोल देण्यास तयार असले पाहिजे, असे ते लोकांच्या मनावर बिंबवत असत.

जगाच्या वेगवेगळ्या भागांत महायुद्ध भडकत चालले. हिटलरने रशियावर हल्ला केला आणि रशियन जनतेने अत्यंत निकराने या आक्रमणाचा प्रतिकार केला.

१५ फेब्रुवारी, १९४२ ला जपानने सिंगापूर जिंकले आणि नंतर मलाया जिंकून म्यानमारमध्ये प्रवेश केला.

या वेळी भारतात ब्रिटिशांविरोधी भावना अधिकाधिक तीव्र होत होती. 'स्वतंत्र भारतच

जपानच्या आक्रमणास तोंड देऊ शकेल', असे गांधीजींनी जाहीरपणे सांगितले आणि 'ब्रिटिश राजवट हा भारताच्या गळ्याला लागलेला फास आहे आणि तो तसाच राहिला, तर त्याचे जगावर भयावह परिणाम होतील', असा इशाराही ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना दिला.

याच सुमारास इंग्लंड, फ्रान्स, रशिया या दोस्त राष्ट्रांच्या बाजूने अमेरिका युद्धात सामील झाली. त्यामुळे दोस्त राष्ट्रांची बाजू खूपच बळकट झाली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी इंग्लंडच्या राज्यकर्त्यांवर दबाव आणून भारतीय नेत्यांशी ब्रिटिशांनी तत्काळ बोलणी करावी, असे सुचवले. सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ १९४२ च्या मार्च महिन्यात भारतात आले. त्या वेळी चर्चिल इंग्लंडचे पंतप्रधान होते. ते कट्टर साम्राज्यवादी होते. हिंदी पुढाऱ्यांशी समझोता होऊ नये, असे त्यांना मनापासून वाटत होते. सर स्टॅफर्ड क्रिप्स यांची व काँग्रेसच्या नेत्यांची भेट झाली. तेव्हा 'ताबडतोब सत्तांतर व्हावे आणि भारताला स्वातंत्र्य मिळावे', ही मागणी काँग्रेसच्या नेत्यांनी पुन्हा आग्रहाने मांडली. क्रिप्स शिष्टमंडळाने युद्धानंतर स्वातंत्र्याची बोलणी करण्याचे आश्वासन दिले. गांधीजींनी क्रिप्स योजनेचे वर्णन 'बुडणाऱ्या बँकेवरचा पुढील तारखेचा धनादेश' असे केले.

अखेर समेटाची बोलणी फिसकटली, 'मी इंग्लंडचा पंतप्रधान झालो आहे, ते साम्राज्याचे दिवाळे काढण्यासाठी नव्हे; असे उद्गार इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांनी काढले.

# १०. चले जाव !

स्वातंत्र्यलढा सुरू करण्यासाठी हीच वेळ योग्य आहे, असा निश्चय करून गांधीजींनी ब्रिटिश साम्राज्यावर जबरदस्त तडाखे हाणण्यास सुरवात केली, ब्रिटिश राज्यकर्त्यांना 'भारत सोडून चालते व्हा', असे त्यांनी रोखठोकपणे सांगितले. ३ मे, १९४२ रोजी 'हरिजन'च्या अंकात गांधीजींनी लिहिले :

'ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडून जाण्याचा समय आलेला आहे. हे घडावे, यासाठी मी माझ्या सर्व शक्ती पणाला लावीन,'

२४ मे, १९४२ च्या अंकात गांधीजींनी लिहिले :

'ब्रिटिश निघून गेले, तर येथे अराजक माजेल, ही भीती व्यर्थ आहे.'

'भारतीय जनतेने ब्रिटिशांना येथून घालवून देण्याच्या चळवळीत सामील व्हावे', असे आवाहन गांधीजींनी केले.

७ जून, १९४२ च्या 'हरिजन'च्या अंकात गांधीजींनी आपली भूमिका देशबांधवांसमोर स्पष्ट केली. गांधीजी लिहितात :

'ब्रिटिश सत्तेचे जोखड फेकून देण्याचे अहिंसक सामर्थ्य आपल्या देशात निर्माण व्हावे, म्हणून मी खूप काळ वाट पाहिली; परंतु माझ्या भूमिकेत आता बदल झाला आहे. यापुढे आणखी थांबणे शक्य नाही, असे मला वाटते. मी जर थांबलो तर जगाच्या अंतापर्यंत मला थांबावेच लागेल... म्हणून थोडाफार धोका पत्करूनही लोकांना गुलामगिरीचा प्रतिकार करण्यास सांगावे, असा मी निर्धार केला आहे.'

१४ जुलै, १९४२ ला काँग्रेस वर्किंग कमिटीने 'चले जाव'चा ठराव संमत केला. गांधीजी म्हणाले,

''आता तडजोडीला वाव नाही. ब्रिटिशांनी येथून चालते झालेच पाहिजे !''

गांधीजींनी अशा तऱ्हेने प्रक्षोभ निर्माण करून प्रत्येक भारतीयाच्या अंत:करणात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित केली आणि 'जनतेने स्वातंत्र्यासाठी अंतिम त्यागास तयार व्हावे', असे लोकांना आवाहन केले.

या आवाहनामुळे तरुण आणि वृद्ध, स्त्रिया आणि पुरुष, शहरातील आणि ग्रामीण भागातील नागरिक सर्वांच्या अंत:करणांत स्वतंत्र होण्यासाठी एक प्रचंड ऊर्मी उसळ्या मारू लागली.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात १९४२ चा ऑगस्ट महिना ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. मुंबई येथे ७ व ८ ऑगस्टला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात स्वातंत्र्यसंग्रामाचे रणशिंग फुंकले जाईल, असे सर्वांना खात्रीपूर्वक वाटत होते. हजारो काँग्रेस कार्यकर्ते आणि हजारो तरुण मुंबईला गवालिया टँक मैदानावर जमले होते. गांधीजी शांत आवाजात पण निर्धारपूर्वक या सर्वांना सांगत होते.


''या क्षणापासून तुमच्यापैकी प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपण स्वतंत्र झालो आहोत, असे समजले पाहिजे आणि स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून वागले पाहिजे ... आपण भारताला स्वतंत्र तरी करू किंवा हे भगीरथ प्रयत्न करत असताना मरून तरी जाऊ,''

गांधीजी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार पटेल आदी नेत्यांच्या भाषणांमुळे स्वातंत्र्याकरिता कोणतेही अग्निदिव्य करण्याची लोकांच्या मनाची पूर्ण तयारी झाली.

८ ऑगस्ट, १९४२ ला ज्या क्षणी 'चले जाव'चा ठराव गगनभेदी टाळ्यांच्या गजरात संमत झाला, त्या उदात्त क्षणी ''आपण जिवंत आहोत, याची अनेकांना धन्यता वाटली आणि तरुणांची मने अपूर्व आनंदाने मोहरून गेली,''

९ ऑगस्ट, १९४२ ला पहाटे महात्मा गांधी आणि काँग्रेस कमिटीचे सदस्य यांना सरकारने अटक केली आणि भारत संरक्षण कायद्याखाली त्यांना स्थानबद्ध केले. गांधीजींना पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध करण्यात आले. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्यांना अहमदनगर येथील किल्ल्यात स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. अटक होण्यापूर्वी काही काळ आधी गांधीजींनी जनतेसाठी आपला संदेश लिहून ठेवला होता :

'स्वातंत्र्यसंपादनासाठी सार्वत्रिक संप, सरकार बंद पाडणे अशा कोणत्याही अहिंसक मार्गाने टोकापर्यंत जाण्यास प्रत्येकाला मुभा आहे. स्वातंत्र्याखातर लोक मृत्यूलाही निर्भयपणे सामोरे जातील त्याच वेळी भारताचे अस्तित्व टिकू शकेल ... करेंगे या मरेंगे !'



क्रांतिपर्वाच्या प्रवेशद्वारापाशी – काँग्रेस अधिवेशन, गवालिया टँक, ऑगस्ट, १९४२ : एक दृश्य

गांधीजी, पंडित नेहरू आदी नेत्यांच्या अटकेची बातमी देशभर वणव्यासारखी पसरली. लोकांची प्रतिक्रिया अतिशय तीव्र होती. लोकांनी जागोजाग मिरवणुका काढल्या, तेव्हा पोलिसांनी लाठीमार केला, अश्रुधूर सोडला व गोळीबार केला. गोळीबारात देशभर अनेक कार्यकर्ते ठार झाले, परंतु लोक दबले नाहीत.

९ ऑगस्टला सरकारने देशभर अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांची धरपकड केली; परंतु त्याच वेळी बहुतेक सर्व समाजवादी नेते व कार्यकर्ते आणि काँग्रेसमधील अनेक नेते व कार्यकर्ते पोलिसांना हुलकावणी देऊन भूमिगत झाले.


'चले जाव' चळवळीच्या पहिल्या पर्वात देशभर उत्स्फूर्त उठाव झाला. अनेक ठिकाणी लोकांनी सरकारी कचेऱ्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी प्रचंड जमावांनी तुरुंग, पोलीस ठाणी, रेल्वे स्टेशने व अन्य ठिकाणांवर हल्ले केले. पोलिसांनी गोळीबार केला आणि काही ठिकाणी सैन्य आणून लोकांवर अनन्वित अत्याचार केले. शाळेत जाणारे विद्यार्थीही या निष्ठूर अत्याचारातून सुटले नाहीत. महाराष्ट्रात धुळे जिल्ह्यातील नंदुरबार येथे शाळेतल्या विद्यार्थ्यांनी तिरंगी झेंडा घेऊन मिरवणूक काढली. पोलिसांनी दिलेल्या धमकावणीला न जुमानता मुलांनी ध्वज उंच धरला आणि 'वंदे मातरम्'ची गगनभेदी घोषणा केली. तेव्हा पोलीस अधिकाऱ्याने चिडून जाऊन त्या छोट्या छोट्या मुलांवरही गोळीबार केला. शिरीषकुमार आणि इतर चार विद्यार्थी गोळ्या लागून ठार झाले. कराचीमध्ये हेमू कलानी या तरुण विद्यार्थ्यालाही पोलिसांनी असेच गोळ्या घालून ठार केले.

सरकारने चळवळ चिरडून टाकण्यासाठी कितीही अत्याचार केले, तरी लोकांना दहशत मात्र बसली नाही. योजनाबद्ध कार्यक्रम आखून सरकारचा प्रतिकार करायचा, असे ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे जागोजागी सरकारी कचेऱ्यांवर संघटित मोर्चे नेले.


महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यात महाड येथे नाना पुरोहित व त्यांचे सहकारी यांनी एक प्रचंड मोर्चा काढला. या निदर्शनात पुणे शहरातील कॉलेज विद्यार्थी आघाडीवर होते. मोर्च्यावर पोलिसांनी केलेल्या बेछूट गोळीबारात वसंत दाते हा तरुण विद्यार्थी आणि अन्य तिघेजण जागच्या जागी ठार झाले.

उत्तर भारतात बनारस हे विद्यार्थी-चळवळीचे मोठे केंद्र होते. हे विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेले होते. त्यांनी आपापल्या भागात जाऊन सरकारविरोधी संघटित मोर्चे काढले. या विद्यार्थ्यांचा एक गट उत्तर प्रदेशातील बालिया या जिल्ह्यात गेला. तेथील ग्रामीण जनता चळवळीत सामील झाली आणि त्यांनी त्या भागातील सरकार पूर्णपणे खिळखिळे करून टाकले.

देशात ठिकठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडणे, रूळ उखडणे, दळणवळणाचे मार्ग बंद पाडणे, सैन्यांच्या हालचाली बंद पाडणे असा उद्रेक होत होता.



अश्रुधूर




लाठीहल्ला


भूमिगत चळवळीच्या नेत्यांनी प्राणपणाने लढण्याचा निर्णय करून, लढ्याची वेगळ्या रीतीने उभारणी केली. भूमिगत चळवळ ही अचानक उभी राहिली नाही. यासंबंधी काही नेते व कार्यकर्ते यांच्या मनात पूर्वीपासून स्पष्ट कल्पना होती. जयप्रकाश नारायण हे १९४० साली राजस्थानमधील देवळी तुरुंगात स्थानबद्ध होते. त्या वेळी त्यांनी बाहेरच्या कार्यकर्त्यांना भूमिगत चळवळीची तयारी कशी करावी, यासंबंधीचे पत्रक पाठवण्याचा प्रयत्न केला; परंतु पोलिसांनी जयप्रकाशजींच्या पत्नीच्या सामानाची झडती घेऊन ते परिपत्रक पकडले. या पत्रकात जयप्रकाशजींनी देशव्यापी जनआंदोलनाच्या जोडीला भूमिगत चळवळ कशी उभारली पाहिजे, याचा आराखडा दिला होता.

'चले जाव' चळवळ सुरू झाली, त्या वेळी जयप्रकाश हे बिहारमधील हजारीबाग तुरुंगात होते. तेथून ते व त्यांचे अन्य काही सहकारी यांनी विलक्षण साहस करून तुरुंगाच्या भिंतीवरून बाहेर उड्या टाकल्या आणि लपतछपत मिळेल तो आसरा घेत, सहा क्रांतिकारक त्यांच्यापैकी शाळीग्राम या कार्यकर्त्याच्या गावी जाऊन पोहोचले. तुरुंगातून बाहेर आल्यावर भूमिगत चळवळीच्या नेत्यांना जयप्रकाश नारायण भेटले आणि भूमिगत कार्यात सुसूत्रता आणण्यास त्यांनी सुरुवात केली. जयप्रकाश नारायण यांनी सर्व स्वातंत्र्यसैनिकांना उद्देशून एक पत्रक काढले. ते देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पोहोचवण्यात आले. गनिमी पद्धतीने घातपाती मार्गच वापरावे, असे जयप्रकाश नारायण यांनी त्या पत्रकात लिहिले होते. ब्रिटिश सरकारची राजवट खिळखिळी करण्यासाठी क्रांतिकारक कार्यकर्त्यांचे 'आझाद दस्ते' उभारण्याचा आदेश त्यांनी दिला. या कार्यकर्त्यांना दळणवळण साधनांचा विध्वंस कसा करावा, डायनामाईट कसे वापरावे, स्फोट कसे घडवून आणावे इत्यादी सूचना देण्यात आल्या होत्या. देशभर ठिकठिकाणी विध्वंसक पथकांवर घातपाताची जबाबदारी टाकण्यात आली. शस्त्रे जमवणे, बाँब तयार करणे ही कामे या पथकांनी अंगावर घेतली. प्रचार-मोहिमेचे प्रमुख डॉक्टर राममनोहर लोहिया होते. त्यांच्या प्रेरणेने मुंबईच्या कार्यकर्त्यांनी गुप्त रेडिओ केंद्र सुरू केले. या केंद्रातून अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया यांची भाषणे ध्वनिक्षेपित करण्यात येत. याशिवाय 'चले जाव' आंदोलनाच्या सर्व बातम्या दिल्या जात. अल्पावधीतच हा 'काँग्रेस रेडिओ' हजारो लोक ऐकू लागले. ब्रिटिशविरोधी प्रचाराच्या या आघाडीमुळे सरकार खवळून गेले. या रेडिओवरून स्वातंत्र्यगीते घराघरापर्यंत पोहोचली.

अखेर १३ नोव्हेंबरला पोलिसांनी हे केंद्र हुडकून काढले आणि केंद्र चालवणाऱ्या विठ्ठल जव्हेरी, उषा मेहता आदी कार्यकर्त्यांना अटक केली.

जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया यांनी बिहार प्रांत हे भूमिगत चळवळीचे प्रमुख केंद्र केले. भागलपूर, गया, पूर्णिया आणि मुझफ्फरपूर या जिल्ह्यांमध्ये त्यांनी भूमिगत चळवळ उभारली.





ऑगस्ट क्रांती, १९४२ : धरपकड

बिहारच्या या जिल्ह्यांमध्ये सरकारला जबरदस्त हादरा बसला. काही भागांत तर दोन महिन्यांहून अधिक काळ सरकार निष्प्रभ होऊन गेले.

उत्तर प्रदेशात भूमिगत चळवळीचे जाळे विद्यार्थ्यांमुळे पसरले. सरकारने तेथे सैन्यसर आणले. मोठ्या प्रमाणावर दडपशाही केली. अनेक तरुणांना ठार मारले.

गुजरातमध्ये छोटूभाई पुराणी व त्यांचे सहकारी यांनी भूमिगत चळवळ खेड्याखेड्यांमध्ये नेली.

बंगालमध्ये मिदनापूर जिल्ह्यांत क्रांतिकारकांनी प्रतिसरकार स्थापन केले. कोमिल्ला, कौन्तायी व तामलुक विभागांत सरकारी कामकाज बंद पाडण्यात आले.

महाराष्ट्रातील समाजवादी नेते अच्युतराव पटवर्धन आणि दिल्लीच्या अरुणा असफअली यांनी अखिल भारतीय पातळीवर भूमिगत चळवळीत सुसूत्रता आणण्यासाठी फार मोठे कार्य केले.

महाराष्ट्रात एस.एम.जोशी, शिरूभाऊ लिमये, ना.ग.गोरे, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आदी नेत्यांच्या नेतृत्वाखाली भूमिगत चळवळीत अनेक तरुणांनी भाग घेऊन सरकारला जर्जर केले.

कुलाबा जिल्ह्यात भाई कोतवाल यांनी आदिवासींच्या मदतीने प्रतिसरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला. ३१ डिसेंबर, १९४२ ला सशस्त्र पोलीस दलांनी भाई कोतवाल व त्यांचे सहकारी यांच्या सिद्धगड येथील केंद्रास वेढा घातला. त्या वेळी भाई कोतवाल यांनी गोळीबाराला गोळीबारानेच उत्तर दिले आणि वीरमरण पत्करले.

भूमिगत चळवळीचे महाराष्ट्रातील सर्वांत देदीप्यमान शिखर सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार हे होते. हे प्रतिसरकार एकदम निर्माण झाले नाही. ९ ऑगस्ट, १९४२ ला गांधीजी व अन्य नेते यांना पकडल्यानंतर सातारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये एका आठवड्यात १५१ जाहीर सभा झाल्या. या सभांमधून 'चले जाव' ठरावाचा अर्थ लोकांना समजावून सांगण्यात आला. नंतर सर्व महत्त्वाच्या गावांमधून शांततापूर्ण मिरवणुका काढण्यात आल्या. लोकांनी तहसील कचेऱ्यांवर प्रचंड मोर्चे नेले. या वेळी सरकारने निर्दयपणे गोळीबार करून अनेक स्वातंत्र्यसैनिकांना ठार केले. त्यानंतर सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील भूमिगत कार्यकर्त्यांनी गुप्त बैठक घेऊन विध्वंसाचा एक कार्यक्रम आखला व तो परिणामकारकपणे पार पाडला.

ही भूमिगत चळवळ वेगाने पसरत गेली.

९ ऑगस्ट, १९४३ ला सातारा, सांगली, कोल्हापूर या भागांतील भूमिगत कार्यकर्त्यांनी टेलिग्राफचे दोन हजार खांब पाडून चले जाव चळवळीचा वर्धापनदिन साजरा केला. नाना पाटील हे भूमिगत चळवळीचे प्रमुख नेते होते. पांडू मास्तर, बर्डे गुरुजी व किसन वीर हे चळवळीचे सूत्रधार होते. जी. डी. ऊर्फ बापू लाड, गौरीहर सिंहासने, बाबूराव चरणकर,

नागनाथ नायकवडी, रत्नाप्पा कुंभार आदी कार्यकर्ते वेगवेगळ्या गटांचे सेनानी होते.

भूमिगत चळवळीला शस्त्रांसाठी पैशाची नड होती. खानदेशातील धुळ्याजवळचे तरुण कार्यकर्ते उत्तमराव पाटील व त्यांच्या पत्नी लीलाताई पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी धाडसाने सरकारी खजिना लुटला. या लुटीतील पैसे भूमिगत चळवळ चालवण्यासाठी मिळाले.

सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात या भूमिगत चळवळीची पकड इतकी भक्कम झाली, की नंतर भूमिगत कार्यकर्त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले. या प्रतिसरकारमधील नेत्यांनी ब्रिटिशविरोधी चळवळ चालवताना गरिबांना लुटणाऱ्या सावकारांना व गुन्हेगारांना दहशत बसवली. सातारा, सांगली आणि कोल्हापूर भागांत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण प्रसाराचे भरीव कार्य केले होते. त्यांच्या रयत शिक्षण संस्थेतर्फे चालवल्या जाणाऱ्या शाळांतील अनेक शिक्षक व विद्यार्थी यांनी सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारला बहुमोल सहकार्य केले. या प्रतिसरकारने लोकन्यायालये स्थापन केली. संस्कारक्षम वयाच्या मुलांच्या मनावर राष्ट्रभक्तीचा संस्कार करण्याकरता राष्ट्र सेवा दल, आझाद सेना, तुफान सेना अशा संघटना उभारल्या.

सातारा जिल्ह्यातील हे प्रतिसरकार १९४६ पर्यंत टिकून राहिले. या सरकारला जनतेचा किती प्रचंड पाठिंबा होता, याचे एकच उदाहरण म्हणजे – या सरकारने चालवलेल्या लोकन्यायालयाचे निवाडे लोकांनी स्वीकारले.

देशाच्या वेगवेगळ्या भागांत भूमिगतांची केंद्रे ही निर्भयपणे चालवली जात होती. ब्रिटिश साम्राज्याविरोधी प्रतिकाराची ज्योत विझू द्यायची नाही, हा निर्धार करून अनेक कार्यकर्त्यांनी ही चळवळ चालवली; परंतु काही दिवसांनी त्यांचे प्रमुख नेते पकडले गेले. जयप्रकाश नारायण यांना १९४३ च्या सप्टेंबर महिन्यात अटक करण्यात आली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांतील भूमिगत नेत्यांची केंद्रे हुडकून काढून सरकारने त्यांना पकडले.

फेब्रुवारी, १९४३ मध्ये व्हाइसरॉयनी 'देशातील अशांततेबाबतची काँग्रेसची जबाबदारी' ही ८६ पानांची पुस्तिका प्रसिद्ध केली. गांधीजींनी व्हाइसरॉय यांच्याशी पत्रव्यवहार करून आपली भूमिका सडेतोडपणे मांडली आणि काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्यांना भेटण्याची परवानगी सरकारकडे मागितली. सरकारने ती विनंती फेटाळून लावल्यावर गांधीजींनी १० फेब्रुवारी, १९४३ पासून तुरुंगात उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती ढासळली, तेव्हा देशभर प्रक्षोभ निर्माण झाला.

अखेर २१ दिवसांनंतर गांधीजींनी आपले उपोषण सोडले. स्थानबद्धतेतून मुक्त झाल्यावर गांधीजींनी ४ जुलै, १९४४ ला लंडनच्या वृत्तपत्रातून मुलाखत देऊन 'दुसरे महायुद्ध संपल्यानंतर लगेचच भारतीयांकडे संपूर्ण राज्यसत्ता सोपवली जाईल, असे इंग्लंडने जाहीर करावे', अशी मागणी केली.

१५ जून, १९४५ ला काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सर्व सदस्यांची मुक्तता झाली. सुटकेनंतर पंडित नेहरू जाहीरपणे म्हणाले,

"१९४२ च्या चळवळीत जे काही घडले असेल, त्याची सर्व जबाबदारी स्वीकारण्यास मी तयार आहे. कारण ज्या परिस्थितीत हे घडले, ती परिस्थिती निर्माण करण्यास मी खासच जबाबदार होतो."

नेत्यांच्या अटकेनंतर जनतेने निर्भयपणे जो स्वातंत्र्यलढा दिला, त्याबद्दल पंडित नेहरूंनी लोकांना मन:पूर्वक धन्यवाद दिले. 'चले जाव' चळवळीबद्दल आकडेवारी देताना डॉ. राममनोहर लोहिया यांनी असे सांगितले, की तीन लाखांहून अधिक लोक पकडले गेले आणि गोळीबारात जवळजवळ १० हजार लोक मारले गेले.


१९४२ ची 'चले जाव' चळवळ हे देशव्यापी जनआंदोलन कसे होते, याबाबतची कबुली त्या वेळचे गृहमंत्री मॅक्सवेल यांनी दिलेली आहे. आपल्या गोपनीय अहवालात मॅक्सवेल यांनी '१८५७ च्या राष्ट्रीय उठावाशी चले जाव चळवळीचे साम्य आहे', असे मत व्यक्त केले.

स्वातंत्र्यलढ्याच्या या अखेरच्या पर्वात भारतीय वृत्तपत्रांनी फार मोलाची कामगिरी केली.

१९४२ च्या चळवळीनंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांना हे कळून चुकले, की काही काळ चळवळ चिरडली गेली, तरी बंदुका, तोफा व अन्य आधुनिक शस्त्रे यांच्या जोरावर भारतीय जनतेला गुलामीत डांबून ठेवणे यापुढे शक्य होणार नाही.

'चले जाव' चळवळीमुळे ब्रिटिश राजवटीचा अंत झपाट्याने जवळ आला.

या चळवळीत स्वातंत्र्यसैनिकांनी केलेले बलिदान आणि ब्रिटिशांच्या सर्व प्रकारच्या अत्याचारी जुलमांविरुद्ध भूमिगत चळवळ चालवून नेत्यांनी दिलेली चिवट झुंज, यांमधून भारताच्या राष्ट्रीय शीलाचे भव्य आणि उदात्त दर्शन घडले. या चळवळीने निर्माण केलेल्या स्वातंत्र्याच्या दुर्दम्य आकांक्षेतून पारतंत्र्याच्या शृंखलांवर भारतीय जनतेने घणाघाती हल्ला केला.



''चलो दिल्ली'' — नेताजी सुभाषचंद्र बोस

# ११. चलो दिल्ली !

'चले जाव'ची चळवळ ज्या कालखंडात चालू होती, त्याच कालखंडात स्वातंत्र्यसंपादनासाठी सुभाषचंद्र बोस यांनी एक अभूतपूर्व प्रयत्न केला.

सप्टेंबर, १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू होताच ब्रिटिशांनी भारतातील सर्व जहाल राजकीय पुढाऱ्यांना तुरुंगात डांबण्याचे ठरवले. बाबू सुभाषचंद्र बोस हे जहालांचे अग्रणी असल्यामुळे त्यांना मुक्त ठेवणे ब्रिटिश सरकारला धोकादायक वाटत असे; म्हणून एका निदर्शनाचे निमित्त साधून सरकारने सुभाषबाबूंना अटक करून स्थानबद्ध केले. स्थानबद्धतेत असताना सुभाषबाबूंनी १६ नोव्हेंबर, १९४० रोजी बंगालच्या गव्हर्नरला एक पत्र पाठवून आपला आमरण उपोषण करण्याचा निर्णय कळवला. 'माझी अटक बेकायदेशीर असल्यामुळे सरकारने माझी मुक्तता करावी अन्यथा मी जीवनाचा शेवट करीन,' असे सुभाषबाबूंनी पत्रात सरकारला लिहिले होते. या पत्रानंतर सरकारने त्यांना तुरुंगातून मुक्त केले. परंतु कोलकत्यातील त्यांच्या निवासस्थानी त्यांना स्थानबद्ध करून घराभोवती सशस्त्र शिपायांचा कडेकोट पहारा बसवला. स्थानबद्धतेत असताना सुभाषबाबू आपल्या कुटुंबीयांना भेटत नसत. सरकारने भरलेल्या खटल्याच्या संदर्भात सुभाषबाबूंचे वकील त्यांना २६ जानेवारीला भेटण्यासाठी गेले. दार खडखडूनही आतून काही प्रतिसाद आला नाही, म्हणून त्यांनी दार उघडून पाहिले, तर आत कोणीच नव्हते. अंतर्धान पावल्यासारखे सुभाषबाबू कोठे व कसे नाहीसे झाले, हे कोणाला समजेना. देशभरच्या वर्तमानपत्रांत ज्या वेळी ही बातमी दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध झाली, त्या वेळी लोकांत प्रचंड खळबळ उडाली. गांधीजी आणि टागोर यांनी सुभाषबाबूंबद्दल मोठी चिंता व्यक्त केली. सुभाषबाबूंना पकडण्यासाठी सरकारने कोलकत्याची सर्व बाजूंनी नाकेबंदी केली.

खरे तर सुभाषबाबूंनी कोलकता केव्हाच सोडले होते. १५ जानेवारीला लुंगी नेसून

सुभाषबाबू घराबाहेर पडले. त्यांनी दाढी वाढवली होती. चश्मा काढून ठेवला होता. त्यामुळे लुंगी नेसलेला कोणीतरी मुसलमान इसम घरातून बाहेर पडला, असे पोलिसांना वाटले. सुभाषबाबू घरातून बाहेर पडले. त्यांचे बंधू शरच्चंद्र बोस यांच्याकडे ते गेले आणि १७ जानेवारीला मध्यरात्रीनंतर आपले पुतणे शिशिर बोस यांच्या मोटारीतून त्यांनी कोलकता शहर सोडले. एका आडबाजूच्या स्टेशनावर ते कोलकत्याहून जाणाऱ्या आगगाडीत चढले आणि १९ तारखेस संध्याकाळी ते पेशावरला पोहोचले. तेथून ते अतिशय कष्टप्रद प्रवास करून भारताची सरहद्द ओलांडून अफगाणिस्तानमध्ये गेले आणि ३१ जानेवारीला काबूलला जाऊन पोहोचले. काबूलला काही दिवस सराईमध्ये काढल्यावर लाला उत्तमचंद या एका भारतीय व्यापाऱ्याकडे ते राहिले. सुभाषचंद्र बोस यांना रशियाला जाण्याची तीव्र इच्छा होती; परंतु काबूलमधील रशियन दूतावासाशी संपर्क साधण्याचे त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. मात्र इटलीच्या राजदूतांनी त्यांना सर्व तऱ्हेची मदत केली आणि सुभाषबाबूंनी जर्मनीकडे प्रयाण केले.

१९४१ च्या एप्रिल महिन्यात सुभाषचंद्र बोस बर्लिनला जाऊन पोहोचले. बर्लिनला सुभाषबाबूंनी 'फ्री इंडिया सेंटर' स्थापन केले आणि आझाद हिंद रेडिओवरून भारतीयांना उद्देशून स्फूर्तिदायक भाषणे करण्यास सुरवात केली. सुभाषबाबूंच्या भोवती जर्मनीतील भारतीय तरुण गोळा झाले आणि त्यांनी 'फ्री इंडिया सेंटर' व 'आझाद हिंद रेडिओ' चे काम अतिशय तडफेने केले. आझाद हिंद रेडिओद्वारे भारतीयांना स्वातंत्र्यलढा तीव्र करण्याचे आवाहन सुभाषबाबूंनी केले. हे सर्व करताना सुभाषबाबूंनी जर्मनीची मदत घेतली, तरी त्यांनी आपली प्रखर राष्ट्रवादी भूमिका कधीही सोडली नाही. जर्मनीमध्ये हिटलरकडून सुभाषबाबूंना फारसा पाठिंबा मिळाला नाही.

१९४१ च्या डिसेंबर महिन्यात जर्मनी व इटलीच्या बाजूने जपान महायुद्धात उतरला. जगाच्या पूर्व विभागात महायुद्धाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. सिंगापूरचा पाडाव झाल्यानंतर ब्रिटिश सेना जेव्हा झपाट्याने माघार घेऊ लागली, त्या वेळी भारतीय सैनिकांपैकी काही जणांनी बदलत्या परिस्थितीत भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करायचे ठरवले. कॅप्टन मोहनसिंग या ब्रिटिश सेनेच्या अधिकाऱ्याने ११ डिसेंबर, १९४१ ला जपान्यांनी पंजाब रेजिमेंटवर हल्ला केल्यावर रेजिमेंट सोडून जाण्याचे ठरवले. त्यांनी नंतर जपानी सेनेतील अधिकाऱ्यांची भेट घेऊन जपानने युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतलेल्या दहा हजार भारतीय सैनिकांमधून भारताच्या मुक्ततेसाठी सेना उभारण्याची कल्पना मांडली. या कल्पनेस मेजर जनरल जगन्नाथराव भोसले व अन्य अधिकाऱ्यांचा पाठिंबा होता. भारतीय सैनिकांची ही 'आझाद हिंद सेना' उभारून तिचे नेतृत्व करण्यासाठी जर्मनीमधून सुभाषचंद्र बोस यांना पाचारण करायचे, असा निर्णन कॅप्टन मोहनसिंग, मेजर जनरल जगन्नाथराव भोसले आदी अधिकाऱ्यांनी ज्येष्ठ क्रांतिकारक रासबिहारी बोस यांच्या सल्ल्याने घेतला. त्यांचा निरोप

मिळताच सुभाषबाबूंनी 'आंझाद हिंद सेने'चे नेतृत्व करण्यासाठी ताबडतोब बँकॉकला जाण्याचे ठरवले. विमानाने अगर बोटीने प्रवास करणे युद्धकाळात अशक्य असल्यामुळे पाणबुडीतून हा प्रवास करण्याचा निर्णय सुभाषबाबूंनी घेतला. ८ फेब्रुवारी, १९४३ ला जर्मन 'यू' बोटीतून ते बँकॉककडे निघाले. जिवावरच्या अनेक प्रसंगांतून पार पडत अखेर ६ मे, १९४३ ला सुभाषबाबू आणि त्यांच्याबरोबर असलेले त्यांचे एक निष्ठावान अनुयायी अबीद हसन जपानमध्ये पोहोचले. २५ ऑगस्ट, १९४३ ला सुभाषबाबूंनी आझाद हिंद फौज निर्माण झाल्याचे जाहीर केले आणि २१ ऑक्टोबर, १९४३ ला भारताचे हंगामी सरकार स्थापन केले आणि आपल्या सहकाऱ्यांना 'चलो दिल्ली'चा स्फूर्तिदायी आदेश दिला.

सुभाषबाबूंच्या स्फूर्तिदायक नेतृत्वामुळे भारतीय सेनेतील अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना एक नवीच प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्यासाठी बलिदान करण्यास ते सज्ज झाले.

आझाद हिंद सेनेचा एक भाग म्हणून सुभाषबाबूंनी डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली 'राणी ऑफ झाशी रेजिमेंट' ही महिलांची पलटण उभी केली.


भारताचा भाग असलेला अंदमान व निकोबार हा प्रदेश जपानने व्यापला होता. जपानबरोबर यशस्वी वाटाघाटी करून सुभाषबाबूंनी ही बेटे ताब्यात घेतली. अंदमानला 'शहीद बेटे' व निकोबार बेटांना 'स्वराज्य बेटे' अशी नावेही दिली.

जपानी सेनेने भारताच्या पूर्व सीमेवरील इंफाळ या प्रमुख शहरावर हल्ला करण्याचे ठरवले. इंफाळच्या लढाईत आझाद हिंद सेनेस सहभागी करून घेण्यात आले. आझाद हिंद सेनेने ज्या वेळी भारताच्या भूमीत पहिले पाऊल टाकले, त्या वेळी भारतीय सैनिकांनी भक्तिभावाने मातृभूमीला नमस्कार केला. इंफाळपासून ४५ किलोमीटर अंतरावरील मोईरांग या ठिकाणी सुभाषबाबूंनी २१ एप्रिल, १९४४ ला आझाद हिंद सेनेची सलामी घेतली.


आझाद हिंद सेनेने स्वातंत्र्यासाठी केलेल्या लढाईत मार्च, १९४४ ते मे, १९४४ या तीन महिन्यांत किमान चार हजार सैनिकांनी रणांगणावर वीरमरण पत्करले. ब्रिटिशांचा महायुद्धात जय झाला आणि सुभाषबाबूंचा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही. मात्र भारतीय सैनिकांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड करून स्वातंत्र्यासाठी लढाई करण्याचे जे अद्वितीय पाऊल टाकले, त्यामुळे ब्रिटिश साम्राज्याचा पायाच खचून गेला.

आझाद हिंद फौजेने माघार घेतल्यावर १९४५ च्या एप्रिल अखेरीला सुभाषबाबूंनी रंगून सोडले. ते १३ ऑगस्टला सिंगापूर येथे पोहोचले. १८ ऑगस्ट, १९४५ ला एका विमान अपघातात त्यांना मृत्यू आला, असे नंतर जाहीर झाले. सुभाषबाबूंच्या जीवनाची अखेर अत्यंत गूढ रीतीने झाली. स्वातंत्र्ययुद्धातील सर्वश्रेष्ठ क्रांतिकारक नेते म्हणून सुभाषबाबूंचे स्थान भारतीय जनतेच्या अंत:करणात ध्रुवताऱ्यासारखे अढळ राहिले आहे.

१९४६ च्या एप्रिलमध्ये आझाद हिंद फौजेच्या काही अधिकाऱ्यांवर ज्या वेळी ब्रिटिश



नाविकांचे बंड, १९४६, मुंबई



R.I.A.F. Men's Sympathy With Mutineers

ABOUT 1,000 MEN of the R.I.A.F. camped at Marine Drive, Bombay, and Andheri, struck work on Thursday in sympathy with the mutineers of the R.I.N. The picture shows R.I.A.F. units marching in procession through the streets of Bombay on Thursday afternoon.

हवाई दलाचा पाठिंबा

सरकारने खटले भरले, त्या वेळी काँग्रेसने ब्रिटिश सरकारचे हे आव्हान स्वीकारून आझाद हिंद फौजेच्या सैनिकांची बाजू जगापुढे मांडण्याचे ठरवले. लष्करी कोर्टाकडून चाललेल्या खटल्यात शहानवाज, सहगल आणि धिल्लाँ या तीन अधिकाऱ्यांवरील खटला फार गाजला. त्यांची बाजू मांडताना सुप्रसिद्ध कायदेपंडित भुलाभाई देसाई यांनी पुढीलप्रमाणे युक्तिवाद केला.

''सुभाषचंद्र बोस यांनी स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन केले आणि त्यांची अधिकृत सेना म्हणूनच इंडियन नॅशनल आर्मी – आझाद हिंद सेना लढली. स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच्या या अधिकाऱ्यांना कोणतीही शिक्षा करता येणार नाही.''

लष्करी कोर्टाने जरी या अधिकाऱ्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा दिल्या, तरी स्वातंत्र्यसेनानी म्हणून त्यांचा देशभर जयजयकारच झाला. सुभाषबाबूंनी केलेल्या 'जय हिंद' या घोषणेने देश दुमदुमून गेला.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्फूर्तिदायी नेतृत्वाखाली आझाद हिंद सैनिकांनी केलेल्या त्यागाचा परिणाम ब्रिटिशांच्या हुकमतीखालील भारतीय सेनादलांवर झाल्याशिवाय राहिला नाही. भारताचे सेनादल, नौदल आणि विमानदल यांतील अधिकारी व सैनिक यांना ब्रिटिशांच्या ताबेदारीखाली राहण्यापेक्षा बंड करून स्वातंत्र्यलढ्यात सामील व्हावे, असे वाटू लागले. भारतीय अधिकारी व सैनिक आणि ब्रिटिश अधिकारी यांच्यामधील कलह वाढत चालला. नौदलामध्ये हा कलह विशेषच तीव्र झाला.

अखेर १९४६ च्या फेब्रुवारीस या धुमसणाऱ्या असंतोषाचा स्फोट झाला. नौदलातील सैनिकांनी १८ फेब्रुवारी, १९४६ ला मुंबईमध्ये बंड पुकारले. पांढरा शुभ्र पोशाख घातलेले नौसैनिक मुंबईच्या रस्त्यारस्त्यांतून बंडाचा पुकारा करत, घोषणा देत चाललेले पाहून मुंबईच्या नागरिकांची मने देशप्रेमाने उफाळून आली व हजारो लोक नाविकांच्या या बंडात सामील झाले. बंड चिरडून टाकण्यासाठी सरकारने सैन्य बोलावले; परंतु लोक मुळीच दबले नाहीत.

अखेर सरदार पटेल यांनी या प्रकरणी हस्तक्षेप केला आणि २२ फेब्रुवारी, १९४६ ला हे नाविकांचे बंड शांत झाले.

या बंडामुळे सैनिक व नागरिक यांची एकजूट झाल्यास आपला येथे निभाव लागणार नाही, हे ब्रिटिश सरकारने ओळखले आणि १९ मार्च, १९४६ ला ब्रिटनचे पंतप्रधान ॲटली यांनी भारताच्या नेत्यांबरोबर चर्चा करण्यासाठी ब्रिटिश मंत्रिमंडळाचे शिष्टमंडळ ताबडतोब पाठवले जाईल, असे जाहीर केले.

१९४२ चा 'चले जाव' लढा, सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना आणि नाविक बंड हे वेगवेगळ्या वेळी घडले, तरी या सर्वांचा एकत्रित परिणाम ब्रिटिश साम्राज्यावर निश्चितच झाला. भारतीय नागरिकांनी स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा आणि भारतीय सैनिकांनी स्वातंत्र्यासाठी केलेले बंड या दोहोंमुळे भारताचे स्वातंत्र्य अगदी दृष्टिपथात आले.

# १२. जय हिंद !

भारताला स्वातंत्र्य देणे आता अटळ आहे, हे ब्रिटिश सरकारने ओळखले होते. महायुद्ध संपल्यावर इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचे सरकार सत्तेवर आले. ते भारतीयांच्या मागण्यांविषयी सहानुभूती बाळगणारे होते. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी आपल्या मंत्रिमंडळातील तीन मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ भारतात पाठवले. त्रिसदस्य शिष्टमंडळ येथे आल्यानंतर वाटाघाटी सुरू झाल्या, पण दुर्दैवाने भारतातील फुटीर प्रवृत्ती उफाळून आल्या. ज्या वेळी ब्रिटिशांच्या विरुद्ध भारतीयांनी लढा दिला आणि असीम त्याग केला, त्या वेळी देशात ऐक्याची भावना निर्माण झाली होती. स्वातंत्र्यासाठी बलिदान करताना आझाद हिंद सेनेतील सैनिक आणि नाविक बंडातील नाविक धर्म, जात, प्रांत, भाषा आदी भेद विसरून गेले होते. स्वातंत्र्यासाठी सर्वांचे रक्त एकत्रित सांडले होते; परंतु सत्ता समोर दिसू लागताच इतर काही हितसंबंधीयांच्या मनांतील स्वार्थ जागा झाला. ब्रिटिशांनी फोडा आणि झोडा या दुष्ट राजनीतीचा अवलंब करून हिंदू-मुसलमान यांच्यांत जी फूट पाडली होती, ती या वेळी शिगेला पोहोचली. मुस्लिम लीगचे नेते बॅ. जीना यांनी ''मुसलमानांना बहुसंख्य हिंदू असलेल्या राज्यात न्याय मिळणार नाही'', असे म्हणून पाकिस्तान या स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची मागणी केली. बॅ. जीना आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रचारामुळे मुस्लिम समाजात हिंदूबद्दलची अविश्वासाची भावना वाढीस लागली होती. देशभर हिंदू-मुसलमान दंग्यांचा आगडोंब उसळला. पूर्व बंगालमधील नोआखाली जिल्ह्यात फार मोठ्या कत्तली झाल्या. त्या वेळी महात्मा गांधींनी तेथे जाऊन एकाकीपणे शांतता प्रस्थापनेचे प्रयत्न केले. सर्वांना मान्य होईल, अशी तडजोड निघणे अशक्य झाले. अखेर काँग्रेसच्या नेत्यांनी नाइलाजाने देशाच्या फाळणीस मान्यता दिली.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे लोण वेगवेगळ्या संस्थानांमध्ये केव्हाच जाऊन पोहोचले होते. १९२७ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय संस्थांनी प्रजापरिषदेला देशभरातून सातशे प्रतिनिधी जमले होते. संस्थानांमध्ये लोकशाही राज्यव्यवस्था असावी, ही या परिषदेची प्रमुख मागणी होती. देशातल्या अनेक संस्थानांतून प्रजेच्या मागण्या पुढे रेटण्यासाठी प्रजापरिषदांची स्थापना झाली. संस्थानिकांच्या ब्रिटिशधार्जिण्या धोरणाला या परिषदांचा तीव्र विरोध होता. राजकोट, कोल्हापूर, काश्मीर, हैदराबाद इत्यादी अनेक संस्थानांतून प्रजेचा लढा जास्त प्रखर झाला होता. संस्थानी प्रजा जागृत झाली होती.

भारतातील संस्थानिकांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यास सतत विरोध केला होता. स्वातंत्र्यसंपादनाच्या वेळी त्यांच्यातील स्वार्थी प्रवृत्ती उफाळून आल्या आणि संस्थानिकांना वेगळे अस्तित्व असावे, अशी मागणी पुढे आली; परंतु पंडित नेहरू व सरदार पटेल यांनी खंबीर भूमिका घेतल्यामुळे संस्थानिकांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य झाले नाही आणि पुढे सरदार पटेल यांच्या कुशल राजनीतीमुळे सर्व संस्थाने भारतात विलीन करून घेण्यात आली. हैदराबादमध्ये मात्र पोलीस कारवाई करावी लागली. हैदराबादमधील जनतेने स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांची सफलता भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झाली. ★

काश्मीर हे भारताच्या सरहद्दीवर हिमालयाच्या कुशीत असलेले संस्थान. तेथील प्रजेचे नेते शेख अब्दुल्ला यांनी राजेशाहीविरुद्ध सतत लढा दिला. भारत स्वतंत्र होत असताना काश्मीरच्या नरेशांनी भारतात सामील होण्याऐवजी स्वतंत्र राहण्याचा डाव रचला. याचा फायदा घेऊन काश्मीर भारतापासून अलग पाडण्यासाठी टोळीवाल्यांना पुढे करून पाकिस्तानी सैन्याने काश्मीरवर आक्रमण केले. या वेळी भारताने तेथे लष्कर पाठवण्याचा निर्णय घेतला आणि प्रजेच्या दबावाखाली काश्मीर संस्थान भारतात विलीन झाले. भारतीय सेनेच्या अतुल पराक्रमामुळे पाकिस्तानचा डाव हुकला आणि काश्मीरचा तीन चतुर्थांशाहून अधिक भाग भारतात राहिला.

इंग्रजांची भारतावरील सत्ता नष्ट झाली, तरी फ्रेंच आणि पोर्तुगीज यांच्या भारतातील वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले नव्हते; परंतु फ्रेंच सरकारने समंजसपणाचे धोरण स्वीकारून पुढे आपल्या वसाहती भारताच्या ताब्यात दिल्या.

पोर्तुगिजांनी मात्र फ्रेंचांसारखा समजूतदारपणा दाखवला नाही. भारतात पोर्तुगिजांनी गोवा, दादरा-नगरहवेली, दीव आणि दमण हा प्रदेश व्यापलेला होता. गोव्यातील काही कार्यकर्त्यांनी

---

★ भारत स्वतंत्र झाल्यानंतरही हैदराबाद संस्थानचे स्वतंत्र अस्तित्व ठेवण्यासाठी निजामाने पाकिस्तानशी संबंध जोडून कारवाया केल्या, तसेच रझाकार संघटनेला हाताशी धरून प्रजेवर अनन्वित अत्याचार केले; परंतु तेथील जनतेने झुंजारपणे मुक्तिलढा चालूच ठेवला. अखेर १३ सप्टेंबर, १९४८ ला हैदराबादमध्ये भारतीय सेना शिरल्या आणि अवघ्या तीन दिवसांत सरंजामी निजामी राजवटीचा शेवट होऊन हैदराबादवर भारताचा राष्ट्रध्वज फडकला.

का नसेना, पण पुष्कळशा अंशाने आपण करत आहोत. मध्यरात्रीच्या प्रशांत समयी सारे जग झोपलेले असताना भारत स्वातंत्र्याच्या युगात नवा जन्म घेत आहे. पुन्हा एकदा नव्या भारताचा शोध हा देश घेत आहे. ही वेळ क्षुद्रपणा गाडून टाकण्याची आहे. विघातक टीकेला मूठमाती देण्याची आहे. आपल्याला स्वतंत्र भारताचा एक उत्तुंग असा प्रासाद उभारायचा आहे. दारिद्र्य, अन्याय, विषमता यांचा शेवट करायचा आहे. देशाची सेवा म्हणजे येथील गरीब जनतेची सेवा. या युगातील सर्वश्रेष्ठ माणसाचे, महात्मा गांधींचे स्वप्न आपल्याला भूतलावर आणायचे आहे. हरएक नेत्रातला अश्रू आपल्याला पुसून टाकायचा आहे. ही गोष्ट आपल्या शक्तीबाहेरची आहे, असे आपल्याला वाटेल; पण जोवर जगात यातना आणि अश्रू आहेत, तोवर आपले सेवेचे काम चालू असलेच पाहिजे....."

❁ ❁ ❁



नव्या युगाची वाटचाल

"जगातील सर्व देशांप्रमाणेच स्वातंत्र्य उपभोगणे आणि स्वकष्टाने जीवनाच्या गरजा पूर्ण करून, सर्वांगीण विकासाची संधी प्राप्त करून घेणे हे भारतीय जनतेचे मूलभूत हक्क आहेत. सरकार जर लोकांना हे हक्क नाकारीत असेल आणि त्यांच्यावर जुलूम-जबरदस्ती करीत असेल, तर ते सरकार बदलण्याचा आणि रद्द करण्याचा अधिकार येथील जनतेला आहे. ब्रिटिश सरकारने भारताच्या स्वातंत्र्याचे अपहरण केले, इतकेच नव्हे, तर येथील जनतेचे शोषण करून भारताचे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवन उद्ध्वस्त केले आहे. म्हणून भारताने ब्रिटिश साम्राज्याशी असलेला संबंध तोडून टाकून संपूर्ण स्वराज्याचे ध्येय साध्य केले पाहिजे अशी आमची ठाम भूमिका आहे."

२६ जानेवारी, १९३०

सुधारित किमत
रु. २८.००

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे